इयत्ता : बारावी

# पुरवणी परीक्षा तयारी

*ध्यासपंथी विद्यार्थ्यांसाठी.....*

## विषय – मराठी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## इयत्ता बारावी

# पुरवणी परीक्षा तयारी

## विषय मराठी

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# इयत्ता बारावी पुरवणी परीक्षा तयारी: विषय मराठी


**प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन

**प्रकाशक** : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

**प्रेरणा** : मा. आय. ए. कुंदन (भा.प्र.से.), प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग

**मार्गदर्शन** : मा. सूरज मांढरे (भा.प्र.से.), आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
मा. प्रदिपकुमार डांगे (भा.प्र.से.),
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

**संपादक** : मा. राहूल रेखावार (भा.प्र.से.),
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे.

**सहसंपादक** : डॉ. शोभा खंदारे, सहसंचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे.

**कार्यकारी संपादक** :
श्रीमती ज्योती शिंदे, उपसंचालक, मराठी विभाग
श्री भारत बोरनारे, प्रशासन अधिकारी
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे.

**कार्यकारी सहसंपादक** :
डॉ. संदिप मुळे, अधिव्याख्याता, आयटी तथा मराठी विभाग
डॉ निता जाधव, अधिव्याख्याता, मराठी विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे.

**संपादन सहाय्य** :
श्रीमती वल्लरी सोनकुसळे, विषय सहाय्यक, मराठी विभाग
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे.

---

**निर्मिती गट सदस्य** –

श्रीम. सुचेता गिरीश नलावडे, क.जे.सोमैया कला व वाणिज्य महाविद्यालय, विद्याविहार (पूर्व) मुंबई.
श्रीम. शीतल हरीश सामंत, डॉ. बी.आर.तथा दादासाहेब सामंत ज्युनिअर कॉलेज, पावस, रत्नागिरी.
डॉ. पांडुरंग केशव कंद, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे.
डॉ. सुजाता शेणई, मराठवाडा मित्रमंडळ वाणिज्य महाविद्यालय, पुणे.
श्री. नानासाहेब पांडुरंग जामदार, देवचंद कॉलेज, अर्जुननगर,व्हाया निपाणी, कागल, कोल्हापूर.

# प्रस्तावना

## विद्यार्थ्यांशी संवाद.......

विद्यार्थी मित्रांनो,

युवकभारती मराठी या पाठ्यपुस्तकाचा अभ्यास कमी वेळात आणि नेमकेपणाने करण्यासाठी अनेक शिक्षकांच्या सहकार्यातून तयार झालेले हे कार्य तुमच्या हाती सोपवताना मनस्वी आनंद होत आहे. तुम्ही ध्यासपंथी आहात असंच आम्हाला वाटतं. महाविद्यालयात शिकणाऱ्या इतर विद्यार्थ्यांपेक्षा तुमचे जीवन अधिक मेहनतीचे आहे, तरीही शिक्षणाचा ध्यास तुमच्या मनात पक्का आहे. हे जाणूनच या पंथावर तुमची सोबत करण्यासाठी याची रचना करण्यात आली आहे. याचा उपयोग तुम्हा सर्वांना मुख्य परीक्षेच्या वेळी मार्गदर्शक म्हणून होणार आहे.

गद्य, पद्य, कथा, उपयोजित, व्याकरण व लेखन या प्रत्येक घटकाची रचना कृतिपत्रिकेतील आराखडा आणि गुणविभागणी लक्षात घेऊन करण्यात आली आहे. कृतिपत्रिकेतील विभाग रचना जशी आहे त्याप्रमाणे सर्व घटक त्या-त्या विभागात तुम्हाला एकत्र अभ्यासता येणार आहेत.

हा अभ्यास तुम्ही मनापासून केला तर तुमच्या प्रयत्नांना नक्की यश मिळेल असा विश्वास आम्हाला वाटतो. त्या बरोबरीनेच तुमच्या जीवनात आलेल्या विविध अनुभवांची जोड तुम्हाला देता आली की नक्कीच या परीक्षांचा महत्त्वाचा टप्पा तुम्ही आत्मविश्वासाने पूर्ण कराल!

तुम्हा सर्वांना या ध्यासपंथावरून उज्ज्वल भविष्याकडे झेपावण्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

# इयत्ता : बारावी

# पुरवणी परीक्षा तयारी

## अनुक्रमणिका



| विभाग | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| गद्य | ०१ – १४ |
| पद्य | १५ – ४० |
| कथा – साहित्यप्रकार | ४१ – ४६ |
| उपयोजित | ४७ – ५५ |
| व्याकरण व लेखन | ५६ – ७९ |

# गद्य विभाग

(कृतिपत्रिकेप्रमाणे या विभागाची रचना केली आहे.)

- **कृतिपत्रिकेसाठी सूचना :**

  - आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने व्यवस्थित काढाव्यात.
  - स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

आपल्या पाठ्यपुस्तकाचा प्रारंभ गद्य म्हणजेच धड्याने होतो. आपल्याला इयत्ता बारावीसाठी विविध साहित्यप्रकारांनी युक्त असे सहा पाठ अभ्यासायचे आहेत. अतिशय नामवंत साहित्यिकांच्या या पाठांमधून जीवनविषयक ज्ञान आपल्याला मिळते. स्वमत, अभिव्यक्तीच्या कृतींमधून लेखकांनी दिलेला संदेश, आशय आपण आपल्या शब्दांत व्यक्त करू शकतो.

**गद्य पाठांवर आधारित एकूण वीस गुणांच्या कृती आहेत.**

- कृती क्रमांक १-अ-१, २ व १-आ-१,२ या पाठयपुस्तकातील उताऱ्यावरील (पठित गद्य) आकलनाच्या कृती असतील. यांत आकृतिबंधात्मक कृती, चौकटी पूर्ण करा, विधाने पूर्ण करा, एका वाक्यात उत्तरे लिहा, कारणे द्या इत्यादी कृती विचारल्या जातील.
- कृती क्रमांक-१-अ-३ व १-आ-३- स्वमत/अभिव्यक्ती या कृती असतील,
- कृती क्रमांक १-इ-पाठय पुस्तकाच्या बाहेरील उतारा (अपठित गद्य) असेल.

- **पाठांची रचना पुढीलप्रमाणे ( पाठक्रमांक पाठ्यपुस्तकाप्रमाणे दिले आहेत.)**

  १) वेगवशता - प्राचार्य शिवाजीराव भोसले

  ३) आयुष्य-----आनंदाचा उत्सव - शिवराज गोर्ले

  ५) वीरांना सलामी - अनुराधा प्रभुदेसाई

  ८) रेशीमबंध - डॉ. यू. म. पठाण

  १०) दंतकथा - वसंत सबनीस

  १२) रंगरेषा व्यंगरेषा - मंगेश तेंडुलकर

# पाठ : १ वेगवशता

**- प्राचार्य शिवाजीराव भोसले**

प्राचार्य शिवाजीराव भोसले हे नामवंत वक्ते, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विचारवंत आणि व्यासंगी लेखक. देशात आणि विदेशांत अनेक विषयांवर व्याख्यानमाला गाजवल्या. पुणे येथील वसंत व्याख्यानमालेत सलग २८ वर्षे व्याख्याने दिली. "कथा वक्तृत्वाची", "जागर (खंड १ व २)", "जीवनवेध", "दीपस्तंभ", "देशोदेशींचे दार्शनिक", "मुक्तिगाथा महामानवाची", "यक्षप्रश्न", "हितगोष्टी" इत्यादी ग्रंथ प्रकाशित. औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरु. "राजर्षी शाहूमहाराज पुरस्कार" (कोल्हापूर), "श्रीमंत मालोजीराजे स्मृती पुरस्कार" (फलटण) अशा पुरस्कारांनी सन्मानित.

या वैचारिक पाठात लेखकाने अतिवेगाच्या आहारी गेलेल्या माणसांच्या विकृतीवर नेमकेपणाने बोट ठेवले आहे. वेळ आणि श्रम वाचवण्यासाठी वाहनाची गरज लेखकालाही पटते.

कृती - अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा.

१) खालील कृती पूर्ण करा.

य) हादरे बसल्यावर कमकुवत होणारे - .................

र) वाढता वेग म्हणजे - .................................

२) सूचनेनुसार कृती पूर्ण कराः

य) अपघात होण्यामागील कारण लिहा.

र) अनाठायी वेगाचा दुष्परिणाम लिहा.

अपेक्षित स्थळी वेळेवर पोचता येईल, अशा बेताने वाहने चालवण्याऐवजी उगाचच भरधाव वेगाने चालवण्यात औचित्य ते कोणते ?

वाहनाचा वेग वाढला म्हणजे त्याच्यावरचा ताबा कमी होतो. पुढचे वाहन मागे टाकून पुढे जाण्याच्या हव्यासामुळे अनेक अपघात होतात. रात्रीच्या वेळी विलक्षण वेगाने धावणारी गाडी ही रातराणी म्हटली जाते. रात्री भरधाव वेगाने प्रवास करून पार पाडावीत एवढी महत्त्वाची कामे दरवेळी असतात का वाहनाचा वेग अनिवार झाला, तर चित्ताची व्यग्रता वाढते. डोळ्यांवर, मनावर, शरीरावर ताण पडतो. शरीरभर अनावश्यक स्पंदने निर्माण होतात. हादरे बसून मज्जातंतू आणि मणके कमकुवत होतात. कमरेची आणि पाठीची दुखणी ही वाहनधारकांची व्यथा असते. बसणे, उठणे, चढणे, उतरणे, चालणे, वळणे, वर-खाली पाहाणे या मुक्त हालचालींचे संगीत विसरून स्वत:ला वाहनाशी जखडून ठेवणे आणि वाहनाचा वेग अंगीकारून आपल्या शरीरव्यापारात अडथळे निर्माण करणे हे धोरण निसर्गविरोधी आहे. आरोग्याची हानी करणारे आहे. वाढता वेग म्हणजे ताण. जीवनातले ताणतणाव वाढवून पोचणार तरी कोठे ? आपले स्वत्व आणि स्वस्थता हिरावून घेणारा अस्वाभाविक वेग कमी करणे, हे आपले कर्तव्य आहे. उगाच भावविवश होऊन वेगवश होऊ नये. अनाठायी वेगामुळे पोचण्यापूर्वीच अंत होण्याची शक्यता वाढते.

**३. स्वमत - अभिव्यक्ती -**

'जीवनातील ताणतणाव वाढवून पोचणार तरी कोठे?', या विधानाविषयी तुम्हांला काय वाटते ते तुमच्या शब्दांत लिहा.

**किंवा**

वाहन चालवताना तुम्ही कोणती काळजी घ्याल ते स्पष्ट करा.

वरील उताऱ्यातील आकलन कृतीची उत्तरे -

१) खालील कृती पूर्ण करा.

य). मज्जातंतू, मणके

र). ताण

२) सूचनेनुसार कृती पूर्ण कराः

य) पुढचे वाहन मागे टाकून जाण्याच्या हव्यासामुळे अपघात होतात.

र) अनाठायी वेगामुळे पोचण्यापूर्वीच अंत होण्याची शक्यता वाढते.

३) **स्वमत कृती - अपेक्षित मुद्दे -**

वाहन मर्यादित वेगात चालवणे योग्य - वाढता वेग घातक - वाहनचालकावर ताण - शरीराच्या व्याधी - गाडी हे साधन - वापर व वेग मर्यादितच.

किंवा

**अभिव्यक्ती कृती - अपेक्षित मुद्दे**

दोन्ही वाहनांत सुरक्षित अंतर - संपूर्ण लक्ष गाडी चालवण्याकडे - रहदारीचे नियमपालन - क्लच, ब्रेक, ॲक्सलरेटर बारीक लक्ष - मर्यादित वेग.

**सराव कृती - आकलन कृती**

१) एका वाक्यात लिहा.

वाहनधारकांची व्यथा सांगा.

२) विधान पूर्ण करा.

वाहनाचा वेग वाढला----------

**सराव कृती स्वमत -**

१) “वेगात एक बेहोषी असते.” याविषयी तुमचे मत लिहा.

२) “आरंभी माणसे वाहनांवर स्वार होतात. मग वाहने माणसांवर स्वार होतात.” हे स्पष्ट करा.

**सराव कृती - अभिव्यक्ती -**

१) वाहतूक कोंडीत सापडलात तर काय कराल? हे सोदाहरण लिहा.

२) वाहनाच्या मर्यादित वेगाचे महत्त्व विशद करा.

***************************************************

# पाठ ३ – आयुष्य आनंदाचा उत्सव

## – शिवराज गोर्ले

शिवराज गोर्ले सुप्रसिद्ध लेखक, नाटक, चित्रपट, दूरदर्शन मालिका, कथा,व्यक्तिरेखा, कादंबरी, ललितलेख, वृत्तपत्रीय स्तंभ इत्यादी माध्यमांतून विपुल लेखन प्रसिद्ध. "कुर्यात् सदा टिंगलम्", "गोलमाल" इत्यादी गाजलेल्या नाटकांसाठी तसेच "थरथराट", "चिमणी पाखरं" इत्यादी लोकप्रिय चित्रपटांसाठी पटकथा, संवाद लेखन त्यांनी केले आहे. त्यांनी मराठीत प्रेरक साहित्याचे दालन समृद्ध केले. "मजेत जगावं कसं?" या त्यांच्या गाजलेल्या पुस्तकाला "महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेचा" पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय त्यांची "माणसं जोडावी कशी ?", "मस्त राहावं कसं ?", "यशस्वी व्हावं कसं ?", "तुम्ही बदलू शकता" अशी अनेक प्रेरक पुस्तके प्रसिद्ध आहेत. "सर्वस्व", "शोधार्थ", "एका कल्पनेची आत्मकथा" या कादंबऱ्या प्रसिद्ध. त्यांच्या "नग आणि नमुने" या विनोदी पुस्तकाला महाराष्ट्र राज्य शासनाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

खरेतर आनंद बाहेर नसून अंतरंगात असतो; पण त्यासाठी आनंदाचे भान जागे असावे लागते, हे या पाठात लेखकाने हलक्याफुलक्या शैलीत उलगडले आहे. आनंद नेमका कशात असतो, तो कसा अनुभवायचा असतो, छोट्या छोट्या गोष्टीतही आनंद कसा भरून राहिलेला असतो, आनंदी राहण्याची सवय कशी लावून घ्यावी यासंबंधी विविध उदाहरणांमधून केलेले विवेचन आनंदी राहण्यासाठी मोलाचे ठरणार आहे. निसर्गाची सोबत, संगीताची साथ आणि पुस्तकांचा सहवास आनंदी राहण्यासाठी कसे उपयुक्त ठरतात हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. यासंबंधीच्या पाठातील विवेचनामुळे आपणास जीवनात आनंदी राहण्याचा राजमार्ग गवसतो. छोट्या छोट्या गोष्टीतही आनंद मानणे गरजेचे असते.

**कृती – पुढील गद्य उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१) खालील चौकटी पूर्ण करा.**

य) सात जन्म पुरणारा – ☐

र) कलेच्या मस्तीतच जगणारी – ☐

**२) एखाद्या कलेशी दोस्ती केली तर घडणारे परिणाम** – य) ☐

र) ☐

संगीताच्या सात सुरांमध्ये तर सात जन्म पुरेल एवढा आनंद भरून राहिलेला आहे. आपलं शास्त्रीय संगीत ही तर आनंदाची इस्टेटच आहे. कुमारगंधर्व, पं. भीमसेनजी, पं. जसराज, किशोरी आमोणकर यांचं गाणं आपण ऐकू शकतो, हे केवळ भाग्यच म्हणायला हवं. आत्मिक आनंद म्हणतात, तो यापेक्षा फारसा वेगळा नसावाच. आत्म्याच्या या भाषेत गाता आलं नाही, तरी ऐकता येतंच ना ? कलाकार मंडळी खरी जगतात ती कलेच्या मस्तीतच. एखाद्या कलेशी आपणही दोस्ती करू शकलो, तर एका वेगळयाच विश्वात वावरता येतं, निर्मितीच्या आनंदाशी नातं जोडता येतं. या आनंदाची जात काही वेगळीच असते; पण कलावंत होता आलं नाही, तरी रसिक होण्याचा आपला अधिकार कुणीच नाकारू शकत नाही. कलेच्या

आस्वादातला अनोखा आनंद हा आपणच आपल्याला बहाल करू शकतो. निर्मिती म्हणजे काही प्रत्येकानं ताजमहाल बांधायला हवा असं थोडंच आहे ? पोरांच्या बरोबरीनं दिवाळीतला किल्ला करण्यातही मौज असतेच.

शिकण्यातला आनंद हा तर आयुष्यभर न संपणारा असतो. शिकलेलं शिकवण्यातही आनंद असतोच. हा आनंद आपण किती घेतो ? नाईलाजानं नव्हे, परीक्षा देण्यासाठी नव्हे की कुणावर उपकार म्हणून नव्हे, केवळ स्वतःची हौस म्हणून काही शिकून पाहा.

३) स्वमत - अभिव्यक्ती -

"शिकण्यातला आनंद हा तर आयुष्यभर न संपणारा असतो." हे विधान स्पष्ट करा.

**किंवा**

तुमची आनंदाची संकल्पना स्पष्ट करा.

**वरील उताऱ्यातील आकलन कृतीची उत्तरे -**

१) य) आनंद   र) कलाकार

२) य) एका वेगळयाच विश्वात वावरता येतं.   र) निर्मितीच्या आनंदाशी नातं जोडता येतं.

**३) स्वमत कृती - अपेक्षित मुद्दे -**

एखादी गोष्ट मनापासून शिकावी- आगळावेगळा आनंद -जबरदस्तीने, कोणासाठी नाही तर स्वत:च्या जीवनात सकारात्मकता आणण्यासाठी -नवनवीन गोष्टी करणे/शिकणे- व्यक्तिमत्त्व विकसित करणे.

**किंवा**

**अभिव्यक्ती कृती - अपेक्षित मुद्दे**

तुमची आनंदाची संकल्पना -सकारात्मक गोष्टींत आनंद- सामाजिक बांधिलकी- आपुलकी, सद्भावना- नवीन गोष्टी करणे- छोट्या छोट्या क्षणांचाही आनंद घेणे.

**सराव कृती -आकलन**

एका वाक्यात उत्तर लिहा.

१) उताऱ्यात आलेल्या शास्त्रीय गायकांची नावे लिहा.

२) खालील विधान पूर्ण करा.
पोरांच्या बरोबरीने दिवाळीतला------

**सराव कृती - स्वमत**

१) "आनंद, प्रेम, शांती, समाधान हे सगळं अंतरंगातच असतं" हे विधान स्पष्ट करा.

२) "शांत चित्तानं, आनंदी वृत्तीनं काम केलं, तर यश मिळत जातं" याविषयी तुम्हांला काय वाटते ते लिहा.

**सराव कृती - अभिव्यक्ती -**

१) तुमच्या मते खरा आनंद कशात मिळू शकतो ते लिहा.

२) आनंदी जीवन असेल तर मानवी आयुष्यावर होणारे परिणाम लिहा.

*****************************************************************

# ५. वीरांना सलामी

## – अनुराधा प्रभुदेसाई

अनुराधा प्रभुदेसाई प्रसिद्ध लेखिका व लक्ष्य फाउंडेशनच्या संस्थापिका म्हणून ओळखल्या जातात. या फाउंडेशनच्या माध्यमातून २००४ पासून श्रीनगर, लडाख, अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि आसाममधील आघाड्यांवरील ठाण्यांवर जाऊन जवानांशी संवाद साधून "आम्ही तुमच्या सोबत आहोत", असा विश्वास देण्यासाठी पुढाकार. कारगिल युद्धातील बारा वीरांच्या शौर्यगाथांच्या पुस्तिकांचे शाळांमध्ये वितरण. "ऋणानुबंध सैनिकांशी-कारगिल शौर्यगाथा" हे दृक् श्राव्य सादरीकरण. सैनिकांबद्दल आदरभाव व्यक्त करणाऱ्या "सैनिकांसाठी रक्षाबंधन", "सैनिकांबरोबर दिवाळी", "सैनिक माझा व्हॅलेंटाईन", "प्रत्येक सैनिक एक पणती", "सैनिकांसोबत युवा प्रेरणा" अशा कार्यक्रमांचे आयोजन. देशाचे संरक्षण करणारे आपले सैनिक असून त्यांच्यामुळे आपण सुरक्षित आहोत ही भावना या पाठातून व्यक्त. लेखिका अनुराधा प्रभुदेसाई यांनी लडाखमधील सैनिकांबरोबर जोडलेले भावबंध यांत व्यक्त केले आहेत. सलग पाच वर्षे रक्षाबंधनाचे पवित्र क्षण या सैनिकांबरोबर घालवून सैनिकांच्या जीवनात एक अनोखा आनंद आणला आहे.

**पुढील गद्य उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

१) आकृती पूर्ण करा.

य) कारगिल युद्धाचे वर्ष- [ ]

र) ब्रिगेडियर ठाकूर यांनी डिफेन्स सर्व्हिसेससाठी व्यक्त केलेली किमान अपेक्षा [ ]

**२)** ब्रिगेडिअर ठाकूर यांनी वयाचा, प्रेमाचा अधिकार वापरून संवाद साधताना केलेले आवाहन

य) [ ]

र) [ ]

आम्ही पाच वर्षं रक्षाबंधनासाठी लडाखला ग्रुप घेऊन येत आहोत, याचं प्रचंड अप्रूप वाटून ब्रिगेडियर कुशल ठाकूर या सोहळ्यासाठी आणि आम्हांला भेटायला आवर्जून आले होते. १९९९ मधील कारगिल युद्धाच्या वेळी कर्नल असलेले कुशल ठाकूर तोलोलिंग फत्ते करण्याच्या योजनेचे शिल्पकार होते. ते आमच्यासारख्या सामान्य माणसांना भेटायला येतात, याच्यापरता मोठा सन्मान तो कोणता ?

आमच्याशी संवाद साधत असताना ब्रिगेडियर ठाकूर आम्हांला म्हणाले, "तुम्ही पाच वर्षांचा वादा केलात आणि तो निभावलात, ह्याबद्दल अभिनंदन ; पण माझा प्रेमाचा, वयाचा अधिकार आणि हक्क वापरून सांगतो, तुम्ही हे मिशन बंद करू नका. इथे नेहमी या. आमच्या तरुण जवानांना भेटा त्यांचा हौसला बुलंद करा. तुमच्या शहरातील कुशाग्र बुद्धीच्या मुलांना सांगा, आम्हांला त्यांची गरज आहे. निदान पाच वर्षं तरी कमिशंड ऑफिसर म्हणून डिफेन्स सर्व्हिसेस जॉईन करा. मग पुढच्या आयुष्यात तुमचं करिअर करायला तुम्ही मोकळे आहात ! तरुण मुलींना सांगा, की आमच्या जवानांशी विवाह

करायला डगमगू नका आणि मला वचन द्या, की हा जो लष्कर आणि नागरिकांमध्ये तुम्ही एक भावनिक सेतू बांधत आहात, ते काम थांबवणार नाही."

३. स्वमत- अभिव्यक्ती

"तुम्ही हे मिशन बंद करू नका." हे वाक्य स्पष्ट करा.

किंवा

तुम्हांला वाटत असलेल्या सैनिकांविषयीच्या भावना उलगडून दाखवा.

**वरील उताऱ्यातील आकलन कृतीची उत्तरे -**

१. य)१९९९

र)निदान पाच वर्ष तरी कमिशंड ऑफिसर म्हणून डिफेन्स सर्व्हिसेस जॉईन करा.

२. य) तुम्ही हे मिशन बंद करू नका. इथे नेहमी या.

र) आमच्या तरुण जवानांना भेटा त्यांचा हौसला बुलंद करा.

३. **स्वमत कृती - अपेक्षित मुद्दे** -

"तुम्ही हे मिशन बंद करू नका." हे वाक्य स्पष्ट करा.

लेखिका अनुराधा प्रभुदेसाई - वीरांना सलामी- सतत ५ वर्षे लडाखला रक्षाबंधन-सैनिकांना समजून घेणे-भावनिक सेतूची बांधणी-सैनिकही माणूसच आहे नां- आदर्शवत असे काम.

किंवा

**अभिव्यक्ती कृती अपेक्षित मुद्दे-**

तुम्हांला वाटत असलेल्या सैनिकांविषयीच्या भावना उलगडून दाखवा.

देशाचे संरक्षण-स्वत:च्या जीवाची बाजी-परिवारापासून दूर- त्याग, बलिदान-त्यांच्यामुळे आपण सुरक्षित- त्यांना दंडवत.

**सराव कृती- आकलन**

एका वाक्यात उत्तरे लिहा :

१) लडाखला गेल्यावर निखळून पडणारी बाब लिहा.
२) ब्रिगेडियर ठाकूर यांनी लेखिकेचे कशासाठी अभिनंदन केले ते लिहा.

**सराव कृती- स्वमत**

१) "सब कुछ आसान है, मॅडमजी! सिर्फ दिमाग में डाल देना है।" हया वाक्यातील अर्थ स्पष्ट करा.
२) "आपले सैनिक हे हिरे आहेत" - हे वाक्य उलगडून दाखवा.

**सराव कृती - अभिव्यक्ती**

१) तुम्ही सैनिक झालात तर काय कराल, ते स्पष्ट करा.
२) सैनिकाच्या जीवनाविषयी लिहा.

*********************************************

# ८. रेशीमबंध

## डॉ.यू.म.पठाण

डॉ. यू.म.पठाण हे सुप्रसिद्ध साहित्यिक, संत साहित्याचे व्यासंगी अभ्यासक, कथालेखक, संशोधक, संपादक व नामवंत वक्ते. "पद्मश्री" या सन्मानाने भारत सरकारकडून गौरवान्वित; तसेच "ज्ञानोबा तुकाराम" या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने महाराष्ट्र शासनाकडून सन्मानित. शाळेत असल्यापासून लेखनाला सुरुवात. विविध नियतकालिकांमधून विपुल कथालेखन. "मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप" या विषयावर संशोधन. प्राचीन मराठी व हिंदी साहित्याचे संशोधन हा त्यांचा विशेष आवडीचा प्रांत. "भाऊसाहेबांची बखर", "मराठवाड्यातील लोककथा", "महानुभाव साहित्य संशोधन: खंड १" इत्यादी संशोधनपर संपादित ग्रंथ प्रकाशित. "संतसाहित्यचिंतन", "शोधणी", "आठव ज्ञानदेवांचा....ज्ञानदेवीचा", "अजून आठवतं" इत्यादी लेखसंग्रहही प्रकाशित. मराठवाड्यात विखुरलेल्या शिलालेखांचा, ताम्रपटांचा शोध हे त्यांचे अत्यंत मौलिक संशोधन कार्य आहे. १९९० साली पुणे येथे संपन्न झालेल्या त्रेसष्टाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष.

"रेशीमबंध" ह्या ललित गद्य पाठात निसर्ग व मानव यांचे युगानु युगांचे नाते आहे, हे अत्यंत संवेदनशील मनाने लेखकाने टिपले आहे. वृक्ष, वेली, फुले तसेच पाखरांविषयी लेखकाला आत्मिक ओढ आहे. हे रेशमाचे बंध उलगडताना लेखन शैलीही प्रसन्न आहे याचा अनुभव येतो.

कृती अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :

(१) कृती पूर्ण करा :

य) डोळे किलकिले करणारी -----

र) हलकेच पाऊल टाकणारी---

(२) चौकटी पूर्ण करा :

उताऱ्यात आलेली दोन फुलझाडे

य) [ ]

र) [ ]

सर्वात आधी जाग येते ती आमच्या बागेतल्या पाखरांना. मी पहिला चहा करून घेऊन त्याचे घोट घेत घेत "काय लिहावं ?" याचा विचार करत काहीसा संभ्रमात असतो, त्या वेळी ही इवली इवली पाखरं गुलमोहोराच्या घरट्यांतून, जॅक्रांडाच्या फांद्यांवरुन हळूहळू डोळे किलकिले करून पाहातात. पहाटेच्या प्रकाशकिरणांना खुणावतात. आपापसात हलकेच कुजबुजू लागतात. "पहाट झालीय काय ?" असं विचारू लागतात. खरं तर पहाटच त्यांना विचारत असते, की "मी येऊ का तुम्हांला भेटायला ?" पहाटेचं नि या इवल्या इवल्या पाखरांचंदेखील असंच काहीसं जवळकीचं नातं आहे. त्यांनी पंख फडफडल्याशिवाय पहाटदेखील आकाशात येत नाही. त्यांच्या पंखांची फडफड ऐकली, की पहाटेलादेखील राहावत नाही. मग ती आकाशात हलकेच पाऊल टाकते. "इतकं हळुवार, की तुम्हांला त्याची गंधवार्तादेखील लागू नये! पहाट कशी होते, हे देखील पाहण्याजोगं आहे.

पाहण्याजोगंच नाही तर अनुभवण्याजोगं आहे. मला तर तो नेहमीच एक अनोखा, लोभसवाणा, नाजुक, तरल अनुभव वाटला आहे. तुम्ही केव्हा तरी असेच उठून बघा म्हणजे तुम्हांलाही त्यातला आल्हाद जाणवेल. त्यातली तरलता जाणवेल. त्यातली नजाकत जाणवेल." हा आल्हाद व्यक्त करण्यासाठीच जणू आमच्या बागेतील जॅक्रांडावरची नि गुलमोहरावरची पाखरं आपापसात कुजबुजू लागतात. त्यांचा चिवचिवाट पहिल्यांदा किती मंद मंद असतो; पण जसजशी पहाट उजाडते, तसतसा तो वाढत वाढत जातो.

३) स्वमत- अभिव्यक्ती

"त्यांच्या पंखांची फडफड ऐकली, की पहाटेलादेखील राहवत नाही" या विधानाचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

**किंवा**

निसर्ग व मानव यांच्यातील रेशीमबंध स्पष्ट करा.

**वरील उताऱ्यातील आकलन कृतीची उत्तरे -**

१) य) इवली इवली पाखरे

र) हलकेच पाऊल टाकणारी - पहाट

(२) य) जॅक्रांडा र) गुलमोहोर

**स्वमत कृती - अपेक्षित मुद्दे -**

त्यांच्या पंखांची फडफड ऐकली, की पहाटेलादेखील राहवत नाही. तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.
निसर्ग व मानव-अतूट नाते- लेखकांचे संवेदनशील मन व्यक्त- पाखरे व पहाट परस्पर भेटीसाठी उत्सुक तरल शैली.

**अभिव्यक्ती कृती अपेक्षित मुद्दे**

निसर्ग व मानव यांच्यातील रेशीमबंध स्पष्ट करा.
मानव-निसर्गाचा अविभाज्य घटक-सर्व सृष्टीला आपल्या रंग, गंधाने मोहवणारा निसर्ग- निसर्ग सखा, गुरु, मित्र-भूमिका-तरल, नाजूक, रेशीमबंधच जणू.

**सराव कृती- आकलन**

वाक्य पूर्ण करा.

१) पहाट कशी येते हे पाहण्याजोगचं नाही तर ..................

२) एका वाक्यात उत्तर लिहा.

पहाट होण्याचा अनुभव लेखकाला असा वाटतो, ते लिहा.

**सराव कृती - स्वमत**

१) "मन कसं समेवर आलेलं असतं"- हे विधान स्पष्ट करा.

२) निशिगंध म्हणजे निशिगंधच ! यांतील आशय उलगडून दाखवा.

**सराव कृती - अभिव्यक्ती**

१) निसर्ग व तुम्ही भावबंध स्पष्ट करा. एखाद्या निसर्गकवितेचा सारांश लिहा.

****************************************************************

# १०. दंतकथा

**– वसंत सबनीस**

वसंत सबनीस हे सुप्रसिद्ध लेखक, विनोदकार, नाटककार. सबनीस यांनी लेखनास प्रारंभ केला तो कवितेने. नंतर ते विनोदी लेखनाकडे वळले. “पानदान”, “चिल्लरखुर्दा”, “भारूड”, “मिरवणूक”, “पंगत”, “आमची मेली पुरुषाची जात” असे विनोदी लेखसंग्रह, “खांदेपालट”, “पखाल”, “आत्याबाईला आल्या मिशा”, “थापाड्या”, “विनोदी द्वादशी”, “बोका झाला संन्यासी” हे कथासंग्रह, “सोबती” हा व्यक्तिचित्रसंग्रह, “माहेश्वरी” हा आत्मपर लेखांचा संग्रह प्रसिद्ध.

विनोदी लेखनाबरोबरच त्यांनी अनेक नाटके, एकांकिका व लोकनाट्ये लिहिली. त्यांची बरीच नाटके रंगभूमीवर गाजली. राजकीय भाष्य व चतुर संवाद यामुळे त्यांचे “विच्छा माझी पुरी करा” हे लोकनाट्य विलक्षण लोकप्रिय झाले. “प्रेक्षकांनी क्षमा करावी”, “चिलखतराज जगन्नाथ” हे त्यांचे एकांकिका संग्रह आणि “गुदगुल्या” हा बालकथा संग्रह प्रसिद्ध आहे. दंतकथा हा एक विनोदी ललित लेख आहे. दातदुखी म्हणजे महाप्रचंड त्रास. भल्या भल्यानांही रडायला लावेल अशी दातदुखी आहे. विषय गंभीर आहे मात्र लेखकाने नर्म विनोदी शैलीत सर्व प्रसंग एकत्र केले आहेत. शाब्दिक कोट्याही पुष्कळ आहेत. म्हणी, वाक्प्रचार यांचा विनोद निर्मितीसाठी लेखकाने कल्पकतेने वापर केला आहे.

**कृती अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

(१) चौकटी पूर्ण करा :

य) लेखकाला वाईट वाटण्यामागचे कारण [ ]

र) लेखकाचे दंतवैद्याबद्दलचे मत [ ]

(२) कृती करा :

लेखकाने शेजाऱ्यांना भांडणाच्या वेळी दिलेल्या धमक्या

य) --------------

र) -----------------

दात काढण्याबाबत आमचे मतैक्य झाल्यावर पुढचा मार्ग सरळ होता. फक्त दात काढायलाही पैसे द्यावे लागतात याचे वाईट वाटले ; पण मग माझी मीच समजूत घातली, की आपण डोक्याचे केस मुळासकट काढत नाही तरी पैसे देतो, मग दात मुळासकट काढण्यासाठी पैसे दिले तर काय बिघडले ? आणि मी प्रामाणिकपणे सांगतो, की दहा-बारा वर्षांपूर्वी दंतवैद्याबद्दलच्या खऱ्याखुऱ्या दंतकथा ऐकल्या होत्या, त्यावरून दंतवैद्याची खुर्ची, दात उपटण्याची क्रिया इत्यादी सर्व गोष्टींबद्दल माझ्या मनात विक्राळ भीती होती; पण प्रत्यक्षात तसे काही वाटले नाही. दंतवैद्य अलीकडे फारच माणसाळलेले आहेत असे माझे प्रामाणिक मत झाले. त्याने माझ्या हिरड्यांत इंजेक्शन देऊन इतका लीलया दात उपटला, की मी आश्चर्यचकित होऊन पाहतच राहिलो ! दात उपटण्याची क्रिया इतकी सोपी असेल असे वाटले नव्हते. मी आजवर शत्रूंना आणि शेजाऱ्यांना भांडणाच्या वेळी “दात उपटून हातात ठेवीन”, “दात घशात घालीन” अशा माझ्या शक्तीचे प्रदर्शन करणाऱ्या धमक्या दिल्या होत्या. त्यांना काहीच अर्थ नव्हता,

याची हळहळ दंतवैद्याच्या खुर्चीत असताना वाटली. दंतवैद्याने दात दाखवला. हाच तो खलदंत ! ज्याने माझे बायकोपुढे हसे केले तोच हा नीच दात. नतद्रष्ट!

**(३) स्वमत-अभिव्यक्ती -**

"दंतवैद्याने दात दाखवला-हाच तो खलदंत!" या विधानाचा आशय स्पष्ट करा.

**किंवा**

दातांचे आरोग्य सांभाळणे किती आवश्यक आहे ते लिहा.

**वरील उताऱ्यातील आकलन कृतीची उत्तरे -**

(१) य) दात काढायलाही पैसे द्यावे लागतात.

र) दंतवैद्य अलीकडे फारच माणसाळलेले आहेत.

(२) य)'दात उपटून हातात ठेवीन'

र) 'दात घशात घालीन'

**स्वमत कृती - अपेक्षित मुद्दे -**

"दंतवैद्याने दात दाखवला-हाच तो खलदंत!" या विधानाचा आशय स्पष्ट करा.

लेखक दातदुखीने अस्वस्थ- विविध उपाय, सल्ले-कंटाळलेला जीव- एकदाचा दात काढला- खल- दुष्ट दात- त्रासदायक वाटणे- काढल्यावर हायसे.

**अभिव्यक्ती कृती अपेक्षित मुद्दे**

दात दुखी भल्याभल्यांना रडवते. दात नीट नसतील तर आरोग्याला घातक-असहय वेदना-खर्चिकही.

**सराव कृती- आकलन**

एका वाक्यात उत्तर लिहा.

लेखकाला विक्राळ भीती वाटणाऱ्या गोष्टी लिहा.

**सराव कृती - स्वमत**

१) "ते येताना ताप आणि गेल्यावर पश्चाताप !" हे विधान स्पष्ट करा.

**२)** "तो तुम्हांला जागवणारा दात गेला. यापुढे दंतसप्ताह नाही." या विधानातील आशय उलगडून दाखवा.

**सराव कृती - अभिव्यक्ती**

१) दातांचे आरोग्य कसे राखाल, ते लिहा.

२) निरोगी दातांचे महत्त्व लिहा.

*************************************************

# १२. रंगरेषा व्यंगरेषा

**– मंगेश तेंडुलकर**

मंगेश तेंडुलकर हे सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार, नाट्यसमीक्षक, अभिनेता, लेखक, दिग्दर्शक आणि समाजव्रती कार्यकर्ता. "संडेमूड", "तेंडुलकरी स्ट्रोक्स", "भुईचक्र", "रंगरेषा व्यंगरेषा" ही त्यांची पुस्तके. व्यंगचित्रांना शब्दविरहित भाषा म्हणून "साहित्यिक" वळण देणारा मनस्वी कलाकार. राजकीय आणि विनोदी व्यंगचित्रांबरोबरच समाजकारण आणि तत्त्वांवर भाष्य करणारी व्यंगचित्रे साकारून या कलेत वेगळा पायंडा पाडला. बोलक्या आणि मोजक्या रेषांमधून अधिक आशय व्यक्त करणे हे त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्य. त्यांनी कुठल्याही महाविद्यालयात कलेचे शिक्षण घेतले नव्हते. त्यांना व्यंगचित्रे रेखाटण्याची नैसर्गिक देणगी होती, ती त्यांनी जनसमूहासमोर ताकदीने मांडली. भारतीय व्यंगचित्रकलेच्या क्षेत्रात एक नवे दालन उघडले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या चिं. वि. जोशी पुरस्काराने त्यांना गौरवण्यात आले. आयुष्याने दिलेल्या नकारांचे होकार करणाऱ्या तेंडुलकर यांच्या भावजीवनाची आणि कलाजीवनाची "रंगरेषा व्यंगरेषा" ही जीवनकहाणी आहे. या आत्मचरित्रात्मक पाठात मंगेश तेंडुलकर यांनी व्यंगचित्रकार म्हणून स्वत:च्या जडणघडणीच्या काळातील काही प्रसंग रेखाटले आहेत. दिग्गज चित्रकार दीनानाथ दलाल यांचे लाभलेले मार्गदर्शन लेखकाने कुशलतेने सांगितले आहे. व्यंगचित्राची नि:शब्द ताकद इथे व्यक्त झाली आहे. कलाकाराने सतत शिकत राहिले पाहिजे हे व्यंगचित्र प्रदर्शन पाहण्यासाठी आलेला शेतकरी आणि त्याच्या कुटुंबाच्या उदाहरणातून स्पष्ट केले आहे.

कृती अ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :

(१) कृती पूर्ण करा :

य) उताऱ्यातील मराठी महिना ----------------

र) चित्रातून पोहोचतो तो ------------------

(२) चौकटी पूर्ण करा :

य) लेखकाला आईमध्ये दिसणारा अंश [ ]

र) तहानलेल्या पिल्लांसाठी आई चोचीतून आणते [ ]

आईचं नातं हे सगळ्या जगातलं एकमेव खरं आणि सुंदर नातं आहे. बाकीची नाती ही जोडलेली असतात. माणसांमध्ये मला जर कुठे ईश्वराचा अंश दिसत असेल तर तो आईमध्ये दिसतो. हे नातं मला कसं दिसतं हे व्यक्त करण्यासाठी मी जे चित्र काढलेलं होतं, त्यात उन्हाळ्यातला वैशाख वणवा आहे. त्यात एक सुकलेलं झाडपण आहे. एकही पान नसलेल्या त्या झाडाच्या फांदीवर एका पक्ष्यानं घरटं केलेलं आहे. त्या घरट्यात चोच उघडून आकाशाकडे बघणारी तीनचार पिल्लं आहेत आणि त्या पिल्लाची कणसदृश्य आई पार आकाशात गेलीय. दूरवर सापडलेला एक पावसाचा ढग ती चोचीनं घरट्याच्या दिशेनं ओढून आणतेय. आता आई हे नातं मी कितीही शब्द वापरले तरी या चित्रासारखं मला व्यक्त

करता येणार नाही. हे व्यक्त झालं असेल तर हा मोठेपणा माझा नाही. ही व्यंगचित्र या माध्यमाची ताकद आहे. मी या चित्राखाली काही लिहीत नाही. हे चित्र आवडल्याचं सांगत अनेक लोक माझ्याकडे येतात. ते का आवडलं हे त्यांना सांगता येत नाही ; पण त्यातला आशय त्यांच्यापर्यंत पोहोचतो म्हणूनच ते त्यांना आवडलेलं असतं.

(३) स्वमत-अभिव्यक्ती

"ही व्यंगचित्रं या माध्यमाची ताकद आहे." या विधानाचा अर्थ उलगडून दाखवा.

किंवा

आईची महती लिहा.

**वरील उताऱ्यातील आकलन कृतीची उत्तरे -**

(१) य) वैशाख

र) आशय

(२) य) ईश्वराचा

र) पावसाचा ढग

**स्वमत कृती - अपेक्षित मुद्दे -**

भाषा शब्दांहूनही मार्मिक-आईची पिल्लांविषयीची काळजी व्यक्त-परिणामकारकरित्या

काव्यात्म अभिव्यक्ती

**अभिव्यक्ती कृती अपेक्षित मुद्दे**

स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी- ह्यांतच सर्व सामावले - जगातील कोणतीही माता-मानव-मानवेतर-ममत्व,काळजी-अपत्यासाठी जीवही धोक्यात.

**सराव कृती- आकलन**

कोण ते लिहा.

१) आकाशाकडे बघणारी

२) घरट्याच्या दिशेने चोचीने ओढला जाणारा

**सराव कृती - स्वमत**

१) व्यंगचित्रं ही नि:शब्द भाषा आहे.- स्पष्ट करा.

२) "स्त्रीभ्रूणहत्येबद्दलचं एक पोस्टर त्यातून तयार झालं", हे विधान उलगडून दाखवा.

**सराव कृती -अभिव्यक्ती**

१) तुम्हांला आवडणाऱ्या एखाद्या कलेविषयी लिहा.

२) मानव व कला यांचा सहसंबंध स्पष्ट करा.

****************************************************

# अपठित गद्य

**(इ) पुढील उताऱ्याच्या आधारे सूचनांनुसार कृती करा :**

य) लेखिकेला जाणवलेली जगाची रूपे .---------.

र) मयसभेच्या जमिनीचे वैशिष्ट्य-----------

मैत्रीमध्ये सहवासाला काही महत्त्व असतेच, जुन्या लोणच्यासारखी जुनी मैत्री मुरत जाते. एकमेकांचे स्वरूप एकमेकांना बरेचसे कळलेले असते. त्यामुळे अशा मित्रासमोर किंवा मैत्रिणीसमोर आपली विशिष्ट प्रतिमा उभी करण्याची गरज राहत नाही. आपण जसे आहोत तसे, निखळपणे, निर्भरपणे आपण तिथे प्रकट होतो. या साध्या स्वाभाविक संबंधांतून आपल्याला एक स्थैर्य लाभते. भोवतालच्या फसव्या, अस्थिर, धूर्त, मतलबी जगात मैत्रीची अशी स्वाभाविक, सहज स्थाने म्हणजे आपला एक मोठा आधार असतो. तिथे पायाखालची जमीन ही जमीनच असते. मयसभेप्रमाणे जमीन समजून पाय टाकावा, तर तो पाण्यात खोल जावा आणि पाणी समजून पाऊल टाकायला जावे, तो टणक, खडबडीत जमीन लागावी, असे या मैत्रीत घडत नाही. म्हणून मैत्रीचे असे एखादे तरी ठिकाण माणसाला हवेच. शांता शेळके (आनंदाचे झाड)

३) कारण लिहा :

मित्रमैत्रिणीसमोर आपली विशिष्ट प्रतिमा उभी करण्याची गरज राहत नाही ; कारण....

**वरील उताऱ्यातील आकलन कृतीची उत्तरे –**

१) फसवे, अस्थिर, धूर्त, मतलबी

२) मयसभेप्रमाणे जमीन समजून पाय टाकावा, तर तो पाण्यात खोल जावा आणि पाणी समजून पाऊल टाकायला जावे, तो टणक, खडबडीत जमीन लागावी.

३) जुन्या लोणच्यासारख्या मुरलेल्या मैत्रीमुळे एकमेकांचे स्वरूप एकमेकांना बरेचसे कळलेले असते.

*****************************************************

# पद्य विभाग

( कवितेचे क्रमांक पाठ्यपुस्तकातील क्रमांकाप्रमाणे दिले आहेत. )

| | | |
|---|---|---|
| २. रोज मातीत | : | कल्पना दुधाळ |
| ४. रे थांब जरा आषाढघना | : | बा. भ. बोरकर |
| ६. रंग माझा वेगळा | : | सुरेश भट |
| ७. विंचू चावला (भारूड) | : | संत एकनाथ |
| ९. समुद्र कोंडून पडलाय | : | वसंत आबाजी डहाके |
| ११. आरशातली स्त्री | : | हिरा बनसोडे |

## पद्य विभाग परिचय

विद्यार्थी मित्रांनो, पद्य विभागातील पद्यांचा अभ्यास उत्तम करायचा असेल तर कवितेचा भाव किंवा अर्थ समजून घेण्याबरोबरच त्या भागावर कृतिपत्रिकेत येणाऱ्या कृतींची रचना ही जाणून घेणे आवश्यक आहे .

आपल्या पाठ्यपुस्तकात एकूण सहा कविता अभ्यासासाठी दिलेल्या आहेत पैकी कृतिपत्रिकेमध्ये आठ गुणांसाठी एका पूर्ण कविता देण्यात येते. त्यानंतर अर्थ लिहिण्यासाठी आधी दिलेली कविता वगळून उरलेल्या कवितांपैकी एका कवितेतील कडवे देण्यात येते आणि त्यानंतर काव्यसौंदर्य व रसग्रहण करण्यासाठी उरलेल्या वेगवेगळ्या कवितांतील एकेक कडवे देण्यात येते, म्हणजेच पद्य विभागासाठी पाठ्यपुस्तकात दिलेल्या सहा कवितांपैकी कोणत्याही चार कवितांचा विचार कृतिपत्रिका तयार करताना केला जातो.

याचाच अर्थ या विभागातील सर्वच कवितांचा अभ्यास आपल्याला सोप्या पद्धतीने करायचा आहे.

# कृतिपत्रिकेतील पद्य विभागाची रचना

## विभाग २: पद्य (१६ गुण)

**कृती २ अ ) पाठ्यपुस्तकातील संपूर्ण कविता उतारा (८गुण)**

१) आकलन कृती २गुण

२)आकलन कृती २ गुण

| पाठ्यपुस्तकातील कोणतीही संपूर्ण कविता |
|---|

३)अभिव्यक्ती ४ गुण

**टीप :**

१. आकलन कृती या चौकट काढून त्यात नेमक्या शब्दांत मांडायच्या असतात.

२. अभिव्यक्ती म्हणजे या कृतीत स्वतःचा अनुभव कल्पना मांडणे अपेक्षित असते.

**कृती २ आ) ओळींचा सरळ अर्थ लिहा. (४ गुण )**

| “अ”साठी वापरलेली कविता सोडून उरलेल्या कोणत्याही कवितेतील एक कडवे अर्थ लिहिण्यासाठी दिले जाते. |
|---|

इ) काव्यसौंदर्य (४ गुण)

| ‘अ' आणि ‘आ’ साठी वापरलेल्या कविता सोडून उरलेल्या कोणत्याही कवितेतील एक कडवे काव्यसौंदर्यासाठी दिले जाते. |
|---|

किंवा

इ) रसग्रहण

| “अ” आणि “आ” आणि “काव्यसौंदर्य” यासाठी वापरलेल्या तीन कविता सोडून उरलेल्या कवितांपैकी एका कवितेचे कडवे रसग्रहणासाठी देण्यात येते. |
|---|

**विद्यार्थी मित्रांनो,**

आता कृतिपत्रिकेतील पद्य विभागासाठी विचारल्या जाणाऱ्या कृतींची रचना तुमच्या लक्षात आलीच असेल. या कृती सोडवताना प्रत्येक कवितेतून तुम्हाला समजलेला भाव आणि तुमच्या जवळ असणारे निरीक्षण तुमचा अनुभव त्यावर तुमचे असणारे मत लक्षात घेतले की या सर्व कृती छान लिहिता येतात. चला ! यापुढे आपण प्रत्येक कविता स्वतःच्या नजरेने पाहण्याचा प्रयत्न करू.

# २. रोज मातीत

कवयित्री - कल्पना दुधाळ

**कृती २ अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा . (८)**

१) खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा. (२)

य) प्रत्येक गोष्टीची जमवाजमव करत आपला संसार जोडण्याचा प्रयत्न करत राहते. [ ] (१)

(कांड्या- कांड्यानी, संसार सांधते )

र) संसारासाठी रोजच्या रोज कष्ट करत राहते. [ ] (१)

(रोज मातीत मी ग नांदते)

२) कवितेतील स्त्रीने शेतात घेतलेली पिके (२)

य) ¬--------- (१) (कांदा, झेंडू, ऊस)

र) ¬--------- (१)

सरी- वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांदं ग ,जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते
रोज मातीत ,मी ग नांदते
बाई नांदते

फुलं सोन्याची ,झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुल ग ,देह तोडते
बाई तोडते
घरादाराला, तोरण बांधते
बाई बांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

ऊस लावते, बेणं दाबते
बाई दाबते
नाही बेणं ग , मन दाबते
बाई दाबते
कांड्या कांड्यांनी संसार सांधते
बाई सांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

उन्हातान्हात , रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन ,मागे उरते
बाई उरते
खोल विहिरीचं ,पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत ,मी ग नांदते
बाई नांदते

**३) अभिव्यक्ती** (४)

शेतकरी स्त्रीचे कुटुंबासाठीचे जगणे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

**सराव कृती ( आकलन )**

१. हिरवं गोंदण लेणारी -
२. फुले तोडताना मनात येणारी भावना -
३.घरादाराची शोभा वाढवणारे-
४. कवितेतील स्त्री करत असलेली कामे - ¬------- ¬-------
५. खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा.
 १. गोंदणाच्या हिरव्या नक्षीप्रमाणे शेत पिकाने सजवते.
 २. स्वतःचा जीवच जणू कांद्याच्या रोपाच्या रूपात लावते.
 ३. बियाण्याच्या रूपाने जणू स्वतःच्या मनातील इच्छांना मुरड घालते.

**सराव कृती ( अभिव्यक्ती)**

१. शेतात काम करत असताना शेतकरी स्त्रीच्या मनात येणारे विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.
२. शेतकरी स्त्रीच्या कष्टमय जीवनप्रवासाचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

## कवितेचा आशय

**टीप - या पुढील कृती म्हणजे काव्यसौंदर्य आणि रसग्रहण. यासाठी या कवितेतील कोणतेही एक कडवे आल्यास पुढे थोडक्यात दिलेल्या आशयाचा उपयोग करून स्वतःच्या विचाराने कृती सोडवावी.**

सरी- वाफ्यात, कांदं लावते
बाई लावते
नाही कांदं ग ,जीव लावते
बाई लावते
काळ्या आईला, हिरवं गोंदते
बाई गोंदते
रोज मातीत ,मी ग नांदते
बाई नांदते

"रोज मातीत" या कवितेत शेतात कष्ट करणाऱ्या आणि संसारात कुटुंबासाठी राबणाऱ्या शेतकरी स्त्रीचे भावविश्व कवयित्री कल्पना दुधाळ यांनी अत्यंत सोप्या शब्दात मांडले आहे.

शेतात काम करणे आणि कुटुंबासाठी घरात वावरणे हे सारे रोजच करावे लागते. या दोन्हीतील सारखेपणा यातून दाखवून दिला आहे.

वरील पंक्तीत शेताच्या मातीत रोज कष्ट करणाऱ्या स्त्रीच्या मनातील भावना व्यक्त झाल्या आहेत. शेतात सरी वाफ्यामध्ये कांद्याचे रोप लावताना त्या रोपाने जगावे यासाठी जणू काही आपला जीवच मातीत पेरते आहे ,अशी भावना या शेतकरी स्त्रीच्या मनामध्ये आहे. शेती आणि संसार या दोन्ही गोष्टी जीव ओतून करायच्या असतात. ज्याप्रमाणे कांद्याचे रोप एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाढण्यासाठी लावले जाते तसेच प्रत्येक स्त्रीचे आयुष्य आहे. जन्म घेतलेल्या घराला सोडून दुसऱ्या घरी रुजण्यासाठी तिलाही जावे लागते ,परंतु या सगळ्या गोष्टीत जीव लावला की सारा थकवा अडचणी दूर होतात. या काव्यपंक्तींमधून शेतात काम करणे आणि संसारात रमणे या दोन्ही गोष्टी मनापासून करण्याचे शेतकरी स्त्रीच्या भावनातून कवयित्रीने सांगितले आहे.

फुलं सोन्याची ,झेंडू तोडते
बाई तोडते
नाही फुलं ग ,देह तोडते
बाई तोडते
घरादाराला, तोरण बांधते
बाई बांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

शेतामध्ये आलेले झेंडूची फुले तोडताना शेतकरी स्त्री अतिशय हळवी होते . झाडापासून त्याचे फूल तोडून वेगळे करणे आणि आईपासून बाळाची नाळ तोडणे यातून विलग होताना जाणवणाऱ्या भावना कवयित्रीने “देह तोडणे” या अचूक शब्दांत व्यक्त केले आहे. तोडलेल्या फुलांनी घरादाराला तोरण बांधून सुशोभित करता येत. त्याचप्रमाणे मुले ही घरातील फुलेच असतात आणि आपल्या गुणांनी, ज्ञानाने कुटुंबाची शोभा वाढवतात अशी भावना झेंडूची फुले तोडताना शेतकरी स्त्रीच्या मनात येतं. शेतात काम करताना शेतकरी स्त्रिया आपले जगणे अनुभवत आहे हे तिचे अनुभवणे वरील पंक्तींमधून कवयित्रीने अचूकपणे व्यक्त केले आह.

ऊस लावते, बेणं दाबते
बाई दाबते
नाही बेणं ग , मन दाबते
बाई दाबते
कांड्या- कांड्यांनी संसार सांधते
बाई सांधते
रोज मातीत, मी ग नांदते
बाई नांदते

शेतामध्ये ऊस लागवडीचा हंगाम सुरू आहे ,अशावेळी उसाचं बेणं पायाच्या अंगठ्याने दाबण्याचं काम शेतकरी स्त्री करत आहे. हे बेणं दाबल्यामुळे मातीतून उसाचं पीक उगवणार आहे आणि त्याचा गोडवा अनुभवता येणार आहे. ही कृती करताना शेतकरी स्त्रीला जाणवते की आपला संसार फुलवताना आपणही अशाच अनेक इच्छा ,आकांक्षा ,स्वप्न अगदी सहज दाबून टाकली आहेत .

काही वेळा कुटुंबासाठी आपल्या मनातील भावना दाबणे महत्त्वाचे असते. दाबलेल्या बेण्याला मातीत गाडण्याचा जसा त्रास वाटत नसतो तसाच संसार फुलवण्यासाठी अनेकदा बाजूला कराव्या लागणा-या इच्छांबद्दल या स्त्रीला फारसा त्रास वाटत नाही कारण कुटुंबातील सर्वांना सांभाळून तिला तिचे घरटे सांधायचे असते . शेतामध्ये काम करताना बेण्याचं मातीत मिसळणं आणि संसारामध्ये स्त्रीचे गुंतून जाणं यासाठी कवियत्रीने “सांधणे आणि नांदणे” ही क्रियापदे चपखल वापरली आहे.

उन्हातान्हात, रोज मरते
बाई मरते
हिरवी होऊन,मागं उरते
बाई उरते
खोल विहिरीचं,पाणी शेंदते
बाई शेंदते
रोज मातीत,मी ग नांदते
बाई नांदते

शेतामध्ये काम करताना ऊन ,वारा ,पाऊस ,दुष्काळ अशा अनेक संकटांना सामोरे जावे लागते आणि शेतीचे रक्षण करावे लागते .याचेच वर्णन कष्टकरी शेतकरी स्त्रीने -उन्हातानात रोज मरणे -असे केले आहे .

शेतामधील काम पूर्ण झाल्यावर ही विश्रांती घेण्याची मुभा शेतकरी स्त्रीला नाही कारण घरादारातील कामांसाठी तिला शेवटपर्यंत आपली ताकद टिकून ठेवावी लागते. अशावेळी आपल्या कामातील उत्साह टिकवणे म्हणजे हिरवी होऊन मागे उरणे असते. शेतात उगवलेल्या समृद्धीच्या रूपात शेतकरी स्त्रीचे कष्ट मागे उरतात. यासाठी तिला रोजच खोल विहिरीतून पाणी काढून सर्वांना जीवन द्यावे लागते . या साऱ्यातून शेतकरी स्त्रीला रोजच जायचे आहे ही उभारी टिकवून ठेवण्याची प्रेरणा वरील पंक्तीतून कवयित्रीने व्यक्त केली आहे.

************************************************************

# ४. रे थांब जरा आषाढघना

**कवी – बा.भ.बोरकर**

कृती २ अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा . (८)

१) खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा. (२)

य) सूर्याचे घर मोकळे कर. (१)

(खुलें कर वासरमणि-घर)

र) पक्ष्यांच्या गोड गाण्यांनी गवतांच्या पानांवर शहारा येऊदे. (१)

( कंठ खगांचा मधु गानाने आणीत शहारा तृणपर्णां )

**२) कृती सोडवा.** (२)

१) आषाढघनाकडे चोरून बघणा-या - ¬----- (१)

(जाईच्या लेकी)

२) उन्हाच्या रंगासाठी कवितेत आलेले वर्णन - ¬-------- (१)

(कोवळ्या नव्या हळदुव्या उन्हा)

रे थांब जरा आषाढघना
बघुं दे दिठि भरून तुझी करूणा

कोमल पाचूंचीं ही शेतें
प्रवाळ मातीमधलीं औतें
इंद्रनीळ वेळूंचीं बेटें
या तुझ्याच पदविन्यासखुणा

रोमांचित ही गंध - केतकी
फुटे फुलीं ही सोनचंपकी
लाजुन या जाईच्या लेकी
तुज चोरुन बघती पुन्हापुन्हा

उघड गगन, कर घडीभर आसर
आणि खुलें कर वासरमणि - घर
वाहूं दे या तव किमयेवर
कोवळ्या नव्या हळदुव्या उन्हा

कणस भरूं दे जिवस दुधानें
देठ फुलांचा अरळ मधानें
कंठ खगांचा मधु गानानें
आणीत शहारा तृणपर्णां

आश्लेषांच्या तुषारस्नानीं
भिउन पिसोळी थव्याथव्यांनी
रत्नकळा उधळित माध्यान्हीं
न्हाणोत इंद्रवर्णांत वना

काळोखाचीं पीत आंसवें
पालवींत उमलतां काजवे
करू दे मज हितगूज त्यांसवें
निरखीत जळांतिल विधुवदना

**३)अभिव्यक्ती** (४)

आषाढातील निसर्गाचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा.

**सराव कृती ( आकलन )**

१) रोमांचित झालेली - ¬-------

२) फुलांनी बहरलेली - ¬-------

३) पाण्यामध्ये पाहता येणारे - ¬----

४) काळोखात चमकणारे - ¬------

५) आषाढघनाचे बरसणे थांबल्यास होणारे बदल - ¬-

सराव कृती ( अभिव्यक्ती)

१. आषाढघनाचे महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा.

२. आषाढातील पावसाचा तुम्ही घेतलेला अनुभव शब्दबद्ध करा.

## कवितेचा आशय

**टीप - या पुढील कृती म्हणजे काव्यसौंदर्य आणि रसग्रहण. यासाठी या कवितेतील कोणतेही एक कडवे आल्यास पुढे थोडक्यात दिलेल्या आशयाचा उपयोग करून स्वतःच्या विचाराने कृती सोडवावी.**

रे थांब जरा आषाढघना
बघुं दे दिठि भरून तुझी करूणा

कोमल पाचूंचीं ही शेतें
प्रवाळमातीमधलीं औतें
इंद्रनीळ वेळूंचीं बेटें
या तुझ्याच पदविन्यास खुणा

कवी बा. भ .बोरकर हे “रे थांब जरा आषाढघना” या कवितेत आषाढघनाला थांबण्याची विनंती करत आहेत, कारण आषाढातील निसर्गसौंदर्य अनुभवायचे असेल तर आषाढ मेघाने क्षणभर थांबावे आणि निसर्गात त्यानेच घडवलेली रंगीबेरंगी जादुई किमया पाहण्याची संधी आपणाला द्यावी असे कवीला वाटते.

लालसर मातीतील हिरवीगार शेते, शेतात चाललेली औते, वेळूंची बेटे या त्याच्याच पदनिजखुणा आहेत असे कवीला वाटते. या वर्णनासाठी कवीने पाचू ,प्रवाळ, इंद्रनील अशा रत्नांच्या रंगाची उपमा दिली आहे .

रोमांचित ही गंध - केतकी
फुटे फुलीं ही सोनचंपकी
लाजुन या जाईच्या लेकी
तुज चोरुन बघती पुन्हा पुन्हा

या कडव्यात आषाढ घन हा कवीला एखाद्या तरुण युवकाप्रमाणे वाटतो. त्याच्या येण्यामुळे केतकी रोमांचित होते, सोनंचंपकी बहरून जाते, तर जाई जुईच्या लेकी लाजून बघतात. तरुण वयात एखाद्या व्यक्तीबद्दल वाटणारे प्रेम जणू काही या आषाढघनाबद्दल फुलांना वाटत आहे असे वर्णन कवींनी या पंक्तीत केले आहे. त्यासाठी कवींनी केवडा ऐवजी केतकी ,सोनचाफा ऐवजी सोनचंपकी अशी स्त्री रूपे वापरली आहेत शिवाय रोमांचित होणे, लाजणे, चोरून बघणे या मानवी गुणांचा उपयोग कवींनी निसर्गाशी जोडला आहे. यातून बोरकरांनी चेतनगुणोक्ती या अलंकाराचा वापर किती कल्पकतेने केलेला आहे हे दिसून येते.

उघड गगन, कर घडीभर आसर
आणि खुलें कर वासरमणी - घर
वाहूं दे या तव किमयेवर
कोवळ्या नव्या हळदुव्या उन्हा

आषाढघनाच्या बरसण्यामुळे अनेक दिवस स्वच्छ आकाशाचे दर्शन झालेच नाही आणि त्या पिवळसर उन्हामध्ये फुललेल्या हिरवळीची शोभा कवीला पाहता आली नाही. त्यामुळे वासर-मणी घर म्हणजे सूर्य जिथे राहतो ते घर (आकाश)खुले करण्याची विनंती कवी आषाढघनाला करतात . हे घर खुले झाल्यामुळे हिरव्यागार निसर्गावर कोवळ्या पिवळ्या उन्हाचा साज चढेल आणि ही निसर्गाची किमया पाहता येईल असे कवीला वाटते.

कणस भरूं दे जिवस दुधानें
देठ फुलांचा अरळ मधानें
कंठ खगांचा मधु गानानें
आणीत शहारा तृणपर्णा

आषाढामधल्या पावसात शेतामध्ये लावलेल्या रोपातून कणसे तयार होण्याची प्रक्रिया सुरू होते आणि नुकत्याच उगवलेल्या रानवेलींना,फुलझाडांना फुले येण्याची क्रिया सुद्धा सुरू होते. कणसाच्या दाण्यांनी जिवस दुधाने भरावे आणि फुलांनी अरळमधाने भरून जावे असे कवीला वाटते कारण शेतात उगवलेल्या दाण्यांवरती आणि फुलांवरती माणसांप्रमाणे पक्षी ,पाखरे यांचाही अधिकार असतो आणि अशा पौष्टिक अन्नानी भरलेल्या निसर्गात या पाखरांच्या कंठांमधून आनंदाचे सूर उमटतात आणि ते ऐकून इवल्या इवल्या गवत पात्यांना सुद्धा आनंदाचा शहरा येतो. हे दृश्य अनुभवता येते.

आश्लेषांच्या तुषारस्नानीं
भिउन पिसोळीं थव्याथव्यांनीं
रत्नकळा उधळित माध्यान्हीं
न्हावोत इंद्रवर्णांत वना

आषाढ महिन्यातील आश्लेषा नक्षत्रावर पडणाऱ्या थेंबांमध्ये सारा निसर्ग चिंब भिजला आहे  या नक्षत्रावर पडणारा पाऊस हा मुसळधार असतो आणि त्यामुळे पिसोळ्यांना भीती वाटू लागते. भर माध्यान्ही ऊन न पडता आषाढाच्या ढगांनी अंधार केलेला असल्यामुळे रत्नजडित पंखांच्या फुलपाखरांच्या थव्यांना इंद्रवर्ण वनाचा आनंद घेता येत नाही. आषाढघनाने आपले बरसणे थांबवले तर सर्वांनाच थोडासा धीर येईल आणि इंद्रवर्णाप्रमाणे असणाऱ्या निसर्गाचा आनंद घेता येईल असे कवीला वाटते.

काळोखाचीं पीत आंसवें
पालवींत उमलतां काजवे
करूं दे मज हितगूज त्यांसवें
निरखीत जळांतिल विधुवदना

आषाढघनाला बरसण्यापासून थांबवताना वरील पंक्तीत कवी थोडेसे अंतर्मुख होतात. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये आषाढघनाप्रमाणे अनेक सुख-दुःखाचे प्रसंग येतच असतात.  ते ज्याचे त्याला पचवावे लागतात.  यालाच कवींनी “काळोखाचीं पीत आंसवें” असे म्हटले आहे .

प्रत्येकाच्या आतमध्ये असलेल्या प्रेरणाशक्तीला कवींनी पालवीत उमलणाऱ्या काजव्याची उपमा दिली आहे. काळोखासारख्या कठीण प्रसंगांना तोंड देताना आपल्यातील प्रेरणाशक्तीला ओळखावे,  तिच्याशी सुखसंवाद करावा असे कवीला वाटते. त्यासाठी कवींनी शांत तळ्यात पडलेल्या चंद्रबिंबाला पाहता येईल अशी जागा निवडली आहे.  दुःखामुळे मनाच्या तळ्यात अनेक तरंग उठतात. हे मनातील पाणी शांत झाले तरच आपण आपल्यातील चंद्रबिंब पाहू शकतो हे कवींना  ठाऊक आहे म्हणूनच ते आषाढघनाला विनंती करतात आणि बरसण्यापासून थांबायला सांगतात.

**************************************************

# ६. रंग माझा वेगळा

## कवी – सुरेश भट

**कृती २अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा .** (८)

१) कृती सोडवा.

य) अश्रूंची सोबत कवीला यासारखी वाटते. - ¬--- (१)

(गीतांपरी)

र) इतरांना सुखावणाऱ्या परंतु कवीला झळा पोहोचवणारी गोष्ट - ¬--------- (१)

(सावल्या)

२) कवींसोबत पुढील गोष्टींनी केलेले वर्तन -

य) आयुष्य - ¬-------- (१)

(गळा कापून गेले.)

र) तात्पर्य - ¬------- (१)

(खोट्या दिशा सांगणे)

रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा !
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा !

कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे ,
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा !

राहती माझ्यासवें ही आसवें गीतांपरी;
हें कशाचें दुःख ज्याला लागला माझा लळा !

कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा !

सांगती "तात्पर्य" माझें सारख्या खोट्या दिशा,
"चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा !"

माणसांच्या मध्यरात्रीं हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा!

**३) अभिव्यक्ती** (४)

दुःखाच्या प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी तुम्हाला माहीत असणारे उपाय लिहा.

सराव कृती ( आकलन)

१) कवीच्या सोबत कायम राहणारी ¬------

२) माणसांच्या जीवनातील कवीची भूमिका ¬-----

३)कवीचे वेगळेपण ¬-------

४)कवीला दिसणारा खोटेपणा ¬---------

**सराव कृती ( अभिव्यक्ती )**

१) तुमच्यामधील इतरांपेक्षा वेगळे असणारे गुण लिहा.

२) “दु:खांमुळे सुखाचे महत्त्व कळते” या विषयी तुमचे मत लिहा.

३) कठीण प्रसंगात आपले वागणे कसे असावे, असे तुम्हाला वाटते ते स्पष्ट करा.

# कवितेचा आशय

**टीप - या पुढील कृती म्हणजे काव्यसौंदर्य आणि रसग्रहण. यासाठी या कवितेतील कोणतेही एक कडवे आल्यास पुढे थोडक्यात दिलेल्या आशयाचा उपयोग करून स्वतःच्या विचाराने कृती सोडवावी.**

रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा !
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा !

कवी सुरेश भट यांची अत्यंत गाजलेली गझल म्हणजे “रंग माझा वेगळा !” जीवनाच्या सगळ्या रंगांमध्ये रंगूनही माझा रंग वेगळा आहे, अनेक गुंत्यांत गुंतूनही माझा पाय त्यात अडकून पडला नाही असे कवी म्हणतात. यावरून कवीच्या जगण्यातील “कलंदर” वृत्ती आपल्याला दिसून येते.

कवीच्या जीवनाचा आढावा घेतला तर कवी सुरेश भट हे गझलकार, कवी, पत्रकार, संपादक, शिक्षक,गायक, संगीतकार पेटीवादक, बासरी वादक, नेमबाजी, तलवारबाजी या सगळ्यात निष्णात होते, परंतु हे सारे म्हणजे सुरेश भट नाहीत. त्याहीपेक्षा कवींचे वेगळे अस्तित्व आहे या सगळ्या भूमिकांत ते अडकून पडले नाहीत त्यामुळे कोणताही एकच शिक्का त्यांच्या कार्यावर पडत नाही. ज्याप्रमाणे मीठ किंवा साखर एखाद्या पदार्थात पूर्णपणे मिसळून जाते. ती वेगळी काढता येत नाही ,मात्र चवीच्या बाबतीत स्वतःची वेगळी जाणीव हे पदार्थ दाखवून देतात तसेच सुरेश भटांचे जीवन आहे असे कवींना या ओळीतून सुचवायचे आहे.

कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे,
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा !

"रंग माझा वेगळा" या गझलेमध्ये कवी सुरेश भटांच्या जगण्याचे अनेक रंग मांडले आहेत. वरील शेरातून कवींनी "सावल्या" आणि "झळा" या परस्पर विरुद्ध असणाऱ्या प्रतीकांचा वापर केला आहे.

आपल्या आयुष्यात आलेल्या चार सुखाच्या क्षणांना कवीने "सावल्या" असे म्हटले आहे. सावल्या या नेहमी मनाला शांतता आणि तनाला गारवा देतात, म्हणून त्यांचा त्रास होत नसतो. मात्र कवींना या सावल्यांमुळे झळा सहन कराव्या लागल्या आहेत.

कवी सुरेश भटांच्या जीवनात आलेल्या सुखाच्या सावल्या म्हणजे त्यांची गाजलेली गाणी आणि लोकप्रियता, परंतु याचे श्रेय कवीच्या शब्दांना मिळाले नाही. शिवाय "भटांनी कवितेचा व्यापार केला" अशा अनेक आरोपांनी म्हणजे झळांनी कवींना त्रास दिला. इतरांच्या आयुष्यात येणाऱ्या सावल्या त्यांना सुख देणाऱ्या असतात परंतु कवींच्या वाट्याला आलेल्या सुखाच्या सावल्यांनी त्यांना त्रासच दिला असे कवी सांगतात.

राहती माझ्यासवें ही आसवें गीतांपरी;
हें कशाचें दुःख ज्याला लागला माझा लळा !

कवी सुरेश भट आपल्या जीवनात आलेल्या दु:खांविषयी कधीही तक्रार करत नाहीत किंवा आलेल्या दुःखांना दूरही लोटत नाहीत. ज्याप्रमाणे एखादे गीत आपण सहज गुणगुणावे त्याप्रमाणे प्रत्येक दुःखाचा सहजतेने कवी स्वीकार करतात त्यामुळे दुःखांना देखील कवीकडे अधिक यावेसे वाटते . एखाद्याला आपली ओढ लागली की आपल्याला भेटण्यासाठी ती व्यक्ती आतुर असते त्याप्रमाणे दुःखांना सुद्धा कवी सुरेश भटांचा लळा लागला आहे.

जगात दुःखांना कोणीही स्वीकारत नाही परंतु कवीच्या आयुष्यात आलेल्या दुःखांना कवीने स्वीकारले. जगाने नाकारलेल्या दुःखाला आपल्यावरही कुणीतरी प्रेम करत आहे याची जाणीव झाल्याने सातत्याने ही दु:खे कवीकडे झेपावत आहेत असे वर्णन कवी वरील शेरांमध्ये करत आहेत. दु:खाला स्वीकारण्याचा नवा दृष्टिकोन कवी वरील पंक्तींमधून आपल्याला देतात.

कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा !

कवी सुरेश भट यांच्या "रंग माझा वेगळा" या गझलेत त्यांच्या कलंदरपणामुळे आलेले अनेक जगावेगळे अनुभव कवींनी मांडले आहेत. कवी म्हणतात,"प्रत्येक वेळी मी दुःखाला स्वीकारत गेलो, त्याबद्दल तक्रार केली नाही. समोरून येणारे अनेक वार मी झेलण्यासाठी सज्ज होतो परंतु भ्याडपणाने या समाजाने माझ्या पाठीलाच चावण्याचा प्रयत्न केला." म्हणजेच अनेक आरोप दोषारोप कवींवर झाले. तरीही "सगळं काही ठीक होईल असं वाटत असताना माझ्या आयुष्यानेच माझा गळा कापला" असे कवी म्हणतात.

"गळा कापणे" म्हणजे "विश्वासघात करणे" आपल्या जीवनात दुःख आहे , त्या सकट आयुष्य जगण्याची कवीची तयारी आहे, परंतु जे आयुष्य जगायचे आहे त्या आयुष्याने मात्र कवीची साथ सोडली याचे वर्णन करताना कवी अत्यंत हृदयभेदक शब्द वापरतात "आयुष्य गेले कापुनी माझा गळा."

सांगती “तात्पर्य” माझे सारख्या खोट्या दिशा,
“चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा !”

लहानपणापासूनच कवीच्या वाट्याला अमाप दुःख, मानहानी ,खोटेपणा आला. कवींनी “गझल” या काव्यप्रकाराची नव्याने ओळख समाजाला करून दिली परंतु या सगळ्या कार्याचा समाजाने चुकीचा अर्थ घेतला. “तात्पर्य” म्हणजे समाजाने काढलेला निष्कर्ष. कवी सुरेश भट यांच्या वाट्याला खोट्या दिशा आल्या म्हणजे त्यांच्या प्रत्येक कृतीचा चुकीचा अर्थ काढला गेला. “गझल हे अधम प्रकारचे काव्य आहे, त्यामुळे भटांनी तरुण पिढीला बरबाद केले, भटांचा भटारखाना” अशा प्रकारचे अनेक आरोप समाजाने त्यांना चिकटवले.

कवींच्या अघळपघळ राहण्यावर,दिसण्यावर, खाण्यावर चर्चा झाल्या परंतु त्यांच्या संपूर्ण काव्यावर समाजाने कधीही चर्चा केली नाही. या काढलेल्या चुकीच्या अर्थाला सामान्य माणसाने खरे मानले. ज्याप्रमाणे चालता येते तो पांगळा नसतो आणि ज्याला पाहता येते तो आंधळा नसतो हे माहीत असूनही कवींचे चित्र जे रंगवले गेले त्यालाच समाजाने खरे मानले. कोणीही त्यातील सच्चेपणा तपासला नाही याचे वर्णन करताना कवी म्हणतात, “ सांगती तात्पर्य माझे सारख्या खोट्या दिशा, चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा.”

माणसांच्या मध्यरात्रीं हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा!

कवी स्वतःला “माणसांच्या मध्यरात्री हिंडणारा सूर्य” असे म्हणतात. सूर्य म्हणजे आशेचा प्रकाशमान किरण. माणसांच्या मध्यरात्री म्हणजेच माणसांच्या वाट्याला येणाऱ्या संकटांच्या काळाकुट्ट अंधाराच्या, दुःखाच्या काळात कवी सूर्य बनून जाणार आहे. म्हणजेच गरज पडली तर अन्यायविरुद्ध पेटून उठण्याची हिंमत सुद्धा कवी दाखवणार आहेत, कारण जसा सूर्याला त्याच्या प्रखरतेचा त्रास होत नसतो तसाच कवींना कोणत्याही दुःखाचा त्रास होत नाही. दुःखाला कवटाळून बसण्याचे सोहळे त्यांच्या जीवनात नाहीत कारण लहानपणापासूनच दुःखाला कवींनी आपलेपणाने वाढवले आहे. त्यामुळे वाट्याला आलेले दुःख सोसण्यासाठीचे बळ कवीच्या जीवनातून प्रेरणा घेऊन अनेकांना समजेल असे कवींना वाटते.

*****************************************************

# ७. विंचू चावला

– संत एकनाथ

**कृती २ अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा .** (८)

१) कृती सोडवा.

य) विंचूरूपी विकार – ¬------ (१)

(कामक्रोध)

र) व्याकुळ होणारे – ¬-------- (१)

(पंचप्राण)

२) काय घडले ते लिहा.

य) इंगळीने नांगी मारल्यामुळे – ¬------- (१)

(सर्वांगी वेदना होऊ लागल्या)

र) उतारा दिल्यामुळे – ¬-------- (१)

(तमोगुण दूर झाला)

विंचू चावला वृश्चिक चावला।
कामक्रोध विंचू चावला।
तम घाम अंगासी आला ॥धृ ॥

पंचप्राण व्याकुळ झाला।
त्याने माझा प्राण चालिला।
सर्वांगाचा दाह झाला ॥१ ॥

मनुष्य इंगळी अति दारुण।
मज नांगा मारिला तिनें।
सर्वांगी वेदना जाण।
त्या इंगळीची ॥ २ ॥

ह्या विंचवाला उतारा।
तमोगुण मागें सारा।
सत्त्वगुण लावा अंगारा।
विंचू इंगळी उतरे झरझरां ॥३॥

सत्त्व उतारा देऊन।
अवघा सारिला तमोगुण।
किंचित् राहिली फुणफुण।
शांत केली जनार्दनें ॥४॥

**३. अभिव्यक्ती** **(४)**

"काम आणि क्रोध या विकारांवर ताबा मिळवणे आवश्यक आहे," याबद्दल तुमचे मत लिहा.

**सराव कृती ( आकलन)**

१) विंचू चावल्यामुळे झालेला त्रास – ¬---------- ¬-----------

२) मनुष्य इंगळीचे स्वरूप – ¬------------

३) विंचू उतरवण्यासाठी नाथांनी सांगितलेला उपाय –

४) उतारा देऊनही राहिलेल्या त्रासावरील उपाय –

सराव कृती (अभिव्यक्ती)

१) "सद्‌गुणांची संगत हा सर्व दाह शांत करणारा उपाय आहे ." हे विधान स्पष्ट करा.

२) स्वतःमध्ये जाणवलेला एखादा दुर्गुण कमी करण्यासाठी तुम्ही कसा प्रयत्न कराल ते लिहा.

## कवितेचा आशय

**टीप - या पुढील कृती म्हणजे काव्यसौंदर्य आणि रसग्रहण. यासाठी या कवितेतील कोणतेही एक कडवे आल्यास पुढे थोडक्यात दिलेल्या आशयाचा उपयोग करून स्वतःच्या विचाराने कृती सोडवावी.**

विंचू चावला वृश्चिक चावला।
कामक्रोध विंचू चावला।
तम घाम अंगासी आला॥धृ॥

पंचप्राण व्याकुळ झाला।
त्याने माझा प्राण चालिला।
सर्वांगाचा दाह झाला॥१॥

आपल्या मनातील भावभावनांवर आरूढ होणारे काव्य म्हणजे "भारूड".मनाची चटकन पकड घेत, हसवत -हसवत आपल्यातील दोषांची जाणीव करून देणारे "विंचू चावला" हे भारुड एक आध्यात्मिक रूपक आहे .

माणसाला ओळखीच्या वाटणाऱ्या अनेक गोष्टींची निवड नाथांनी भारुडासाठी केली. "विंचू चावणे" याचा अनुभव त्याकाळी अनेकांना सहज प्राप्त असल्यामुळे नाथांची ही रचना विंचू या फारशा लक्षात न येणाऱ्या क्षुल्लक प्राण्याच्या वृत्तीवर आधारित आहे. नाथांच्या भारुडातील हा विंचू म्हणजे वृश्चिक हा काम आणि क्रोध या विकाराचे प्रतीक आहे. "काम" म्हणजे माणसाच्या प्रचंड वाढत जाणा-या इच्छा, विषयवासना, स्वार्थीपणा तर "क्रोध" म्हणजे राग, संताप, अनिर्बंध इच्छा.

मनुष्य इंगळी अति दारुण।
मज नांगा मारिला तिनें।
सर्वांगी वेदना जाण।
त्या इंगळीची॥ २॥

प्रत्येक माणसाच्या ठायी काम आणि क्रोध असतोच परंतु त्याची प्रमाणापेक्षा जास्त वाढ झाली, तर तो माणूस विंचू चावल्याप्रमाणे बेभान आणि बेताल वागू लागतो. विंचवाच्या चावण्यामुळे शरीरात विष भिनते, असह्य वेदना निर्माण होतात तसेच काम आणि क्रोधाच्या माध्यमातून विवेक, विचार ,चांगुलपणा नष्ट होतो म्हणजेच माणसाचे पंचप्राण व्याकुळ होतात. पंचप्राण व्याकुळ होणे

म्हणजे माणूस हा माणूस न राहता माणुसकीला लाजवेल असे वागू लागतो, म्हणजेच माणूस म्हणून तो शिल्लक राहत नाही त्याचा प्राण निघून जातो, अशा माणसाला नाथांनी विंचवापेक्षा भयंकर असणाऱ्या इंगळीची उपमा दिली आहे. म्हणजेच विंचवापेक्षाही भयंकर असणारी इंगळी जितकी विषारी आहे, तसा काम क्रोधाचा विकार झालेला हा मनुष्य समाजाला घातक आहे असे नाथ वरील रचनेतून आपल्याला समजावतात.

ह्या विंचवाला उतारा।
तमोगुण मागे सारा।
सत्त्वगुण लावा अंगारा।
विंचू इंगळी उतरे झरझरां॥३॥

विंचवाच्या चावण्यामुळे माणसाच्या शरीरात विष भिनून त्याला असह्य वेदना होतात . अशी व्यक्ती बेभान होते. बेताल वागू लागते. माणूस असूनही आपले माणूसपण हरवून बसते . हे लक्षात घेऊन नाथांनी काम आणि क्रोधाच्या विंचवाचे प्रतीक वापरून मानवी जीवन कसे अविचारी होते हे सांगितले आहे. राग, लोभ यात अडकलेल्या माणसाला बाहेर काढण्यासाठी नाथ आपल्याला सत्त्वगुणांचा आश्रय घ्यायला सांगतात.

सत्त्व उतारा देऊन।
अवघा सारिला तमोगुण।
किंचित् राहिली फुणफुण।
शांत केली जनार्दनें॥४॥

त्याकाळी माणसाची अंधश्रद्धा लक्षात घेऊन नाथांनी उपाय ऐवजी “उतारा” असा शब्दप्रयोग वापरला आहे तर औषध ऐवजी “अंगारा” हा शब्दप्रयोग ते करतात. यातून नाथांनी त्याकाळच्या समाजातील अंगारे-धुपारे वापरणाऱ्या अंधश्रद्धेवर प्रहार केला आहे. अंगारा याचा अर्थ “अंगीकार करा” असाही होतो, म्हणजेच सद्‌गुण अंगीकार केल्यामुळे दुर्गुण झराझरा उतरतील, कमी होतील असे नाथांना सांगायचे आहे.

तरीही कुठे ना कुठे तरी काम क्रोधरूपी विंचवाची फुणफुण राहतेच. ती पूर्णपणे निघून जाण्यासाठी मात्र नाथ आपल्याला त्यांचे गुरु जनार्दन स्वामी यांना शरण जा असे सुचवतात.

एकूणच माणसाच्या अंगी असणाऱ्या विकारांना दूर करण्यासाठी माणसाने संतांच्या, सद्‌गुणी वृत्तीच्या माणसांमध्ये अधिकाधिक राहावे म्हणजे आपल्यातील दुर्गुणांना आपण संयमाने जिंकू शकतो असे नाथ “विंचू चावला” या भारुडातून समजावतात.

****************************************************

# ९. समुद्र कोंडून पडलाय

कवी – वसंत आबाजी डहाके

**कृती २अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा .** (८)

१) कृती करा.

य) उंचच उंच पण अरुंद झालेलं बालपण - ¬---- (१)

(बत्तिसाव्या मजल्यावरील मुलाचे)

र) समुद्र अस्वस्थ होऊन जातो - ¬----- (१)

(शहराच्या आयुष्याच्या विचाराने)

२) समुद्राला याची काळजी वाटते - ¬---- (२)

(वयस्कांच्या शहरातील सा-यांच्याच बालपणाची)

समुद्र कोंडून पडलाय गगनचुंबी इमारतींच्या गजांआड.
तो संत्रस्त वाटतो संध्याकाळीं: पिंजारलेली दाढी,झिंज्या.
हताशपणे पाहत असतो समोरच्या बत्तिसाव्या मजल्यावरील मुलाकडे,
ज्याचं बालपण उंचच उंच पण अरुंद झालंय
आणि त्याची त्याला कल्पनाच नाही.
समुद्राच्या डोळ्यांत थकव्याचं आभाळ उतरत येतं
आणि शिणून तो वळवतो डोळे.
इमारतींच्या पलीकडच्या रस्त्यावर थकलेल्या माणसांचे पाय, बसचीं चाकं.

समुद्र अस्वस्थ होऊन जातो
शहराच्या आयुष्याच्या विचाराने.
तेव्हा तो मनांतल्या मनांतच मुक्त होऊन फिरूं लागतो
शहरांतल्या रस्त्यांवरून, वस्त्यांमधून.
उशिरापर्यंत रात्री तो बसलेला असतो
स्टेशनवरल्या बाकावर एकाकी, समोरच्या रुळांवरील रहदारी पाहत ,
हातांवर डोकं ठेवून अर्धमिटल्या डोळ्यांनी.
त्याला आठवतं त्याच्याच शेजारीं
पाय मुडपून कसंबसं झोपलेलं एखादं मूल,
ज्याचं बालपण स्टेशनवरल्या बाकाएवढं,
आणि त्याची त्याला कल्पना असावी किंवा नसावी.
समुद्र खिन्न हसतो आणि शिणलेल्या पापण्या मिटून घेतो.
त्याला काळजी वाटते साऱ्यांच्याच बालपणाची वयस्कांच्या शहरांतील.

३. अभिव्यक्ती (४)

“जीवनातील बालपणाचा काळ अत्यंत महत्त्वाचा असतो” या विषयी तुमचे विचार लिहा.

**सराव कृती ( आकलन)**

१) संध्याकाळी समुद्र असा वाटतो ¬-------

२) समुद्राच्या डोळ्यांत उतरणारे ¬---------

३) इमारतींच्या पलीकडचे दृश्य ¬----------

४) समुद्र उशिरापर्यंत हे पाहत बसतो. ¬-----

५) समुद्राच्या शेजारी असणाऱ्या मुलाची अवस्था ¬--

सराव कृती ( अभिव्यक्ती )

१) डोक्यावर छप्पर नसलेल्या मुलांच्या बालपणाची अवस्था तुमच्या शब्दांत वर्णन करा.

२) “सध्याच्या काळातील धावपळीच्या जगण्यात लहान मुलांकडे फारसे लक्ष देता येत नाही” याविषयी तुमचे मत लिहा.

## कवितेचा आशय

**टीप – या पुढील कृती म्हणजे काव्यसौंदर्य आणि रसग्रहण. यासाठी या कवितेतील कोणतेही एक कडवे आल्यास पुढे थोडक्यात दिलेल्या आशयाचा उपयोग करून स्वतःच्या विचाराने कृती सोडवावी.**

समुद्र कोंडून पडलाय गगनचुंबी इमारतींच्या गजांआड.
तो संत्रस्त वाटतो संध्याकाळीं: पिंजारलेली दाढी,झिंज्या.
हताशपणे पाहत असतो समोरच्या बत्तिसाव्या मजल्यावरील मुलाकडे,
ज्याचं बालपण उंच उंच पण अरुंद झालंय
आणि त्याची त्याला कल्पनाच नाही.
समुद्राच्या डोळ्यांत थकव्याचं आभाळ उतरत येतं
आणि शिणून तो वळवतो डोळे.
इमारतींच्या पलीकडच्या रस्त्यावर थकलेल्या माणसांचे पाय, बसचीं चाकं.

“समुद्र कोंडून पडलाय” या कवितेतील “समुद्र” हा जीवनाचे प्रतीक आहे. ज्यांचे जीवन समुद्राइतके अथांग होणार आहे अशा कोंडून पडलेल्या बालकांच्या बालपणाची स्थिती ही कविता मांडते. या कवितेत असणारा समुद्र हा संवेदनशील आहे म्हणूनच आपल्या बाजूच्या इमारतीतील बत्तिसाव्या मजल्यावरील एकट्या पडलेल्या लहान मुलाकडे त्याचे लक्ष जाते. ज्या वयात मुलांनी आपल्या समवयस्क सवंगड्यांसोबत बागडायचे असते, खेळायचे असते त्या वयात हे मूल मात्र खोट्या श्रीमंतीच्या गजाआड अडकून पडले आहे.

या लहान मुलाचे बालपण सुखसोयींनी उंचावले आहे पण त्यातील मुक्तपणा हरवलेला आहे म्हणून ते अरुंद झाले आहे,हे पाहून समुद्राच्या डोळ्यांत काळजीची भावना दाटून येते ही भावना कवींनी “थकव्याचे आभाळ उतरलंय” अशा शब्दांत व्यक्त केली आहे. आपण अशा परिस्थितीत फक्त दुरून पाहण्याऐवजी काही करू शकत नाही असे जाणवल्यामुळे शेवटी समुद्र आपले डोळे दुसरीकडे वळवतो, परंतु तेथेही मुलांच्या बालपणाची काळजी न करता केवळ सुखसोयींच्या मागे धावणारे माणसांचे पाय आणि त्याच्यासाठी गतिमान असलेली बसची चाकं समुद्राला दिसतात .

एकूणच बालपणात एकमेकांसोबत मज्जा मस्ती करणारे मुक्त बालपण हरवले आहे हे कवींनी वरील शब्दातून प्रभावीपणे व्यक्त केले आहे.

समुद्र अस्वस्थ होऊन जातो
शहराच्या आयुष्याच्या विचाराने.
तेव्हा तो मनांतल्या मनांतच मुक्त होऊन फिरूं लागतो
शहरांतल्या रस्त्यांवरून, वस्त्यांमधून.
उशिरापर्यंत रात्री तो बसलेला असतो
स्टेशनवरल्या बाकावर एकाकी, समोरच्या रुळांवरील रहदारी पाहत ,

हातांवर डोकं ठेवून अर्धमिटल्या डोळ्यांनी.
त्याला आठवतं त्याच्याच शेजारीं
पाय मुडपून कसंबसं झोपलेलं एखादं मूल,
ज्याचं बालपण स्टेशनवरल्या बाकाएवढं,
आणि त्याची त्याला कल्पना असावी किंवा नसावी.
समुद्र खिन्न हसतो आणि शिणलेल्या पापण्या मिटून घेतो.
त्याला काळजी वाटते साऱ्यांच्याच बालपणाची वयस्कांच्या शहरांतील.

उंच उंच इमारतींमध्ये अडकून गेलेले बालपण पाहून समुद्र अस्वस्थ होतो शहरांमध्ये नोकरी धंद्याच्या मागे धावणारी माणसे पाहून त्याला शहरात वाढणाऱ्या लहान मुलांच्या बालपणाची काळजी वाटते कारण बालपण भरभरून अनुभवणे म्हणजे उद्याचा भावनाशील नागरिक तयार करणे असते. एकमेकांसोबत एकमेकांची काळजी घेत आयुष्य जगायचे असते हे बालपणातील खेळ या शहरातल्या मुलांना अनुभवता येत नाही त्यामुळे माणुसकीचे बीज बालपणात घट्ट रुजत नाही याचा विचार करत समुद्र उशिरापर्यंत रात्री शहराच्या रस्त्यांमधून वस्त्यांमधून फिरत राहतो आणि थकून स्टेशनवरच्या बाकावर ती आजूबाजूची रहदारी पाहत राहतो माणसांच्या या काळजीमुळे थकून गेलेला समुद्र हातावर डोकं ठेवून अर्ध मिटल्या डोळ्यांनी झोपण्याचा प्रयत्न करतो.

त्याचे लक्ष शेजारच्या अर्ध्याबाकावर पाय पोटाशी घेऊन कसंबसं झोपलेल्या मुलाकडे जाते. खरंतर या मुलाचे बालपण मुक्त आहे तरीही ते परिपूर्ण नाही कारण स्टेशनवरचे बाक हेच त्या मुलाचे

घर आणि अंगण असते .एकूणच घरात कोंडलेले बालपण आणि स्टेशनवरचे मुक्त बालपण या दोन्हींमध्ये असणारे अपुरेपण समुद्राला जाणवते आणि हीच परिस्थिती बदलणे शक्य नाही असे वाटून समुद्र खिन्नपणे हसतो. आपल्या पापण्या मिटून घेतो .जगण्यासाठी पैशाच्या मागे लागणे ,यासाठी वळवण करणे हे जरी आवश्यक असले तरीही मुलांच्या आयुष्यातून एकदा गेलेले बालपण परत मिळू शकत नाही. हे या मोठ्या माणसांना, शहरातील वयस्कर माणसांना कसे कळत नाही. याची खंत समुद्राच्या रूपाने कवी व्यक्त करत आहेत .

एकूणच जीवनाचा अथांग समुद्र होऊ पाहणाऱ्या ही लहान मुलं माणसाच्या या धावपळीत आपले बालपण हरवून बसली आहेत असे जाणवते.

*******************************************************

# ११. आरशातली स्त्री

कवयित्री - हिरा बनसोडे

**कृती २ अ) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा .** (८)

१) खालील अर्थाच्या ओळी कवितेतून शोधून लिहा . (२)

य) रात्रीच्या अंधारात रडू दाबून तू तुझ्या मनाला समजावत असतेस ---------------- (१)

(रात्रीच्या एकांतात तर हुंदका कंठात दाबून शिवत असतेस तुझे ठिकठिकाणी फाटलेले हृदय)

र) पूर्वीच्या हव्याहव्याशा वाटणा-या क्षणांना पुन्हा जगण्याचे लक्षात येत नाही ¬----------- (१)

(अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला दार उघडून आत घेण्याचेही भान नाही ग तुला)

२) कृती सोडवा.

य) आरशाबाहेरील स्त्री यात गुरफटली आहे. ¬---- (१)

(घनगर्द संसारात)

र) पदराखाली झाकलेल्या - ¬-------- (१)

(देहामधल्या असह्य कळा)

सहज आरशात पाहिले नि डोळे भरून आले
आरशातील स्त्रीने मला विचारले, - तूच ना ग ती!
माझेच रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली
किती बदललीस ग तू अंतर्बाह्य...!
तुला सांगू तुझ्या अंतरीचे सुंदर पूर्वरंग
ऐक हं ....! तू कशी होतीस ते !

पावसाचे तरंग ओंजळीत भरणारी चैतन्यमयी बालिका
अंगणात दिवे लावावेत तसेच सर्वच बहर लावणारी तू नवयौवना
स्वप्नांचे पंख लावून आभाळ झुल्यावर झुलणारी तू ध्येयगंधा
नि आज नखशिखांत तू....तू आहेस फक्त स्थितप्रज्ञा राणी!

आरशात भेटलीस तरी बोलत नाहीस ग मन उलगडून
ओठ मात्र असतात पळवटलेले, खसकन देह तोडलेल्या फुलांसारखे
इतकी कशी वेढून गेलीस या घनगर्द संसारात
जळतेस मात्र अहोरात्र पारंपरिकतेचे वरदान समजून

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचे ही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून

पण तू, तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी

अनेकदा तुला मी अशी पाहते की काळीज हंबरते
रात्रीच्या एकांतात तर हुंदका कंठात दाबून
शिवत असतेस तुझे ठिकठिकाणी फाटलेले हृदय

नि पदराखाली झाकतेस देहामधल्या असह्य कळा'
तिचे हे बोलणे ऐकताच मी स्वतःच हिंदकळतेय
आणि अशातच ती मला गोंजारीत, जवळ घेत
अधिकारवाणीने म्हणाली -

रडू नकोस खुळे, उठ! आणि डोळ्यातले हे आसू
सोडून दे शेजारच्या तळ्यात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळाची प्रसन्न फुले

**३) अभिव्यक्ती** **(४)**

तुमच्या जीवनातील प्रेरणादायी अनुभव लिहा.

**४) सराव कृती ( आकलन)**

१) आरशाबाहेरील स्त्रीची पूर्वरूपे - ¬----------- ¬------------ ¬------------
२) आरशाबाहेरील स्त्रीचे आजचे रूप - ¬---------
३) आरशाबाहेरील स्त्रीला वाटणारे वरदान - ¬--
४) आरशाबाहेरील स्त्रीची वाट पाहणारी----------
५) डोळ्यातले आसू सोडून देण्याची जागा ¬---
६) आरशातल्या स्त्रीने आणायला सांगितलेली गोष्ट ¬-

सराव कृती ( अभिव्यक्ती )

१) “नव्या उमेदीने जगण्यासाठी प्रेरणा आवश्यक असते” याविषयी तुमचे विचार लिहा.
२) आरशाबाहेरच्या स्त्रीची परिस्थिती तुमच्या शब्दांत लिहा.
३) आरशातल्या स्त्रीने आरशाबाहेरील स्त्रीला कसे जागृत केले ते तुमच्या शब्दांत लिहा.

# कवितेचा आशय

**टीप - या पुढील कृती म्हणजे काव्यसौंदर्य आणि रसग्रहण. यासाठी या कवितेतील कोणतेही एक कडवे आल्यास पुढे थोडक्यात दिलेल्या आशयाचा उपयोग करून स्वतःच्या विचाराने कृती सोडवावी.**

सहज आरशात पाहिले नि डोळे भरून आले
आरशातील स्त्रीने मला विचारले, - तूच ना ग ती!
माझेच रूप ल्यालेली, तरीही मी नसलेली
किती बदललीस ग तू अंतर्बाह्य!
तुला सांगू तुझ्या अंतरीचे सुंदर पूर्वरंग
ऐक हं ! तू कशी होतीस ते !

पावसाचे तरंग ओंजळीत भरणारी चैतन्यमयी बालिका
अंगणात दिवे लावावेत तसेच सर्वच बहर लावणारी तूनवयौवना
स्वप्नांचे पंख लावून आभाळ झुल्यावर झुलणारी तू ध्येयगंधा
नि आज नखशिखांत तू तू आहेस फक्त स्थितप्रज्ञ राणी!

कवयित्री “हिरा बनसोडे” यांची “आरशातली स्त्री” ही कविता प्रत्येक स्त्रीने आपले अस्तित्व टिकवून संसार केला पाहिजे हे सांगणारी आहे. त्यासाठी आरशातील प्रतिबिंब हे प्रतीक वापरले आहे. आरशाबाहेर असणारी स्त्री ही संसारात पूर्णपणे गढून गेलेली आहे, स्वतःला हरवून बसलेली आहे, तर आरशातल्या स्त्रीचे रूप तिच्यासारखे दिसणारे असले तरीही वेगळे आहे हे तिचे मूळचे पूर्वरूप आहे.

या तिच्या पूर्वरूपाने आरशाबाहेरील स्त्रीला जागे केले आहे .स्वतःकडे एक माणूस म्हणून पाहायला विसरू नकोस हे सांगताना आरशातल्या स्त्रीने आरशाबाहेरील स्त्रीला तिचे पूर्वरंग सांगितले आहेत. पूर्वरंग म्हणजे संसारात पडण्यापूर्वी स्त्रीचे असणारे जगणे.

लहानपणीची निरागस असणारी बालिका उत्साहात होती. तरुणपणी तीच नवयौवना झाली आणि स्वतःच्या स्वप्नांचे, ध्येयाचे तेज तिच्या चेहऱ्यावर दिसू लागले .याचा उल्लेख करताना कवयित्रीने “ध्येयगंधा” असा शब्दप्रयोग केला आहे ,परंतु या साऱ्याला विसरून संसारात गुरफटणे ,अडकून पडणे हे पूर्वरूपाला मान्य नाही.

आता मात्र तिच्या आयुष्यात सुख आले तरी आणि दुःख आले तरी तिच्याकडून कोणताच प्रतिसाद येत नाही, म्हणजे केवळ यंत्राप्रमाणे आयुष्य जगावे अशी तिची अवस्था झाली आहे. यासाठी कवयित्रीने “स्थितप्रज्ञा” हा शब्द वापरला आहे. ती तिच्या संसाराची राणी असली तरी पूर्वरंग विसरून गेल्यामुळे तिच्यातील चैतन्य हरवून बसली आहे, या तिच्या मूळ स्वरूपाची आठवण करून देण्याचा प्रयत्न आरशातली स्त्री करत आहे.

आरशात भेटलीस तरी बोलत नाहीस ग मन उलगडून

ओठ मात्र असतात पळवटलेले, खसकन देह तोडलेल्या फुलांसारखे
इतकी कशी वेढून गेलीस या घनगर्द संसारात
जळतेस मात्र अहोरात्र पारंपरिकतेचे वरदान समजून

अंगणात थांबलेल्या तुझ्या प्रेयस चांदण्याला
दार उघडून आत घेण्याचे ही भान नाही ग तुला
बागेतली ती अल्लड जाईही पेंगुळतेय तुझी वाट पाहून पाहून
पण तू मात्र झालीस अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी

आरशामध्ये असणाऱ्या पूर्व रूपाने आरशाबाहेरील स्त्रीला तिच्या खऱ्या रूपाची ओळख करून दिली आणि त्याकडे होणारे दुर्लक्ष लक्षात आणून दिले. आपल्या मनातील कोणत्याच भावनेची दखल न घेता ओठ घट्ट मिटून ठेवणे, कोणाकडेही मन मोकळे न करणे याचा शरीरावर होणारा परिणाम दिसू लागला आहे. मनातली जगण्याची आशा, ध्येय बाजूला पडल्यामुळे तिचे शरीर ओरबडून काढलेल्या निस्तेज फुलांसारखे दिसत आहे आणि आपल्या वाट्याला आलेला हा संसार इतर स्त्रियांप्रमाणेच परंपरेने आपणही करत राहिला पाहिजे अशी मनाची समज त्या स्त्रीने करून घेतले आहे. तिचे संसारात गढून जाण्याचे वर्णन कवियत्रीने “घनगर्द संसार” असे केले आहे.

पूर्णपणे स्वतःचे अस्तित्व विसरल्यामुळे आरशाबाहेरील स्त्रीला तिच्या आयुष्यात आलेल्या प्रगतीच्या संधी दिसत नाहीत.

“अंगणात थांबलेले प्रेयस चांदणे” म्हणजे नव्या संधी आणि “दार घट्ट मिटणे” म्हणजे त्यापासून पूर्णपणे स्वतःला पूर्णपणे वेगळे करणे, हे कवयित्रीने अचूक शब्द टिपले आहे. मनातील छोट्या छोट्या इच्छा म्हणजे अल्लड जाई आणि तिचे पेंगुळणे म्हणजे आरशाबाहेरील स्त्रीचे आपल्या आयुष्यातील साध्या गोष्टींच्या आनंदाकडे फारसे लक्ष न देणे आहे. याचा परिणाम म्हणून यंत्रवत काम करत संसार करणारी ही स्त्री स्वतःमधील प्राण हरवून बसली आहे .

कवयित्रीने या अवस्थेचे वर्णन “अस्तित्वहीन प्राण हरवलेली पुतळी” असे केले आहे. एकूणच अनेक प्रकारे आरशामधील स्त्री आरशाबाहेर स्त्रीला जागे करण्याचा प्रयत्न करत आहे .

अनेकदा तुला मी अशी पाहते की काळीज हंबरते
रात्रीच्या एकांतात तर हुंदका कंठात दाबून
शिवत असतेस तुझे ठिकठिकाणी फाटलेले हृदय

नि पदराखाली झाकतेस देहामधल्या असह्य कळा
तिचे हे बोलणे ऐकताच मी स्वतःच हिंदकळतेय
आणि अशातच ती मला गोंजारीत, जवळ घेत

“अधिकारवाणीने म्हणाली –

रडू नकोस खुळे, उठ! आणि डोळ्यातले हे आसू
सोडून दे शेजारच्या तळ्यात
नि घेऊन ये हातात
नुकतीच उमललेली शुभ्र कमळाची प्रसन्न फुले"

आरशातल्या स्त्रीने आरशाबाहेरील स्त्रीच्या मनात तिचे अस्तित्व जागे करण्याचा हर तऱ्हेने प्रयत्न केला आहे. खरे तर आरशामधली स्त्री आणि आरशाबाहेरील स्त्री एकरूपच आहेत त्यामुळे आरशाबाहेरच्या स्त्रीची प्रत्येक अवस्था आरशातल्या स्त्रीला माहीत आहे.

मनाविरुद्ध घडणाऱ्या अनेक गोष्टींचा प्रतिकार न केल्यामुळे आरशाबाहेरील स्त्रीच्या मनात अनेक भावना दाबल्या गेल्या आहेत आणि एकांतामध्ये हे दुःख वरती येऊन हंबरड्याच्या रूपाने बाहेर पडते , परंतु आपले अश्रू कोणाला दिसू नयेत आणि आपले तुटलेले मन कोणाला कळू नये यासाठी रात्रीच्या अंधारात आरशाबाहेरील स्त्री स्वतःलाच समजावते. ही होणारी तगमग आरशातल्या स्त्रीने तिच्यासमोर मांडली आहे, त्यामुळे जणू काही आपल्या जिवाभावाच्या बालसखीला भेटल्यामुळे मनातले सारे दुःख तिच्यासमोर मोकळे करता आले आहे.

आपल्या मनातील दुःखाला वाट करून दिल्यामुळे शांत झालेली आरशाबाहेरील स्त्री जागी झाली आहे आणि अशावेळी तिच्या आतल्या आवाजाने तिला पदराखाली झाकलेल्या सगळ्या त्रासाला शेजारच्या तळ्यात सोडून द्यायला सांगितले आहे. हे गुरफटून गेलेल्या स्त्रीच्या मनाचे विसर्जन आहे. तळ्याच्या पाण्यात विसर्जन केल्यानंतर सोबत येताना मात्र शुभ्र कमळे घेऊन येण्याचा सल्ला आरशातील स्त्री देत आहे.

कमळ हे चिखलात उगवते. प्रत्येक स्त्रीचे आयुष्य हे संसारात येणाऱ्या अडचणींच्या चिखलात नेहमीच गुरफटत जाते परंतु तिने त्या चिखलात अडकून न पडता, त्याचा परिणाम आपल्यावर न होऊ देता शुभ्र कमळाप्रमाणे फुलून यायचे आहे असे कवयित्रीला यातून सांगायचे आहे.

एकूणच स्वतःचे कर्तव्य पूर्ण करताना स्वतःच्या प्रगतीकडे आणि आनंदाकडे लक्ष दिले पाहिजे अशी प्रेरणा या कवितेतून मिळते.

**************

# विभाग - तीन

## कथा - साहित्यप्रकार- परिचय

- हा विभाग एकूण दहा गुणांसाठी असून त्याची गुण विभागणी पुढीलप्रमाणे -

अ) ०४ गुणांसाठी आ) ०६ गुणांसाठी

- या विभागातील अ भागात पाठ्यपुस्तकातील पठित उतारा दिला जातो. सदर उताऱ्याचे वाचन काळजीपूर्वक केले तर उत्तरे लिहिण्यास अडचण येत नाही.
- विभागात दोन कथांवर कृती विचारल्या जातात. एक कथा उत्तम प्रकारे तयार केली तर ही कृती आपण योग्य प्रकारे सोडवू शकतो.
- तीन गुणांच्या प्रश्नासाठी आठ ते दहा ओळीत उत्तर अपेक्षित आहे .

### कथा एक साहित्यप्रकार या विभागातील गुणविभागणी

| घटक | कृती | गुण |
|---|---|---|
| कथा -साहित्यप्रकार- परिचय | खालील पठित उतारा वाचून त्याखाली दिलेल्या कृती सोडवा. | ०४ |
| कथा<br>शोध<br>गढी | खालील कृती सोडवा (चार पैकी दोन)<br>स्वमत कृती व अभिव्यक्ती कृती<br>स्वमत कृती व अभिव्यक्ती कृती | ०६ |

**कथा – साहित्यप्रकार– परिचय**

मनुष्य आपले अनुभव व कल्पना जेव्हा दुसऱ्याला सांगू लागला तेव्हाच त्याची गोष्ट झाली आणि त्यातून कथेचा जन्म झाला. “कथा” या शब्दाचा शब्दशः अर्थ गोष्ट, कहाणी, हकीकत, वर्णन असा आहे. मनोरंजन आणि प्रबोधन या दोन मुख्य प्रयोजनातून कथेचा उदय झाला. कथानक, पात्र, वातावरण निर्मिती, संवाद, कथाबीज, नाट्यात्मकता, भाषाशैली हे कथेचे काही महत्त्वाचे घटक आहेत.

**कृती अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. एका वाक्यात उत्तरे लिहा.

य) कथानकाचे प्रयोजन लिहा.

र) नाट्यमयता निर्माण होणारा घटक लिहा.

कथेत “घटना” हा महत्त्वाचा भाग ठरतो. कथेत या मूळ घटनेलाच “कथाबीज” असे म्हणतात.कथानकात घटना, प्रसंग, पात्रांच्या कृती, स्वभाववैशिष्ट्ये, वातावरण इत्यादींचे तपशील हळुवारपणे उलगडत जातात. कथेत कथानकातील घटकांचे एकत्रीकरण केले जाते. या एकत्रीकरणातून कथेची मांडणी आकाराला येते. हे कथानक उलगडताना त्यातील प्रवाहीपणही जपले जाते. कथाकाराच्या मनात कथेच्या अनुषंगाने निर्माण झालेला भावाशय वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथन करणे हे कथानकाचे प्रयोजन असते. पात्रचित्रण हा कथेचा महत्त्वपूर्ण घटक आहे. पात्रचित्रणातून कथेचा आशय पुढे पुढे जात राहतो. कथाकार एखाद्या पात्राची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून त्या व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा तयार करत असतो. या शब्दरूप प्रतिमेला “पात्र” असे म्हणतात. कथेतील पात्रांना वास्तवातील माणसांप्रमाणे रेखाटले जाते, म्हणून वाचकांची त्या पात्रांशी जवळीक साधली जाते. ही पात्रे कथाकाराची “स्व” निर्मिती असते. कथेला स्थळ-काळाबरोबरच सामाजिक,भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादींनी युक्त वातावरण असते. या वातावरणाचा वाचकांवर परिणाम होऊन तो कथानकाशी एकरूप होतो. वातावरणाचा पट जितका सघन तितकी कथा सकस होते. कथेत चांगल्या-वाईटाचा संघर्ष असतो. त्यातूनच नाट्यमयता निर्माण होते. या संघर्षातूनच कथा उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचते.

**२.कथाकाराच्या 'पात्र' या शब्दरूप प्रतिमेची दोन वैशिष्ट्ये लिहा.**

- **नमुना उत्तरे**

**य) कथानकाचे प्रयोजन लिहा.**

कथाकाराच्या मनात कथेच्या अनुषंगाने निर्माण झालेला भावाशय वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कथन करणे हे कथानकाचे प्रयोजन असते.

**र) नाट्यमयता निर्माण होणारा घटक लिहा.**

कथेत चांगल्या वाईट असा संघर्ष असतो त्यातून नाट्यमयता निर्माण होते .

**२.कथाकाराच्या 'पात्र 'या शब्दरूप प्रतिमेची दोन वैशिष्ट्ये लिहा.**

वास्तवातील माणसाप्रमाणे रेखाटलेले असते.

पात्र वाचकांशी जवळीक साधते

**सराव कृती –**

एका वाक्यात उत्तरे लिहा. (०१ गुण)

१. कथाकाराच्या प्रतिभाशक्तीचे कार्य लिहा.

२. कथेतील भाषानियोजनाचे घटक लिहा.

**उत्तरे लिहा** (०२ गुण)

१. कथेतील संवादाची वैशिष्ट्ये लिहा.

२. कथाकार व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा तयार करत असताना विचारात घेत असलेले घटक लिहा.

# शोध

**- व. पु. काळे**

**कथाकार व.पु. काळे-** मराठीतील सुप्रसिद्ध कथालेखक, कादंबरीकार म्हणून व. पु. काळे परिचित आहेत . "गुलमोहर", "कर्मचारी", "ऐक सखे", "स्वर", "मायाबाजार", "मी माणूस शोधतोय" हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. कथाकथन या प्रांतात त्यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे आहे.

व. पु. काळे यांची "शोध" ही कथा "मी माणूस शोधतोय" या कथासंग्रहातून घेतलेली आहे. या कथेतील अनु ही व्यक्तिरेखा केवळ १ रूपयाच्या नोटेचा शोध घेत नाही तर त्यामागे दडलेल्या तिच्या असंख्य आठवणी आणि भावनाही त्यामागे असतात. या कथेतील व्यक्तिरेखा, वातावरण निर्मिती, कथानक, कथाबीज या गोष्टी कथेला गती देतात. कथा वाचनीय आणि उद्बोधक स्वरूपाची आहे .

- **स्वमत कृती**

**कृती-** १. शोध या कथेतील कथानायिका अनुची व्यक्तिरेखा तुमच्या शब्दांत रेखाटा.

उत्तर- व. पु. काळे यांच्या शोध या कथेतील नायिका अनु ही आहे. अनु ही व्यक्तिरेखा परिचारिका म्हणून आपल्यासमोर येते. पारंपरिक चौकटीत ती न अडकता तिला स्वतःची काही मते आहेत. ती मते ती निर्भीडपणे मांडते. त्या मतानुसार ती आयुष्यभर कृती करते. अनु ही स्वतःवर ठाम विश्वास असलेली मुलगी आहे. अनुच्या स्वभावातील वेगवेगळे पैलू दिसून येतात. अनु ही जीवनातील वास्तवाचा शोध घेणारी व्यक्तिरेखा आहे. अनुचा स्वभाव हा विक्षिप्त वाटत असला तरी तो वाचकांना आवडतो. तिच्यामध्ये प्रबळ इच्छाशक्ती आहे . आशावाद आहे. प्रयत्नातील सातत्य आहे. हे सगळे गुण तिच्या व्यक्तिरेखेतून समोर येतात. अनुचा स्वभाव भावनिक आहे. एखादी गोष्ट मिळवण्यासाठी ती प्रयत्नांची पराकाष्टा करते.स्वतःचे अस्तित्त्व स्वतःच्या बौद्धिक क्षमतेवर सिद्ध करून दाखवणारी ही व्यक्तिरेखा आहे. समाजात मिसळल्याशिवाय समाज समजत नाही या तिच्या विचारातून तिच्यामध्ये समाजाबद्दल असणारी जाणीव आपल्या लक्षात येते. आपल्याकडे असणाऱ्या सृजनशीलतेचा बळावर नवनिर्मिती करण्याची तत्परता तिच्या स्वभाव वैशिष्ट्यातून दिसून येते.

- **अभिव्यक्ती कृती**

**कृती** - २- कथेतील टॅक्सी ड्रायव्हर हे पात्र तुम्हाला आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण स्पष्ट करा .

उत्तर - शोध कथेच्या उत्तरार्धात टॅक्सी ड्रायव्हर ही व्यक्तिरेखा आपल्याला भेटते. ही व्यक्तिरेखा वैयक्तिकरित्या मला आवडलेली आहे. या कथेतील टॅक्सी ड्रायव्हर हे पात्र वास्तवाचा शोध घेणारे आहे. अडचणीच्या काळात इतरांना सहकार्य करण्याची त्याची वृत्ती आहे. उपकाराची जाणीव ठेवणारे हे पात्र आहे. आपल्या कामावर निष्ठा व प्रामाणिकपणा असणारी व्यक्ती म्हणून ती समोर येते. ज्या वेळेला असंख्य नोटांमधून एका विशिष्ट नोटेचा शोध सुरू होतो त्यावेळेला ती कुठून मिळू शकेल यावरती तो मार्ग सांगतो. त्याच्याजागी दुसरा कोणी असता तर त्याने त्या ठिकाणी नोट सापडत नाही असेही सांगितले असते पण हा टॅक्सी ड्रायव्हर आपल्या खिशातील सगळ्या नोटा काढून देतोय.

त्यामध्ये सापडत नाही म्हटल्यावर आपण कोठे कोठे गेलो होतो? याचाही शोध घेतो. त्या ठिकाणी ती नोट मिळविण्याचा प्रयत्न करतो. नोट मिळते. अनु या नोटेचा का शोध घेते हेही सांगते. त्यानंतर टॅक्सी ड्रायव्हर जीवनाविषयी किती सकारात्मक राहावे यावरती भाष्य करतो. गेलेल्या गोष्टी गेल्या आहेत. त्यामध्ये अडकून न पडता येणारा प्रत्येक क्षण सुंदर कसा होईल याचा आपण विचार केला पाहिजे हा जीवनातील अत्यंत महत्त्वाचा संदेश टॅक्सी ड्रायव्हर आपल्याला देतो म्हणून ही व्यक्तिरेखा मला आवडते भावते.

- **स्वमत कृती –**

**कृती** – ३. “समाजात मिसळल्याशिवाय समाज समजत नाही”, या विधानातील समर्पकता तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

उत्तर– समाजात मिसळल्याशिवाय समाज समजत नाही हे विधान व. पु. काळे यांनी लिहिलेल्या “शोध” या कथेतील अनु या व्यक्तिरेखेच्या मुखातील आहे. समाज जाणून घ्यायचा असेल तर समाजाशी समरस होणे अत्यंत गरजेचे आहे. समाजामध्ये असणाऱ्या अडचणी समाजातील माणसांची दुःख त्यांच्या वेदना या आपल्याला त्यांच्यात मिसळल्याशिवाय कळणारच नाहीत. प्रत्येक व्यक्तीचे वैयक्तिक जीवन आणि सामाजिक जीवन यामध्ये तफावत असते. वैयक्तिक जीवनामध्ये तो आपल्या सुखदुःखांचा विचार करत असतो पण सामाजिक जीवनामध्ये त्याला समाजामध्ये मिसळणे अपरिहार्य असते. मानव हा समाजशील प्राणी आहे. या गोष्टीचा आपण जेव्हा विचार करतो तेव्हा त्याला समाजामध्ये जाणे ही गोष्ट अपरिहार्यपणे समोर येते. भारतासारख्या खंडप्राय देशांमध्ये एकसमान समाज आपणाला कोठेच पाहायला मिळत नाही. जात, धर्म, वंश, पंथ, लिंग याच्या विभागणी मधूनच काही सामाजिक प्रश्न निर्माण होतात. हे प्रश्न समजण्यासाठी आणि त्यावरती उत्तर शोधण्यासाठी आपणाला समाजात मिसळावेच लागते. अनु ही व्यक्तिरेखा “शोध” कथेमध्ये आपणाला भेटते. ती आजारी असणाऱ्या माणसांमध्ये काम करते. त्या आजारी माणसांमधून ती समाज समजून घेण्याचा प्रयत्न करते.

**सरावासाठी कृती –**

१. “उत्तम डॉक्टर होण्यापेक्षा उत्तम नर्स होणे कठीण आहे”, या विधानाबाबत तुमचे मत स्पष्ट करा.
२. अनु व सुनीता यांच्यात निर्माण झालेला भावनिक बंध लिहा.
३. भिडे दांपत्याची सामाजिक बांधिलकी स्पष्ट करा.
४. “शोध” या कथा शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

*********************************************************

# गढी

## डॉ. प्रतिमा इंगोले

**डॉ. प्रतिमा इंगोले –** सुप्रसिद्ध ग्रामीण कथाकार, कथाकथनकार, कवयित्री, ललित, विनोदी आणि बालसाहित्य असे विविध स्वरूपाचे लेखन डॉ. इंगोले यांनी केलेले आहे. अस्सल वैधर्भी बोलीचा प्रभावी वापर त्यांच्या कथांमध्ये पाहावयास मिळतो. “सुगरणचा खोपा”, “जावयाचा पोर”, “अकसिदीचे दाने” हे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. “गढी” ही कथा रूपक कथा म्हणून आपल्यासमोर येते.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागाच्या विकासाचे प्रश्न सर्वत्र समोर आले. हे गाव गाड्यातील प्रश्न सोडवणारे बापू गुरुजी आपणाला या कथेमध्ये भेटतात. गढी ,वाननदी आणि वडाचे झाड यांच्या प्रतीकातून गावातील बरी वाईट स्थित्यंतरे लेखिकेने आपल्यासमोर मांडली आहेत. ग्रामीण वातावरण, प्रसंग, पात्रे इत्यादींचे वर्णन  चित्रदर्शी शैलीत समोर येते.

- **स्वमत कृती** -

**कृती** १. “वान नदीला कधी मधी येनारा पूर आता पटावरल्या आकळ्याइले आला व्हता”, यातून तुम्हाला समजणारा अर्थ स्पष्ट करा.

उत्तर- वरील वाक्य हे “गढी” या कथेतील आहे. या कथेच्या लेखिका प्रतिमा इंगोले या आहेत. ही कथा त्यांच्या “अकसिदीचे दाने” या कथासंग्रहातील आहे. पावसाळ्यामध्ये वान नदीला कधीमधी पूर येत असे .नदी पाण्याने तुडुंब भरून वाहत असे. हे सर्वसामान्य माणसाला दिसणारे चित्र. बापू गुरुजींनी गावात शाळा सुरू केलेली होती. शाळेच्या प्रगतीसाठी त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले होते. चौथीपर्यंत असणारी शाळा त्यांच्या सततच्या परिश्रमामुळे सातवीपर्यंत झाली होती .ज्याप्रमाणे नदीला पूर यायचा त्याप्रमाणेच शाळेच्या हजेरी पत्रकावर आता विद्यार्थ्यांची संख्या भरपूर झाली आहे ,असे लेखिकेला या विधानातून सांगायचे आहे. गावातील भरपूर विद्यार्थी आता शिक्षण घेत आहेत. परिसरात शाळेचा नावलौकिक चांगला झाला आहे लेखिकेने नदीच्या पूराची तुलना शाळेतील वाढत्या विद्यार्थी संख्येबरोबर केलेली आहे. हे या विधानातून स्पष्ट होते.

**अभिव्यक्ती कृती**

**कृती** - “गढी” या कथेच्या आधारे तुम्हाला जाणवलेल्या ग्रामीण भागातील समस्या लिहा.

उत्तर- डॉ. प्रतिमा इंगवले यांची “गढी” ही कथा ग्रामीण वास्तवावर भाष्य करणारी कथा आहे. बापू गुरुजी हे या कथेतील नायक म्हणून समोर येतात. बापू गुरुजी प्रयत्न करून चौथीपर्यंत असणारी शाळा सातवीपर्यंत वाढवतात. पण त्यांना त्यापुढे शाळा सुरू करता येत नाही. आजही ग्रामीण भागात सर्व दूरपर्यंत शिक्षण पोहोचलेले नाही.

बापू गुरुजी गावामध्ये पोस्ट ऑफिस सुरू करण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांना त्यामध्ये अडचणी येतात. आजही ग्रामीण भागात पोस्ट सेवा परिपूर्ण पोहोचलेली पाहावयास मिळत नाही .गावामध्ये चांगले हॉस्पिटल व्हावे असे बापू गुरुजींना वाटत असते. पण परिपूर्ण हॉस्पिटल काही गावात होत नाही. त्यामुळे अनेक लोकांना आपला जीव गमवावा लागतो. आरोग्य, शिक्षण, वीज, रस्ते यासारख्या समस्या आजही ग्रामीण भागामध्ये जाणवतात हे गढी या कथेच्या आधारे समोर येते .

- **स्वमत कृती**

**कृती** -३.गावातील उचापती करणाऱ्या लोकांबद्दल तुमचे मत स्पष्ट करा.

उत्तर- गावातील उचापती लोक हे विघ्नसंतोषी असतात. अशी लोक सकारात्मक विचार करण्यापेक्षा नकारात्मक विचार करण्यास प्राधान्य देतात. गढी या कथेमध्ये अशा उचापती लोकांचा प्रत्यय आपणाला येतो. बापू गुरुजी शाळा, रस्ते, दवाखाना या गोष्टींचा सकारात्मक विचार करत असतात. पण गावातील उचापती लोक शाळा, रस्ते, दवाखाना याबाबत मात्र नकारात्मक विचार करतात. उचापती करणारे लोक दुसऱ्यांची निंदा करतात. दुसऱ्यांना त्रास देतात. समाज हिताचा विचार न करता समाजाला त्रासदायक ठरणाऱ्या कृती नेहमी करतात. उचापती लोकांमुळे गावचा ,समाजाचा विकास होत नाही. उचापती लोकांमुळे चांगल्या कार्यात अडथळे निर्माण होतात .एक प्रकारे समाजकार्यामध्ये उचापती लोक गतिरोधक असतात.

**सरावासाठी कृती**

१)बोर्डिंगमधला संपती नावाचा मुलगा गेल्यानंतर बापू गुरुजींच्या भावना तुमच्या शब्दात लिहा.

२) “गढी” या कथेच्या शीर्षकची समर्पकता पटवून द्या.

*********************************************

# विभाग ४ : उपयोजित मराठी

१. हा विभाग एकूण १४ गुणांसाठी असून त्याची विभागणी पुढीलप्रमाणे-
अ) ४ गुणांसाठी आहे. आ) १० गुणांसाठी आहे.
२. या विभागात चार घटक आहेत. त्यातील कोणत्याही दोन घटकांचा अभ्यास उत्तम केल्यास गुण मिळवणे सोपे जाईल.
३. जे दोन घटक तुम्ही अभ्यासणार आहात त्या घटकांचे वाचन पाठ्यपुस्तकाच्या आधारे किमान दोनदा तरी करावे.
४. बुलेट केलेला मजकूर विशेष अभ्यासावा.
५. संदर्भ मुद्द्यांवर आधारित किमान चार-पाच ओळी लिहिल्यास गुण मिळतील.
६. मुलाखत, अहवाल, माहितीपत्रक किंवा वृत्तलेख कोणताही नमुना तुम्हाला तयार करायचा नाही त्यामुळे फक्त पाठ्यपुस्तकातील लिखित मजकूर अपेक्षित आहे.

**************************************************

## १. मुलाखत

(बुलेट केलेला मजकूर "अतिमहत्त्वाचा" असे दर्शवतो.)

**संकल्पना स्पष्टीकरण :-**

मुलाखत म्हणजे पूर्वनियोजित संवाद असतो. मुलाखतीत मुलाखत घेणारा, देणारा आणि ऐकणारा, पाहणारा किंवा वाचणारा यांचा सहभाग असतो. ज्यांच्याजवळ "सांगण्यासारखे" काही आहे आणि ज्यांच्याकडून "ऐकण्यासारखे" काही आहे अशा व्यक्तींची मुलाखत घेतली जाऊ शकते.

➢ **मुलाखत म्हणजे** -

जेव्हा क्रमबद्ध प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे जीवन आणि कर्तृत्व श्रोत्यांसमोर उलगडून दाखवते, तेव्हा त्यांच्यात झालेला संवाद म्हणजे मुलाखत होय. मुलाखत देणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू समजून घेणे व त्याच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकणे हे मुलाखतीचे प्रमुख हेतू असतात.

मुलाखत उत्तम व्हावी यासाठी करावयाच्या पूर्वतयारीत व्यक्तीच्या अनेक पैलूंची अद्ययावत माहिती तर हवीच पण लिखित, श्राव्य व दृक् श्राव्य यांपैकी कोणत्या माध्यमासाठी घेत आहोत याचीही जाण असावी. मुलाखतीचा प्रारंभ आकर्षक, चटपटीत व श्रोत्यांच्या मनात घर करणारा असावा. प्रश्नांतून उत्तरे व उत्तरांतून पुढचे प्रश्न तयार होतील अशी मुलाखत घेतली गेली तर ती रंगतदार होते. प्रश्न चांगले असतील तर उत्तरदात्याचा उत्साह वाढतो. मुलाखत योग्य ठिकाणी संपायला हवी. कंटाळवाणी किंवा रटाळ मुलाखत न होता ती श्रोत्यांच्या मनात रेंगाळेल अशी संस्मरणीय झाली पाहिजे. मुलाखत घेणाऱ्याने आपल्या मर्यादांची जाण व मुलाखतीच्या आवश्यक त्या औपचारिकतेचे भान ठेवावे म्हणजे मुलाखत उत्तम होते. उत्तम मुलाखतकारास व्यावसायिक संधी प्राप्त होत असतात.

**नमुना कृती उत्तरांसहित –**

- अ) खालील कृती सोडवा. ( प्रत्येक कृतीस दोन गुण )
- दोन गुण असलेल्या कृतीस साधारणतः पाच ते सहा ओळी मजकूर अपेक्षित.

**कृती – १) मुलाखतीच्या प्रारंभाबाबत तुमचे मत लिहा.**

**उत्तर** – जेव्हा क्रमबद्ध प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे जीवन आणि कर्तृत्व श्रोत्यांसमोर उलगडून दाखवते, तेव्हा त्यांच्यात झालेला संवाद म्हणजे मुलाखत होय. मुलाखतीचा प्रारंभ आकर्षक, चटपटीत व श्रोत्यांच्या मनात घर करणारा असावा. सहजता, नैसर्गिकपणा ही वैशिष्ट्ये प्रारंभातच प्राप्त केली तर वाचक किंवा रसिक मुलाखतीत गुंतून जातात. प्रारंभी एखादा किस्सा किंवा अनुभव सांगून जर मुलाखतदात्यास प्रश्न विचारला तर ती मुलाखत अनौपचारिक होण्यास मदत होते. मुलाखतदाता मुलाखत देताना खुलला पाहिजे अशी मांडणी प्रारंभापासून असावी.

**कृती – २) मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी लिहा.**

**उत्तर** – मुलाखत घेणाऱ्याने मुलाखतदात्याचा अपमान होईल किंवा ताण-तणाव निर्माण होईल असे प्रश्न टाळावेत. असंबद्ध, अवघड, रटाळ प्रश्न विचारून मुलाखतीची रंगत कमी करू नये. प्रश्नांची पुनरावृत्ती तर टाळावीच पण अतिवैयक्तिक प्रश्नांचा अंतर्भाव नसावा. अति आत्मविश्वास किंवा न्यूनगंड दोन्हीही मुलाखत घेणाऱ्याकडे असता कामा नये. मुलाखत घेणाऱ्याला स्वतःच्या मर्यादांची जाण असावी व मुलाखत वेळेत संपवावी.

- **सराव प्रश्न – ( प्रत्येकी दोन गुण )**
  १) मुलाखतीचे हेतू स्पष्ट करा.
  २) मुलाखतीच्या सुरुवातीची वैशिष्ट्ये लिहा.
  ३) मुलाखतीच्या मध्याची रचना कशी असावी ते सांगा.
  ४) मुलाखतकाराने मुलाखतीसाठी करायवयाच्या पूर्वतयारीचे चार घटक लिहा.
  ५) मुलाखतकाराने मुलाखत घेताना कोणती काळजी घ्यावी, ते लिहा.

- **आ) खालील कृती सोडवा. ( प्रत्येक कृतीस पाच गुण )**
- पाच गुण असलेल्या कृतीस साधारणतः दहा ते बारा ओळी मजकूर अपेक्षित.
- या कृतींसाठी कृतिपत्रिकेत प्रत्येक कृतीसाठी पाच मुद्दे दिलेले असतात.
- या कृतीचे उत्तर दोन परिच्छेदात अपेक्षित.

**कृती –** खालील मुद्द्यांच्या आधारे "मुलाखत ही कार्यकर्तृत्वाची ओळख असते", हे विधान स्पष्ट करा.
मुलाखत म्हणजे.......... कार्यक्षेत्रांतला ठसा........... असाधारण व्यक्ती.........आव्हाने........ विशेष आदर.

**उत्तर –** जेव्हा क्रमबद्ध प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीचे जीवन आणि कर्तृत्व श्रोत्यांसमोर उलगडून दाखवते, तेव्हा त्यांच्यात झालेला संवाद म्हणजे मुलाखत होय. मुलाखत देणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू समजून घेणे व त्याच्या कार्यकर्तृत्त्वावर प्रकाश टाकणे हे मुलाखतीचे प्रमुख हेतू असतात. ज्या व्यक्तींनी आपल्या कार्यक्षेत्रात विशेष ठसा उमटवला आहे अशा असाधारण व्यक्ती व ज्यांनी काही वेगळी आव्हाने पेलून यश मिळवले आहे अशा व्यक्तींची मुलाखत घेतली जाते.

मुलाखतदात्याच्या कर्तृत्वाबरोबरच त्याच्या आत दडलेला माणूस समजून घेणे व तो श्रोत्यांसमोर ठेवणेही महत्त्वाचे असते. मुलाखतदात्याने त्याच्या कार्यक्षेत्रात उल्लेखनीय यश कमावलेले असते त्यासाठी खूप खडतर मेहनत व आव्हाने पेललेली असतात, त्याची नोंद घेऊन ती वाचकांपर्यंत आणणे महत्त्वाचे असते. असाधारण कर्तृत्व असलेल्या व्यक्तींबद्दल समाजात आदर असतो तो मुलाखतकाराने सांभाळला पाहिजे. हे साधल्यास मुलाखत ही मुलाखतदात्याच्या कार्यकर्तृत्वाची ओळख ठरते.

- **सराव प्रश्न – . ( प्रत्येकी पाच गुण )**
  1. **खालील मुद्द्यांच्या आधारे मुलाखतीचे स्वरूप स्पष्ट करा.**
     मुलाखत म्हणजे......... सहेतुक संवादासाठी आवश्यक घटक......... मुलाखतीच्या माध्यमाचे स्वरूप........श्रोत्यांचे कुतूहल शमवणे....... असाधारण व्यक्ती.
  2. **खालील मुद्द्यांच्या आधारे मुलाखतीची पूर्वतयारी स्पष्ट करा.**
     मुलाखत म्हणजे......... भरपूर गृहपाठ आवश्यक.............. मुलाखतीत विचारायच्या प्रश्नांची तयारी.........मुलाखतीचे माध्यम........ मुलाखत बैठक व्यवस्था व अन्य तांत्रिक बाबी.
  3. **खालील मुद्द्यांच्या आधारे नोकरीसाठी मुलाखतीची वैशिष्ट्ये लिहा.**
     उमेदवाराची वैशिष्ट्ये........... उमेदवाराचे वर्तन....... जीवनविषयक दृष्टिकोन.......गटकार्यातील भावना......उमेदवाराचे व्यक्तिमत्त्व.
  4. **खालील मुद्द्यांच्या आधारे मुलाखत घेताना घ्यावयाची काळजी लिहा.**
     प्रश्नांचे स्वरूप...........मुलाखतकाराला स्वतःच्या मर्यादांची जाणीव....... वेळेचे बंधन.......श्रोत्यांचा सहभाग.......मुलाखतीत रसभंग होणार नाही याची काळजी.

***************************************************

# २. माहितीपत्रक

(बुलेट केलेला मजकूर “अतिमहत्त्वाचा” असे दर्शवतो.)

**संकल्पना स्पष्टीकरण : -**

आजच्या स्पर्धेच्या युगात जागतिकीकरणामुळे आणि व्यापारीकरणामुळे ग्राहक अधिक चौकस आणि चिकित्सक झाला आहे. उत्पादित वस्तूची सखोल माहिती त्याला घरबसल्या हवी असते. ही मानसिकता ओळखून व्यावसायिक निरनिराळे मार्ग हाताळतात त्यातील प्रभावी मार्ग माहितीपत्रक हा होय.

- **माहितीपत्रक म्हणजे** -

माहितीपत्रक म्हणजे उत्पादित वस्तूची माहिती देणारे परिचयात्मक पत्रक होय. हे एक प्रकारे उत्पादने, सेवा, संस्था लोकांपर्यंत पोहोचवण्याचे साधन आहे. माहितीपत्रकामुळे माहिती देणारा आणि माहिती घेणारा यांच्यात नाते निर्माण होते. माहितीपत्रक वाचताक्षणीच लोकांच्या मनात कुतूहल, उत्कंठा, औत्सुक्य जागे झाले पाहिजे. छोट्यातल्या छोट्या व्यावसायिकापासून मोठी उलाढाल असणाऱ्या व्यावसायिकापर्यंत सर्वांना माहितीपत्रकाची गरज असते.

**माहितीपत्रकाच्या रचनेची वैशिष्ट्ये -**

१. माहितीला प्राधान्य - माहिती हेतूशी सुसंगत, अचूक, आटोपशीर व संक्षिप्त असावी. वस्तुनिष्ठ, सत्य, वास्तव व कायदेशील बाबींची पूर्तता करणारी हवी.
२. उपयुक्तता - उपयोगमूल्य माहितीपत्रकाची परिणामकारकता वाढवत असते.
३. वेगळेपणा - वेगळी, नवीन, रोचक माहिती यामुळे ग्राहकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहते.
४. आकर्षक मांडणी - कागद, छपाई, आकार, शीर्षक, बोधवाक्य यांची सुयोग्य मांडणी व संगणक तज्ज्ञाची मदत यांमुळे ते वेधक होते.
५. भाषाशैली - भाषा उत्तम, सोपी व मनाला भिडणारी हवी.

## नमुना कृती उत्तरांसहित -

- अ) खालील कृती सोडवा. ( प्रत्येक कृतीस दोन गुण )
- दोन गुण असलेल्या कृतीस साधारणतः पाच ते सहा ओळी मजकूर अपेक्षित.

**कृती** - १) माहितीपत्रकाचे महत्त्व स्पष्ट करा.

माहितीपत्रक म्हणजे उत्पादित वस्तूची माहिती देणारे परिचयात्मक पत्रक होय. हे एक प्रकारे उत्पादने, सेवा, संस्था लोकांपर्यंत पोहोचवण्याचे साधन आहे. माहितीपत्रकामुळे माहिती देणारा आणि माहिती घेणारा यांच्यात नाते निर्माण होते. माहितीपत्रक वाचताक्षणीच लोकांच्या मनात कुतूहल, उत्कंठा, औत्सुक्य जागे झाले पाहिजे. छोट्यातल्या छोट्या व्यावसायिकापासून मोठी उलाढाल असणाऱ्या व्यावसायिकापर्यंत सर्वांना माहितीपत्रकाची गरज असते. जिथे जिथे लोकमत आकर्षित करण्याची गरज असते तिथे तिथे माहितीपत्रकाचे महत्त्व अधोरेखित होत असते. चांगल्या माहितीपत्रामुळे अधिकाधिक ग्राहक जोडले जातात.

**कृती - २) माहितीपत्रकाचे वेगळेपण तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.**

माहितीपत्रक म्हणजे उत्पादित वस्तूची माहिती देणारे परिचयात्मक पत्रक होय. हे एक प्रकारे उत्पादने,

सेवा, संस्था लोकांपर्यंत पोहोचवण्याचे साधन आहे. माहितीपत्रकामुळे माहिती देणारा आणि माहिती घेणारा यांच्यात नाते निर्माण होते. माहितीपत्रक वाचताक्षणीच लोकांच्या मनात कुतूहल, उत्कंठा, औत्सुक्य जागे झाले पाहिजे. छोट्यातल्या छोट्या व्यावसायिकापासून मोठी उलाढाल असणाऱ्या व्यावसायिकापर्यंत सर्वांना माहितीपत्रकाची गरज असते. वेगळी, नवीन, रोचक माहिती यामुळे माहितीपत्रक ग्राहकांच्या दीर्घकाळ स्मरणात राहते. वेगळेपणात लेआऊट, आकार, रचना, दृष्टिकोन या मुद्द्यांचा विचार केलेला असावा.

- **सराव प्रश्न – ( प्रत्येकी दोन गुण )**

  १ ."माहितीपत्रकाची भाषाशैली मनाची पकड घेणारी असावी", स्पष्ट करा.

  २. माहितीपत्रकाची उपयुक्तता थोडक्यात लिहा.

  ३. माहितीपत्रकाची आकर्षक मांडणी गरजेची असते, याबाबत तुमचे मत लिहा.

  ४. माहितीपत्रकाचे स्वरूप लिहा.

  आ) खालील कृती सोडवा. ( प्रत्येक कृतीस पाच गुण )

  - पाच गुण असलेल्या कृतीस साधारणतः दहा ते बारा ओळी मजकूर अपेक्षित.
  - या कृतींसाठी कृतिपत्रिकेत प्रत्येक कृतीसाठी पाच मुद्दे दिलेले असतात.
  - या कृतीचे उत्तर दोन परिच्छेदात अपेक्षित.

**कृती– खालील मुद्द्यांच्या आधारे माहितीपत्रकाच्या रचनेची वैशिष्ट्ये लिहा.**

माहितीपत्रक म्हणजे......... माहितीला प्राधान्य..... उपयुक्तता.......लिखित माध्यम..........भाषाशैली.

माहितीपत्रक म्हणजे उत्पादित वस्तूची माहिती देणारे परिचयात्मक पत्रक होय. हे एक प्रकारे उत्पादने, सेवा, संस्था लोकांपर्यंत पोहोचवण्याचे साधन आहे. माहितीपत्रकामुळे माहिती देणारा आणि माहिती घेणारा यांच्यात नाते निर्माण होते. माहितीपत्रक वाचताक्षणीच लोकांच्या मनात कुतूहल, उत्कंठा, औत्सुक्य जागे झाले पाहिजे. छोट्यातल्या छोट्या व्यावसायिकापासून मोठी उलाढाल असणाऱ्या व्यावसायिकापर्यंत सर्वांना माहितीपत्रकाची गरज असते. याच्या रचनेत माहितीला प्राधान्य, त्याची उपयुक्तता, वेगळेपण, आकर्षक मांडणी आणि भाषाशैली यांचा विचार केला जातो. या प्रत्येक घटकांच्या वैशिष्ट्यांवर आधारित माहितीपत्रकाची रचना ठरत जाते.

- **सराव प्रश्न – ( प्रत्येकी पाच गुण )**

१. **माहितीपत्रक आकर्षक** करण्यासाठी आवश्यक असलेली वैशिष्ट्ये लिहा.

   सरधोपटपणा टाळावा...........वाचनीयता महत्त्वाची........ कागद व छपाई यांची सुयोग्य काळजी......रंगीत मुखपृष्ठ......संगणकीय तज्ज्ञांची मदत.

२. खालील मुद्द्यांच्या आधारे **माहितीपत्रकाचे स्वरूप** स्पष्ट करा.

   माहितीपत्रक म्हणजे.........जनमत आकर्षित करणारे लिखित माध्यम...... ग्राहकाला होणारे फायदे...... माहितीपत्रकाचा हेतू..... वेगळेपण.

****************************************************

# ३. अहवाल

(बुलेट केलेला मजकूर “अतिमहत्त्वाचा” असे दर्शवतो.)

**संकल्पना स्पष्टीकरण : -**

- **अहवाल म्हणजे -**

एखाद्या कार्यालयात, संस्थेत झालेल्या कार्यक्रमांची, समारंभाची योग्य पद्धतीने नोंद करून ठेवणे म्हणजे अहवाल लेखन होय. ही नोंद करताना त्यात कार्यक्रमाचा हेतू, तारीख, वेळ, सहभागी व्यक्ती, प्रतिसाद, समारोप अशा विविध मुद्द्यांचा समावेश केलेला असतो. कार्यक्रमाची साद्यंत माहिती आवश्यक तेवढ्या लेखी नोंदींसह अहवालात केली जाते. प्रगती अहवाल, तपासणी अहवाल, चौकशी अहवाल, आढावा अहवाल, वार्षिक अहवाल असे अहवालांचे वेगवेगळे नमुने असतात.

**अहवालाची प्रमुख चार अंगे -**

१. प्रास्ताविक
२. मध्य
३. समारोप
४. अहवालाची भाषा

**अहवाल लेखनाची वैशिष्ट्ये -**

१. वस्तुनिष्ठता आणि सुस्पष्टता
२. विश्वसनीयता
३. सोपेपणा
४. शब्दमर्यादा
५. निःपक्षपातीपणा

अहवाल लेखन करताना विषयाची चांगली जाण, भाषेवर प्रभुत्व, संक्षिप्तता, सोपी भाषा, अचूकता, सूक्ष्म आकलन, परिपूर्णता या गुणांची गरज असते.

नमुना कृती उत्तरांसहित -

**अ) खालील कृती सोडवा. ( प्रत्येक कृतीस दोन गुण )**

- दोन गुण असलेल्या कृतीस साधारणतः पाच ते सहा ओळी मजकूर अपेक्षित.

**कृती** १. अहवाल लेखनाची उपयुक्तता लिहा.

एखाद्या कार्यालयात, संस्थेत झालेल्या कार्यक्रमांची, समारंभाची योग्य पद्धतीने नोंद करून ठेवणे म्हणजे अहवाल लेखन होय. ही नोंद करताना त्यात कार्यक्रमाचा हेतू, तारीख, वेळ, सहभागी व्यक्ती, प्रतिसाद, समारोप अशा विविध मुद्द्यांचा समावेश केलेला असतो. या मुद्द्यांमुळे भविष्यकाळात संस्थेचा विकास, परंपरा इत्यादींची माहिती मिळणे सोपे होते. या लेखनामुळे अहवालाला अधिकृतता प्राप्त होते. कोणती अडचण निर्माण झाल्यास आधीच्या अहवालाचा संदर्भ म्हणून वापर करता येतो.

**कृती** २. अहवालाच्या भाषेची वैशिष्ट्ये लिहा.

एखाद्या कार्यालयात, संस्थेत झालेल्या कार्यक्रमांची, समारंभाची योग्य पद्धतीने नोंद करून ठेवणे म्हणजे अहवाल लेखन होय. अहवालात विशिष्ट संज्ञा, पारिभाषिक शब्द यांचा वापर करावा लागतो. त्यानुसार त्या त्या क्षेत्रातील अहवालाची ठरावीक भाषा विकसित झालेली असते. अशा ठरावीक भाषेचा वापर अहवाल लेखन करताना केला जातो.

- सराव प्रश्न – ( प्रत्येकी दोन गुण )

  १ अहवालाचा आराखडा स्पष्ट करा.

  २. अहवालाची विश्वसनीयता थोडक्यात लिहा.

  ३. निःपक्षपातीपणा हे अहवालाचे वैशिष्ट्य आहे, याबाबत तुमचे मत लिहा.

  ४. अहवालाचे स्वरूप लिहा.

आ) खालील कृती सोडवा. ( प्रत्येक कृतीस पाच गुण )

- पाच गुण असलेल्या कृतीस साधारणतः दहा ते बारा ओळी मजकूर अपेक्षित.
- या कृतींसाठी कृतिपत्रिकेत प्रत्येक कृतीसाठी पाच मुद्दे दिलेले असतात.
- या कृतीचे उत्तर दोन परिच्छेदात अपेक्षित.

**कृती** – खालील मुद्द्यांच्या आधारे **अहवालाची प्रमुख अंगे** स्पष्ट करा.

प्रास्ताविक........अहवालाचा मध्य.......अहवालाचा शेवट......अहवालाची भाषा.....आवश्यकता.

एखाद्या कार्यालयात, संस्थेत झालेल्या कार्यक्रमांची, समारंभाची योग्य पद्धतीने नोंद करून ठेवणे म्हणजे अहवाल लेखन होय. प्रास्ताविकात समारंभाचा विषय, स्थळ, दिनांक, वेळ, स्वरूप व कार्यक्रमांची रूपरेषा असते. अहवालाच्या मध्यात क्रमबद्ध, मुद्देसूद विवेचन अपेक्षित आहे. समारोपात कार्यक्रमातील उल्लेखनीय बाबी, त्रुटी आणि यशस्विता याचा अभिप्राय नोंदवायचा असतो. अहवालात विशिष्ट संज्ञा, पारिभाषिक शब्द यांचा वापर करावा लागतो. त्यानुसार त्या त्या क्षेत्रातील अहवालाची ठरावीक भाषा विकसित झालेली असते. अशा ठरावीक भाषेचा वापर अहवाल लेखन करताना केला जातो.

- **सराव प्रश्न – ( प्रत्येकी पाच गुण )**

१. खालील मुद्द्यांच्या आधारे **अहवाल लेखनाची वैशिष्ट्ये** विशद करा.
   अहवाल म्हणजे.....सुस्पष्टता......वस्तुनिष्ठता......विश्वसनीयता.......विविध क्षेत्रांतील गरज.

२. खालील मुद्द्यांच्या आधारे **अहवालाचे स्वरूप** स्पष्ट करा.
   समारंभ किंवा कार्यक्रमाची नोंद........हेतू ते समारोप....तपशिलांसह टिपण.....विविध विषयांच्या निमित्ताने नेमलेले अहवाल.....विविध स्वरूपाच्या अहवालाची नोंद.

************************************************************

# ४. वृत्तलेख

(बुलेट केलेला मजकूर "अतिमहत्त्वाचा" असे दर्शवतो.)

**संकल्पना स्पष्टीकरण : -**

- **वृत्तलेख म्हणजे -**

अनेकदा बातमीपलीकडे असलेला तपशील वाचकांना देणे गरजेचे असते. बातमीत न आलेली रंजक, नावीन्यपूर्ण माहिती आणि तिचे सूक्ष्म धागेदोरे हे वाचकांना ज्या लेखात वाचायला मिळतात त्याला वृत्तलेख असे म्हणतात. वृत्तलेखाचा संबंध बातमीशी असतो. काही निमित्ताने लिहिला जाणारा हा लेख नेहमीच ताजा असावा लागतो. वृत्तलेखात अचूकतेबरोबरच वाचकांच्या भावनांचीही दखल घेतली जाते.

**वृत्तलेखाचे प्रकार** -

अ) बातमीवर आधारित वृत्तलेख
आ) व्यक्तिचित्रणात्मक वृत्तलेख
इ) मुलाखतीवर आधारित वृत्तलेख
ई) ऐतिहासिक स्थळांविषयी वृत्तलेख
उ) नवल, गूढ, विस्मय इत्यादींवर आधारित वृत्तलेख

**वृत्तलेखाच्या विषयांचे स्रोत** -

अ) बातमी
आ) व्यक्तिगत अनुभव
इ) भेटीगाठी/संभाषण
ई) निरीक्षण

**वृत्तलेख लिहितांना विचारात घ्यायच्या बाबी** -

अ) वाचकांची अभिरुची
आ) तात्कालिकता
इ) वेगळेपण
ई) वाचकांचे लक्ष वेधणे
उ) वृत्तलेखाची शैली

**नमुना कृती उत्तरांसहित -**

- अ) खालील कृती सोडवा. ( प्रत्येक कृतीस दोन गुण )
- दोन गुण असलेल्या कृतीस साधारणतः पाच ते सहा ओळी मजकूर अपेक्षित.

**कृती १ - वृत्तलेखाची कोणतीही चार वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.**

अनेकदा बातमीपलीकडे असलेला तपशील वाचकांना देणे गरजेचे असते. बातमीत न आलेली रंजक, नावीन्यपूर्ण माहिती आणि तिचे सूक्ष्म धागेदोरे हे वाचकांना ज्या लेखात वाचायला मिळतात त्याला वृत्तलेख असे म्हणतात. तो स्वतंत्र असून त्यातील मजकूर वैशिष्ट्यपूर्ण असावा लागतो. वृत्तलेख वाचनानंतर वाचकाला आनंद, माहिती, ज्ञान व मनोरंजन लाभले पाहिजे. वृत्तलेखाचा विषय, आशय, शैली, वाचकांच्या विचाराला चालना देणारी असते. वृत्तलेख लिहिणारा स्वतःचा अनुभव आणि त्या विषयाच्या संदर्भाने असलेली तज्ज्ञता वापरत असतो.

**कृती २ - मुलाखतीवर आधारित वृत्तलेखाचे महत्त्व सांगा.**

अनेकदा बातमीपलीकडे असलेला तपशील वाचकांना देणे गरजेचे असते. बातमीत न आलेली रंजक, नावीन्यपूर्ण माहिती आणि तिचे सूक्ष्म धागेदोरे हे वाचकांना ज्या लेखात वाचायला मिळतात त्याला

वृत्तलेख असे म्हणतात. मुलाखतीवर आधारित  वृत्तलेखात व्यक्तीच्या कर्तृत्वाची बाजू, संशोधन, मतप्रणाली, त्यांचा दृष्टिकोन, त्यांनी निवडलेले क्षेत्र, त्यांना लाभलेले यश व अनुभव यासंदर्भात मांडणी केली जाते. या लेखातून त्या माणसाच्या कर्तृत्वाची उंची व संबंधित क्षेत्रातील योगदान अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला जातो.

- **सराव कृती** - ( प्रत्येकी दोन गुण )

  १ बातमी आणि वृत्तलेख यातील फरक स्पष्ट करा.

  २. वृत्तलेखाच्या भाषेची वैशिष्ट्ये थोडक्यात लिहा.

  ३. वृत्तलेख लिहिताना वाचकांच्या अभिरुचीचा विचार करावा लागतो, याबाबत तुमचे मत लिहा.

  ४. वृत्तलेख लिहिताना विचारात घ्यायच्या बाबी लिहा.

आ) खालील कृती सोडवा. ( प्रत्येक कृतीस पाच गुण )

- पाच गुण असलेल्या कृतीस साधारणतः दहा ते बारा ओळी मजकूर अपेक्षित.
- या कृतींसाठी कृतिपत्रिकेत प्रत्येक कृतीसाठी पाच मुद्दे दिलेले असतात.
- या कृतीचे उत्तर दोन परिच्छेदात अपेक्षित.

**कृती** - खालील मुद्द्यांच्या आधारे **'बातमीवर आधारित वृत्तलेख'** याबाबत तुमचे मत लिहा.

वृत्तलेख म्हणजे.........घटनाधारित लेख.........संदर्भांची माहिती.....मुद्द्यांचे विश्लेषण..... विषयाला मर्यादा नाहीत.

अनेकदा बातमीपलीकडे असलेला तपशील वाचकांना देणे गरजेचे असते. बातमीत न आलेली रंजक, नावीन्यपूर्ण माहिती आणि तिचे सूक्ष्म धागेदोरे हे वाचकांना ज्या लेखात वाचायला मिळतात त्याला वृत्तलेख असे म्हणतात. सामाजिक संपर्क माध्यमातून समोर आलेल्या घटनेच्या अनुषंगाने वृत्तलेखनासंबंधीचे बीज मनात तयार होत असते. बातमीच्या मागे असलेल्या गोष्टी, संदर्भ, मुलाखत घेऊन लेखाची निर्मिती होते. बातमीतील मुद्द्यांचे विश्लेषण केले जाते. लिहिणाऱ्याकडे त्या विषयाच्या संदर्भाने ताजी, स्वतंत्र माहिती असते. वाचकाला नवीन वाचल्याचा आनंद मिळतो. वृत्तलेख स्थानिक ते आंतरराष्ट्रीय कोणत्याही विषयावर लिहिला जाऊ शकतो.

- सराव प्रश्न - ( प्रत्येकी पाच गुण )

१. खालील मुद्द्यांच्या आधारे **वृत्तलेख लिहितांना विचारात घ्यावयाच्या बाबी** स्पष्ट करा.
वाचकांची अभिरुची......तात्कालिक महत्त्व.....वेगळेपणा.....वाचकांचे लक्ष वेधून घेणे.... वृत्तलेखाची शैली.

२. खालील मुद्द्यांच्या आधारे **वृत्तलेखाची शैली** विशद करा.
वृत्तलेख म्हणजे.....सरळ, साधी व मनाला भिडणारी....शब्दबंबाळ नको....वाक्यरचना छोटी.....वाचकांची जिज्ञासा शमवणारी.

*********************************************************

# विभाग ५ – व्याकरण व लेखन

**गुण–२०**

विद्यार्थी मित्रांनो,

आपल्या बारावी मराठी कृतिपत्रिकेतील पाचवा विभाग हा २० गुणांसाठी आहे. म्हणजेच १/४ किंवा २५% भारांश या विभागास आहे. यावर येणाऱ्या जवळजवळ सर्व कृती या पाठ्यपुस्तकातीलच असतात.

| | | |
|---|---|---|
| या विभागात | 'अ' व्याकरण | = १० गुण |
| | 'आ' निबंध | = १० गुण |

**'अ' व्याकरण विभागात –**

| | |
|---|---|
| १) वाक्यरूपांतर – | ०२ गुण |
| २) समास – | ०२ गुण |
| ३) प्रयोग – | ०२ गुण |
| ४) अलंकार – | ०२ गुण |
| ५) वाक्प्रचार – | ०२ गुण |

**"वाक्यरूपांतर" हा घटक दोन गुणांसाठी आहे.**

(य) दिलेल्या चार पर्यायांतून वाक्यरूपांतराचा योग्य पर्याय निवडून लिहावयाचा असतो. ०१ गुण.

(र) मध्ये दिलेले वाक्य सूचनेनुसार वाक्यरूपांतर करून लिहायचे असते. यासाठी ०१ गुण आहे.

## घटक १ – वाक्यप्रकार व वाक्यरूपांतर

वाक्याचे रूपांतर करताना वाक्याच्या रचनेत बदल होत असला, तरी वाक्याच्या अर्थात बदल न करता अर्थ कायम ठेवून वाक्यरूपांतर करावे लागते. 'वाक्यार्थाला बाध न आणता वाक्याच्या रचनेत केलेला बदल म्हणजे "वाक्यरूपांतर". आपल्या कृतिपत्रिकेत – विधानार्थी, प्रश्नार्थी, उद्गारार्थी, होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे वाक्यरूपांतर विचारले जाते. आतापर्यंतच्या कृतिपत्रिकेत 'आज्ञार्थी-विध्यर्थी' वाक्यरूपांतर विचारलेले नाही. येणाऱ्या कृतिपत्रिकेत कदाचित विचारले जाऊ शकते.

➢ प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर करताना प्रश्न होकारार्थी असेल तर विधानार्थी वाक्य नकारार्थी करावे व प्रश्न नकारार्थी असेल तर विधानार्थी वाक्य होकारार्थी करावे.

उदा– जगात सर्व सुखी असा कोण आहे? (प्रश्नार्थी)
जगात सर्व सुखी असा कोणी नाही. (विधानार्थी)

➢ उद्गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर करताना उद्गारार्थी वाक्यांतील बापरे!, अबब!, किती, केवढी यांसारख्या वैपुल्य व परिणामकारकता दर्शवणाऱ्या शब्दांऐवजी खूप, फार, प्रचंड, भरपूर असे शब्द वापरावे लागतात आणि क्रियापदाचे स्थान बदलून घ्यावे लागते.

उदा– किती छान आहे हे फूल !

हे फूल खूप छान आहे.

- होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर करताना अर्थ कायम ठेवण्यासाठी विरुद्धार्थी शब्द वापरावे लागतात. क्रियापदांची रूपे विरुद्धार्थी वापरावी लागतात.
  उदा- त्याच्यासाठी हजार रूपये ही देखील मोठी रक्कम आहे. (होकारार्थी)
  त्याच्यासाठी हजार रूपये ही काही छोटी रक्कम नाही. (नकारार्थी)

- आज्ञार्थी व विध्यर्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर करताना क्रियापदाचे रूप बदलावे लागते.
  उदा. तू नियमित व्यायाम कर. (आज्ञार्थी)
  तू नियमित व्यायाम करावास. (विध्यर्थी)

## नमुना कृती

**(१) पांढरा रंग सर्वांना आवडतो.**

वरील वाक्याचे 'प्रश्नार्थी वाक्य' ओळखा.

१)कोणाला आवडतो पांढरा रंग ?
२)पांढरा रंग कोणाला आवडत नाही?
३)सर्वांनाच पांढरा रंग आवडतो का?
४)कोणाकोणाला आवडतो पांढरा रंग?

**(२) मोबाईलचा अतिवापर योग्य नाही.**

वरील वाक्याचे 'होकारार्थी वाक्य' ओळखा.

१) मोबाईलचा जास्त वापर योग्य आहे.
२) मोबाईलचा कमी वापर अयोग्य आहे.
३) मोबाईलचा अतिवापर अयोग्य आहे.
४)मोबाईलचा अतिवापर योग्य आहे.

**(३) ही पाषाणमूर्ती खूप सुंदर आहे.**

वरील वाक्याचे 'उद्‌गारार्थी' वाक्य ओळखा.

१)सुंदर आहे ही पाषाणमूर्ती!
२) पाषाणमूर्ती सुंदर आहे ही!
३) पाषाणमूर्ती आहे ही सुंदर!
४) किती सुंदर आहे ही पाषाणमूर्ती !

**(४) तुम्ही सर्वांशीच चांगले बोला,** (नकारार्थी वाक्य करा.)

**(५) स्वयंशिस्त हीच खरी शिस्त आहे.** (प्रश्नार्थी वाक्य करा.)

### नमुना कृती उत्तरे

| | | |
|---|---|---|
| (१) प्रश्नार्थी वाक्य | - | २)पांढरा रंग कोणाला आवडत नाही? |
| (२) होकारार्थी वाक्य | - | ३) मोबाईलचा अतिवापर अयोग्य आहे |
| (३) उद्‌गारार्थी वाक्य | - | ४)किती सुंदर आहे ही पाषाणमूर्ती! |
| (४) नकारार्थी | - | तुम्ही कोणाशीच वाईट बोलू नका. |
| (५) प्रश्नार्थी | - | स्वयंशिस्त ही खरी शिस्त नाही का? |

### सराव कृती

**(१) माणसं स्वतःचा छंद कसा विसरू शकतात ?**

वरील वाक्याचे 'विधानार्थी' वाक्य ओळखून लिहा.

१) माणसं स्वतःचा छंद नेहमी विसरतात.
२) माणसं स्वतःचा छंद लक्षात ठेवतात.
३) माणस स्वतःचा छंद विसरू शकत नाहीत.
४) माणसं स्वतःचा छंद किती लक्षात ठेवतात.

**(२) हा आनंद सर्वत्र असतो.**
वरील वाक्याने 'प्रश्नार्थी' वाक्य ओळखून लिहा.
१) हा आनंद कुठे नसतो? ३) हा आनंद सर्वत्र नसतो का?
२) हा आनंद कुठे असतो? ४) ही आनंद सर्वच असतो का?

**(३) किती आतून हसतात ती!**
वरील वाक्याचे 'विधानार्थी' वाक्य ओळखून लिहा.
१) ती आतून हसतात. ३) ती आतून हसत राहतात.
२)ती फार हसतात आतून. ४)ती खूप आतून हसतात.

**(४) निशिगंधासारखा निशिगंधच होय.**
वरील वाक्याचे 'उद्‌गारार्थी' वाक्य ओळखून लिहा.
१)निशिगंध हा निशिगंधच असेल ! ३) निशिगंधासारखा निशिगंधच कसा!
२)निशिगंध म्हणजे निशिगंधच! ४) निशिगंध म्हणजे गंध !

**(५) किती अफाट पाऊस पडला काल !** (विधानार्थी वाक्य करा.)
**(६) चैनीच्या वस्तू महाग असतात.** (नकारार्थी वाक्य करा.)
**(७) निरोगी राहावे असे सर्वांना वाटते.** (प्रश्नार्थी वाक्य करा.)
**(८) परशाने प्रश्न नम्रपणे विचारला नव्हता.** (होकारार्थी वाक्य करा)
**(९) आजच्या जीवनात विलक्षण वेगवानता आढळते.** (उद्‌गारार्थी वाक्य करा.)
**१०) ज्ञान संपादनासाठी भरपूर वाचन करावे.** (आज्ञार्थी वाक्य करा.)

## सराव कृती – उत्तरे

(१) विधानार्थी ३) माणसे स्वतःचा छंद विसरू शकत नाहीत.
(२) प्रश्नार्थी १) हा आनंद कुठे नसतो?
(३) विधानार्थी ४) ती खूप आतून हसतात.
(४) उद्‌गारार्थी २) निशिगंध म्हणजे निशिगंधच!
(५) विधानार्थी – काल फार पाऊस पडला.
(६) नकारार्थी – चैनीच्या वस्तू स्वस्त नसतात.
(७) प्रश्नार्थी – निरोगी राहावे असे कोणाला वाटत नाही?
(८) होकारार्थी – परशाने उद्धटपणे प्रश्न विचारला होता.
(९) उद्‌गारार्थी – किती विलक्षण वेगवानता आढळते आजच्या जीवनात!
(१०) आज्ञार्थी – ज्ञान संपादनासाठी भरपूर वाचन करा.

****************************************************************

# घटक २ समास

(समास हा उपघटक ०२ गुणांसाठी आहे.)

१) सामासिक शब्दाच्या प्रकाराचे चार पर्याय दिलेले असतात. योग्य पर्याय निवडून लिहिल्यास ०१ गुण. २) विचारलेल्या सामासिक शब्दाचा मुख्य प्रकार विद्यार्थ्याने लिहिणे अपेक्षित आहे. यासाठी एक गुण आहे. (विद्यार्थ्याने मुख्य प्रकाराबरोबर उपप्रकार लिहिला तरी चालतो. उपप्रकार लिहिलाच पाहिजे अशी अपेक्षा नाही.) विचारलेले 'सामासिक शब्द' हे पाठ्यपुस्तकातीलच असतील. सामासिक शब्दाचा विग्रह विचारलेला नाही. फक्त सामासिक शब्द व त्याचा प्रकार अपेक्षित आहे. एकच सामासिक शब्द दोन प्रकारांत येऊ शकतो पण पाठ्यपुस्तकात त्या सामासिक शब्दाचा जो प्रकार दिलेला आहे; तोच उत्तरामध्ये अपेक्षित आहे.

'समास' हा शब्दसिद्धीचा एक प्रकार आहे समास म्हणजे एकत्र असणे. दोन पदे (शब्द) एकत्र येऊन एकशब्द तयार होतो, त्यास समास असे म्हणतात.

- **समासाचे चार मुख्य प्रकार** -

**१) अव्ययीभाव समास**- यातील पहिले पद महत्त्वाचे असते. हे पद अव्यय असते. उदा.-आकंठ, प्रतिदिन, यथाशक्ती, गैरहजर, घरोघर, पावलोपावली इ.

**२) तत्पुरुष समास** - यातील दुसरे पद महत्त्वाचे असते. याचे ७/८ उपप्रकार आहेत.यातील तीन उपप्रकार अभ्यासासाठी आहेत.

**अ) विभक्ती तत्पुरुष समास-** यातील प्रथम पदाला विभक्तीचा प्रत्यय लागलेला असतो. उदा- राजाज्ञा (राजाची आज्ञा) सूर्योदय (सूर्याचा उदय)इ.

**आ) कर्मधारय समास-** यातील एक पद विशेषण असते व दुसरे पद नाम (विशेष्य) असते. उदा- नीलकमल (नील असे कमल), परमेश्वर (परम असा ईश्वर)

**इ) द्विगू समास-** यातील पहिले पद संख्याविशेषण असते. व ते समूहदर्शक असते. उदा- त्रिदल (तीन दलांचा समूह), दशदिशा (दहा दिशांचा समूह)

**३) द्वंद्व समास**- यातील दोन्ही पदे महत्त्वाची असतात. याचे तीन उपप्रकार आहेत.

**अ)इतरेतर द्वंद्व समास-** यात विग्रह करताना 'व', 'आणि' या उभयान्वयी अव्ययांचा वापर होतो. उदा- भीमार्जुन (भीम आणि अर्जुन), पतिपत्नी (पती व पत्नी)

**आ)) वैकल्पिक द्वंद्व समास-** यात विग्रह करताना किंवा, वा, अथवा या विकल्पदर्शक उभयान्वयी अव्ययांचा वापर होतो.उदा- खरेखोटे (खरे किंवा खोटे) कमी-अधिक (कमी वा अधिक)

**इ)समाहार द्वंद्व समास**- समाहार म्हणजे समावेश, त्या गटातील इतर गोष्टींचा समावेश होतो व तो वगैरे शब्दाने दर्शविला जातो. उदा- चहापाणी (चहा, कॉफी फलाहार, पाणी वगैरे)

**४) बहुव्रीही समास** - यातील दोन्ही पदे महत्त्वाची नसून त्यावरुन तिसऱ्याच अर्थाचा बोध होतो. उदा- जितेंद्रिय (जिंकली (जित) आहेत इंद्रिये ज्याने असा),
मीनाक्षी (माशासारखे (मीन) आहेत डोळे (अक्ष) जिचे अशी)

## नमुना कृती

(१) 'पतिपत्नी' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.
१) कर्मधारय समास
२) विभक्ती तत्पुरुष समास
३) इतरेतर द्वंद्व समास
४) द्विगू समास

(२) "प्रतिक्षण" या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.
१) अव्ययीभाव समास
२) तत्पुरुष समास
३) द्वंद्व समास
४) बहुव्रीही समास

३) 'पुरुषोत्तम' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.

४)'लंबोदर' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.

५) 'नाट्यगृह' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.

## नमुना कृती - उत्तरे

१) पतिपत्नी- इतरेतर द्वंद्व समास
२) प्रतिक्षण-अव्ययीभाव समास
३) पुरुषोत्तम- तत्पुरुष समास ( कर्मधारय समास)
४)लंबोदर- बहुव्रीही समास
५) नाट्यगृह- तत्पुरुष समास (चतुर्थी विभक्ती तत्पुरुष समास)

## सरावकृती

१) 'ठायीठायी' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.
१) अव्ययीभाव समास
२) तत्पुरुष समास
३) द्वंद्व समास
४) बहुव्रीही समास

२) "सूर्यास्त" या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.
१) अव्ययीभाव समास
२) विभक्ती तत्पुरुष समास
३) द्वंद्व समास
४)बहुव्रीही समास

३) "महात्मा" या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.

१) इतरेतर द्वंद्व समास
३) कर्मधारय समास
२) वैकल्पिक द्वंद्व समास
४) समाहार द्वंद्व समास

४) 'दशदिशा' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा
१) अव्ययीभाव समास
३) विभक्ती तत्पुरुष समास
२) बहुव्रीही समास
४) द्विगू समास

५) 'वृक्षवेली' या सामासिक शब्दातील समास ओळखून लिहा.
१) विभक्ती तत्पुरुष समास
३) कर्मधारय समास
२) इतरेतर द्वंद्व समास
४) द्विगू समास

६) 'गुणदोष' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.
७) 'ताणतणाव' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.
८) 'लक्ष्मीकांत' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.
९) 'दरडोई' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.
१०) 'सर्वांगदाह' या सामासिक शब्दातील समासाचे नाव लिहा.

## सराव कृती - उत्तरे

१) ठायीठायी- अव्ययीभाव समास
२) सूर्यास्त- विभक्ती तत्पुरुष समास
३) महात्मा- कर्मधारय समास
४) दशदिशा- द्विगू समास
५) वृक्षवेली- इतरेतर द्वंद्व समास
६) गुणदोष- द्वंद्व समास (वैकल्पिक द्वंद्व समास)
७) ताणतणाव- द्वंद्व समास (समाहार द्वंद्व समास)
८) लक्ष्मीकांत- बहुव्रीही समास
९) दरडोई- अव्ययीभाव समास
१०) सर्वांगदाह- तत्पुरुष समास (विभक्ती तत्पुरुष समास)

## अधिक सरावासाठी पाठ्यपुस्तकातील सामासिक शब्द व प्रकार

**अव्ययीभाव समास**

आजन्म ,आकंठ , प्रतिक्षण , प्रतिदिन , प्रतिवर्षी, यथाप्रमाण , यथाशक्ती, यथोचित
दरडोई , गैरहजर , व्यक्तिगणिक ,घरोघर , दिवसेंदिवस, दारोदारी , पावलोपावली

**तत्पुरुष समास-विभक्ती तत्पुरुष समास**

राष्ट्रार्पण , लोकार्पण , लोकप्रिय , कष्टसाध्य, बालकमंदिर, जीवनशैली
घरमालक , वनभोजन , जलदुर्ग

**तत्पुरुष समास-कर्मधारय**
अक्षरआनंद , श्यामसुंदर , नरश्रेष्ठ , नरसिंह , मानधन , वेशांतर ,कमलनयन, दुष्काळ
**तत्पुरुष समास- द्विगू समास**
त्रिदल, त्रिकोण , चौघडी , पंचधातू , पंचमहाभूते , षण्मास, सप्ताह
अष्टांग , नवरात्र , दशदिशा

**द्वंद्व समास- इतरेतर**
स्त्रीपुरुष , सुईदोरा , अहोरात्र , विटीदांडू , मायलेकरे ,कुलूपकिल्ली

**द्वंद्व समास- वैकल्पिक**
योग्यायोग्य , बावीस-तेवीस , सुखदुःख , इष्टानिष्ट , लहानमोठे , भलेबुरे

**द्वंद्व समास- समाहार**
चहापाणी , ताणतणाव ,झुणकाभाकर , शेजारीपाजारी ,गप्पागोष्टी, केरकचरा ,घरदार
अंथरूणपांघरूण

**बहुव्रीही समास**
गोपाल, नीलकंठ, मीनाक्षी, षडानन, दशमुख , अथांग , निर्धन , निष्कलंक ,नीरस
नीरव, सनाथ, सप्रमाण , सहाध्यायी ,निष्प्राण

************************************************************

# घटक ३ प्रयोग

प्रयोग उपघटक ०२ गुणांसाठी आहे. कृतिपत्रिकेत दिलेल्या चार पर्यायांतून योग्य पर्यायाची निवड करणे यासाठी ०१ गुण आहे. विचारलेल्या प्रयोगाचे वाक्य निवडून लिहिण्यासाठी ०१ गुण आहे.

- वाक्यातील कर्ता, कर्म व क्रियापद यांच्यातील परस्पर संबंध व्यक्त करणाऱ्या रचनेला प्रयोग म्हणतात.
- कर्ता - वाक्यातील कर्ता शोधण्यासाठी क्रियापदाच्या मूळ धातूला करणारा/करणारी/करणारे यापैकी योग्य पर्याय लावून कोण असा प्रश्न विचारावा. मिळणारे उत्तर म्हणजे कर्ता होय.
- कर्म - वाक्यातील कर्म शोधण्यासाठी क्रियापदाच्या मूळ धातूला लेला/लेली/लेले/लेल्या यांपैकी योग्य पर्याय लावून काय असा प्रश्न विचारावा. मिळणारे उत्तर म्हणजे कर्म होय.

**प्रयोगाचे मुख्य प्रकार तीन -**

- **कर्तरी प्रयोग** - वाक्यातील कर्त्याच्या पुरुष, लिंग व वचनानुसार क्रियापद बदलते तेव्हा कर्तरी प्रयोग होतो. कर्तरी प्रयोगातील कर्ता हा नेहमा प्रथमा विभक्तीत असतो. कर्म असल्यास ते प्रथमा किंवा द्वितीया विभक्तीत असते.
- **कर्मणी प्रयोग** - वाक्यातील क्रियापद कर्माच्या लिंग, वचनानुसार बदलते तेव्हा कर्मणी प्रयोग होतो. कर्मणी प्रयोगात कर्म नेहमी प्रथमा विभक्तीत असते. कर्ता सामान्यतः तृतीया विभक्तीत असतो.
- **भावे प्रयोग** - वाक्यातील क्रियापदाचे रूप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग, वचनाप्रमाणे बदलत नसून ते नेहमी तृतीयपुरुषी, नंपुसकलिंगी व एकवचनी असून स्वतंत्र असते. कर्ता सामान्यतः तृतीया विभक्तीत असतो. कर्म असल्यास द्वितीया विभक्तीत असतो. क्रियापद एकारान्त असते.

**सराव कृती**

१. 'मी हलकेच उठतो', या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.
   १. कर्तरी प्रयोग
   २. कर्मणी प्रयोग
   ३. भावे प्रयोग
   ४. यांपैकी नाही.

२. 'आपली पाठ्यपुस्तके संस्कारांच्या खाणी असतात', या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.
   १. कर्मणी प्रयोग
   २. कर्तरी प्रयोग
   ३. भावे प्रयोग
   ४.यांपैकी नाही.

३. 'श्रीधरपंतांनी बैलांना बांधले,' या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.
   १. कर्तरी प्रयोग
   २. कर्मणी प्रयोग
   ३. भावे प्रयोग
   ४. यांपैकी नाही.

४. 'कर्मणी प्रयोग' असलेले वाक्य शोधून लिहा.
   १. त्यांनी आम्हाला दृक्-श्राव्य दालनात नेले.
   २. भाग्यश्री जणू आमच्यात नव्हती.
   ३. आम्ही धैर्याचा मुखवटाच चढवला होता.
   ४. सैनिकाने शत्रूला सीमेवर रोखले.

५. 'भावे प्रयोग' असलेले वाक्य शोधून लिहा.
   १. त्यांना आपण जपलं पाहिजे.

२. मी डायनिंग टेबलजवळ येतो.

३. हा संदेश मला पोहोचवता आला.

४. तुम्ही गाडीतच बसा.

**वरील सराव कृतींची उत्तरे**

१) कर्तरी प्रयोग २. कर्तरी प्रयोग ३. भावे प्रयोग ४. कर्मणी प्रयोग- आम्ही धैर्याचा मुखवटाच चढवला होता. ५. भावे प्रयोग- त्यांना आपण जपलं पाहिजे.

## सराव कृती २

१. 'कमलने बक्षीस मिळवले', या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

१. कर्तरी प्रयोग

२. कर्मणी प्रयोग

३. भावे प्रयोग

४.यांपैकी नाही.

२. 'मुले प्रदर्शनातील चित्रे पाहतात', या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

१. कर्तरी प्रयोग

२. कर्मणी प्रयोग

३.भावे प्रयोग

४.यांपैकी नाही.

३. “तबेल्यातून व्रात्य घोडा पसार झाला”, या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

१. कर्तरी प्रयोग

२. कर्मणी प्रयोग

३. भावे प्रयोग

४. यांपैकी नाही.

४. “दलालांनी मार्गदर्शन संपवून चहा मागवला”, या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

१. कर्तरी प्रयोग

२. कर्मणी प्रयोग

३. भावे प्रयोग

४. यांपैकी नाही.

५. “सगळे खूष होतात”, या वाक्यातील प्रयोग ओळखून लिहा.

१. कर्तरी प्रयोग

२. कर्मणी प्रयोग

३. भावे प्रयोग

४. यांपैकी नाही.

६. "भावे प्रयोग" असलेले वाक्य शोधून लिहा.

१. आज लवकर सांजावले.

२. त्याने कपाटात पुस्तक ठेवले.

३. युवादिनी वक्त्याने प्रेरणादायी भाषण दिले.

४. त्याने माझ्या हिरड्यांत इंजेक्शन दिले.

७. "कर्मणी प्रयोग" असलेले वाक्य शोधून लिहा.

१. सुजाण नागरिक परिसर स्वच्छ ठेवतात.

२. शिक्षकाने विद्यार्थ्यांना शिकविले.

३. भारतीय संघाने विश्वचषक स्पर्धा जिंकली.

४. मावळ्यांनी शत्रूस युद्धभूमीवर घेरले.

८. "कर्तरी प्रयोग" असलेले वाक्य शोधून लिहा.

१. गुराख्याने गुरांना विहिरीपासून दूर नेले.

२. सकाळी तो सरावासाठी मैदानावर गेला.

३. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागतगीत गायले.

४. शेतकऱ्याने फुलांची रोपे लावली.

९. "भावे प्रयोग" असलेले वाक्य शोधून लिहा.

१. मुख्याध्यापकांनी इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना बोलावले.

२. कमलने बक्षीस मिळवले.

३. स्वाती चित्र रंगवते.

४. मुलगी सूचनाफलक वाचते.

१०. "कर्तरी प्रयोग" असलेले वाक्य शोधून लिहा.

१. आम्ही अनेक किल्ले पाहिले.

२. कप्तानाने सैनिकांना सूचना दिली.

३. डॉक्टरांनी लीलया दात उपटला.

४. तुम्ही गाडीतच बसा.

**वरील सराव कृतींची उत्तरे**

१. कर्मणी प्रयोग  २. कर्तरी प्रयोग  ३. कर्तरी प्रयोग  ४. कर्मणी प्रयोग  ५. कर्तरी प्रयोग  ६. आज लवकर सांजावले. ७. भारतीय संघाने विश्वचषक स्पर्धा जिंकली. ८. सकाळी तो सरावासाठी मैदानावर गेला. ९. मुख्याध्यापकांनी इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना बोलावले. १०. तुम्ही गाडीतच बसा.

## खालील वाक्ये पुन्हा पुन्हा वाचा.

- **कर्तरी प्रयोगाची वाक्ये**

१. समीर चित्र रंगवतो.
२. स्वाती चित्र रंगवते.
३. मुलगी सूचनाफलकावर वाचते.
४. मुली सूचनाफलक वाचतात.
५. आम्ही शाळेत जातो.
६. त्या शाळेत जातात.
७. सुजाण नागरिक परिसर स्वच्छ ठेवतात.
८. सकाळी तो सरावासाठी मैदानावर जातो.
९. मुले प्रदर्शनातील चित्रे पाहतात.
१०.तबेल्यातून व्रात्य घोडा पसार झाला.
११.आपली पाठ्यपुस्तके संस्कारांच्या खाणी आहेत.
१२.तुम्ही गाडीतच बसा.
१३.भाग्यश्री जणू आमच्यात नव्हतीच.
१४.मी हलकेच खिडकी उघडतो.
१५.चार दिवसांनी दात दुखायचा थांबतो.
१६.सगळे खूष होतात.

- **कर्मणी प्रयोगाची वाक्ये**

१. केशवने सदरा खरेदी केला.
२. केशवने विजार खरेदी केली.
३. कमलने बक्षीस मिळवले.
४. कमलने बक्षीसे मिळवली.
५. त्याने कपाटात पुस्तक ठेवले.
६. आम्ही किल्ले पाहिले.
७. भारतीय संघाने विश्वचषक स्पर्धा जिंकली.
८. दलालांनी मार्गदर्शन संपवून चहा मागविला.
९. त्यांनी ती सात-आठ चित्रे पुन्हा चितारून दाखवली.
१०.डॉक्टरांनी लीलया दात उपटला.
११.त्याने माझ्या हिरड्यांत इंजेक्शन दिले.
१२.कप्तानाने सैनिकांना सूचना दिली.
१३.शेतकऱ्याने फुलांची रोपे लावली.
१४.युवादिनी वक्त्याने प्रेरणादायी भाषण दिले.

१५.आम्ही धैर्याचा मुखवटा चढवला होता.

- **भावे प्रयोगाची वाक्ये**
  १. सैनिकाने शत्रूला सीमेवर रोखले.
  २. श्रीधरपंतांनी बैलांना बांधले.
  ३. आज लवकर सांजावले.
  ४. शिक्षकाने विद्यार्थ्यास शिकवले.
  ५. गुराख्याने गुरांना विहिरीपासून दूर नेले.
  ६. मावळ्यांनी शत्रूस युद्धभूमीवर घेरले.
  ७. त्यांना आपण जपले पाहिजे.
  ८. आकाशात ढग जमल्यामुळे आज लवकर सांजावले.
  ९. मुख्याध्यापकांना इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना बोलावले.
  १०.सुमित्राबाईंनी गाईला बांधले.
  ११.त्याने गोऱ्ह्याला बांधले.
  १२.आम्ही शेळ्यांना बांधले.
  १३.सैनिकांनी शत्रूला सीमेवर रोखले.
  १४.सैनिकाने शत्रूंना सीमेवर रोखले.
  १५.सैनिकांनी शत्रूंना सीमेवर रोखले.

*****************************************************

# घटक ४ – अलंकार

(अलंकार हा घटक ०२ गुणांसाठी आहे.)

अनन्वय, अपन्हुती, अतिशयोक्ती आणि अर्थान्तरन्यास या चार अलंकारांवर कृती आधारित आहेत.

य) दिलेल्या चार पर्यायांमधून कोणताही एक योग्य पर्याय निवडण्यासाठी ०१ गुण आहे.

र) अनन्वय / अपन्हुती अलंकाराचे एक उदाहरण देऊन त्यातील उपमेय / उपमान ओळखून लिहिण्यासाठी ०१ गुण आहे.

- उपमेय - अलंकारात ज्याची तुलना करावयाची  उपमेय.
- उपमान - अलंकारात ज्याच्याशी तुलना करायवयाची ते उपमान.

१. **अनन्वय अलंकार** – उपमेयाला उपमेयाचीच उपमा दिली जाते तेव्हा “अनन्वय” अलंकार होतो. या अलंकारात उपमेय व उपमान एकच असते.

उदाः या आंब्यासारखा गोड आंबा हाच.

२. **अपन्हुती अलंकार** - उपमेयाचा निषेध करून उपमेय हे उपमानच आहे, असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा “अपन्हुती” अलंकार होतो.

उदाः न हे वदन, चंद्रमा शरदिचा गमे केवळ ||

३. **अतिशयोक्ती अलंकार** - कोणतीही कल्पना आहे त्यापेक्षा फुगवून सांगताना त्यातील असंभाव्यता अधिक स्पष्ट करून सांगितली जाते, त्यावेळी “अतिशयोक्ती अलंकार” होतो.

उदाः वीर मराठे आले गर्जत!
पर्वत सगळे झाले कंपित!

४. **अर्थान्तरन्यास अलंकार** – विशेष उदाहरणावरून एखादा सर्वसामान्य सिद्धान्त सांगितला जातो किंवा सामान्य विधानाच्या समर्थनार्थ विशेष उदाहरणे दिली जातात, तेव्हा अर्थान्तरन्यास अलंकार होतो.

उदाः अनंत मरणे अधी मरावीं,
स्वातंत्र्याची आस धरावी,
मारिल मरणचि मरणा भावी,
मग चिरंजीवपण ये बघ तें.

## नमुना कृती –

१. “मुंगी उडाली आकाशी
तिने गिळिले सूर्यासी!”

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.

१. अनन्वय
२. अपन्हुती
३. अतिशयोक्ती
४. अर्थान्तरन्यास

२. जो अंबरी उफळता खुर लागलाहे |
ते चंद्रमा निज तनूवरि डाग लाहे ||

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.

१. अनन्वय
२. अपन्हुती

३. अतिशयोक्ती

४. अर्थान्तरन्यास

३. "या दानासी या दानाहुन
अन्य नसे उपमान"

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.

१. अनन्वय

२. अपन्हुती

३. अतिशयोक्ती

४. अर्थान्तरन्यास

४. "न तारका फेनचि हा तळाशी", या वाक्यातील उपमान ओळखा.

५. कर्णासारखा दानशूर कर्णच या वाक्यातील उपमेय ओळखा.

**वरील कृतींची उत्तरे-**

१. अतिशयोक्ती अलंकार २. अतिशयोक्ती अलंकार ३. अनन्वय अलंकार
४. उपमान - फेन ( फेस ) ५. उपमेय - कर्ण.

## सराव कृती –

१. फूल गळे, फळ गोड जाहलें,
बीज नुरे, डौलांत तरू डुले;
तेज जळे, बघ ज्योत पाजळे;
का मरणिं अमरता ही न खरी?

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.

१. अनन्वय

२. अपन्हुती

३. अतिशयोक्ती

४. अर्थान्तरन्यास

२. होईल जरी संतत दुष्टसंग
न पावती सज्जन सत्त्वभंग
असोनिया सर्प सदाशरीरीं
झाला नसे तो चंदन विषारी

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.

१. अनन्वय

२. अपन्हुती

३. अतिशयोक्ती

४. अर्थान्तरन्यास

३. दमडिचं तेल आणलं, सासूबाईंचं न्हाणं झालं
मामाजींची दाढी झाली, भावोजींची शेंडी झाली
उरलं तेल झाकून ठेवलं, लांडोरीचा पाय लागला
वेशीपर्यंत ओघळ गेला, त्यात उंट पोहून गेला.

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.

१. अनन्वय
२. अपन्हुती
३. अतिशयोक्ती
४. अर्थान्तरन्यास

४. तदितर खग भेणें वेगळाले पळाले|
उपवन-जल-केली जे कराया मिळाले||
स्वजन, गवसला जो, त्याजपाशी नसे तो|
कठिण समय येता कोण कामास येतो ?

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.

१. अनन्वय
२. अपन्हुती
३. अतिशयोक्ती
४. अर्थान्तरन्यास

५. जन पळभर म्हणतिल, “हाय हाय!”
मी जाता राहिल कार्य काय?

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखून लिहा.

१. अनन्वय
२. अपन्हुती
३. अतिशयोक्ती
४. अर्थान्तरन्यास

६. आहे ताजमहाल एक जगती तो तोच त्याच्यापरी,
या वाक्यातील उपमेय ओळखा.

७. न हे वदन, चंद्रमा शरदिचा गमे केवळ,
या वाक्यातील उपमान ओळखा.

८. अर्जुनासारखा पराक्रमी अर्जुनच,
या वाक्यातील उपमान ओळखा.

९. न हे नभोमंडल वारिराशी,
या वाक्यातील उपमेय ओळखा.

१०. सागरासारखा गंभीर सागरच!
 या वाक्यातील उपमान ओळखा.

## वरील कृतींची उत्तरे –

१. अर्थान्तरन्यास  २. अर्थान्तरन्यास  ३. अतिशयोक्ती  ४. अर्थान्तरन्यास
५. अर्थान्तरन्यास  ६. उपमेय – ताजमहाल  ७. उपमान – चंद्रमा / शरदीचा चंद्रमा
८. उपमान – अर्जुन  ९. उपमेय – नभोमंडल  १०. उपमान – सागर

- **अनन्वय अलंकार अन्य उदाहरणे –**

| अ.क्र. | अनन्वय अलंकार | उपमेय | उपमान |
|---|---|---|---|
| १. | आहे ताजमहाल एक जगती तो तोच त्याच्यापरी | ताजमहाल | ताजमहाल |
| २. | ह्या आंब्यासारखा गोड आंबा हाच | आंबा | आंबा |
| ३. | सागरासारख गंभीर सागरच ! | सागर | सागर |
| ४. | कर्णासारखा दानशूर कर्णच | कर्ण | कर्ण |
| ५. | अर्जुनासारखा पराक्रमी अर्जुनच | अर्जुन | अर्जुन |
| ६. | निशिगंध म्हणजे निशिगंधच! | निशिगंध | निशिगंध |
| ७. | या दानासी या दानाहुन, अन्य नसे उपमान | दान | दान |

- **अपन्हुती अलंकार अन्य उदाहरणे**

| अ.क्र. | अपन्हुती अलंकार | उपमेय | उपमान |
|---|---|---|---|
| १. | न हे नयन, पाकळ्या उमलल्या सरोजांतील<br>न हे वदन, चंद्रमा शरदिचा गमे केवळ, | नयन | सरोज पाकळ्या |
| २. | न हा अधर, तोंडले<br>नव्हत दांत हे कीं हिरे| | अधर,दांत | तोंडले, हिरे |
| ३ | न हे नभोमंडल वारिराशी,<br>न तारका फेनचि हा तळाशी | नभोमंडल, तारका | वारिराशी,फेन |

****************************************************************

# वाक्प्रचार

( कृतिपत्रिका – कृती ५ )

वाक्प्रचार हा घटक दोन गुणांसाठी आहे. वाक्प्रचाराच्या अर्थाच्या चार पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहिण्यासाठी एक गुण आहे. त्याच वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करून वाक्य लिहिण्यासाठी एक गुण आहे.

- **लक्षात ठेवा** -- वाक्यात उपयोग वाक्प्रचाराचाच करावयाचा आहे. अर्थाचा करू नये. वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करून वाक्य लिहावे व वाक्प्रचाराखाली अधोरेखा काढावी.

बारावी पाठ्यपुस्तकातीलच पाठाखालील वाक्प्रचार व शब्दार्थात अर्थासह दिलेले वाक्प्रचार यांचा अभ्यास करावा.

- वाक्प्रचार किंवा वाक्संप्रदाय यांचा अगदी शब्दशः अर्थ घ्यायचा नसतो. त्यातून सूचित झालेला लाक्षणिक अर्थच घ्यायचा असतो.

**नमुना कृती**

(१) य) 'विसर्ग देणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

१) अनुस्वार देणे.
२) सोडून देणे.
३) सावध असणे.
४) जागृत असणे.

र) 'विसर्ग देणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

(२) य) 'मुखवटा चढवणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

१) मुळात नसलेले रूप धारण करणे
२) मुखावर पांघरूण घालणे.
३) मुखावर लेप लावणे.
४) खूप मोठा पराक्रम करणे.

र) ' मुखवटा चढवणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

(३) य) 'फितूर होणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

१) दगाबाजी करणे
२) बोलणी करणे
३) शरण जाणे
४) अपमान स्वीकारणे

र) 'फितूर होणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

## नमुना कृती-उत्तरे

(१) य) विसर्ग देणे - सोडून देणे.

र)– वाक्यात उपयोग – मी वाईट सवयींना विसर्ग दिला.

(२) य) मुखवटा चढवणे – मुळात नसलेले रूप धारण करणे.
र) – वाक्यात उपयोग– आम्ही धैर्याचा मुखवटा चढवला.

(३) य)–फितूर होणे – दगाबाजी करणे
र) – वाक्यात उपयोग – नागोजी माने फितूर झाला.

**सराव कृती**

(१) य) 'आभाळाकडे डोळे लावणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.
१) ढगाकडे पाहणे
२) पावसाची वाट पाहणे.
३) आकाश न्याहाळणे.
४) आभाळ पाहणे.
र) 'आभाळाकडे डोळे लावणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

(२) य) 'अगतिक होणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.
१) निरुपाय होणे.
२) निरुत्साही होणे.
३) पराभूत होणे,
४) गळून जाणे.
र) 'अगतिक होणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

(३) य)'समेवर येणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.
१) मन चंचल होणे.
२) मनात उलथापालथ होणे.
३) मन शांत व एकरूप होणे.
४) मनात उलघाल होणे.
र) 'मन समेवर येणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

(४) य) 'वास्तपुस्त करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.
१) वस्ती करणे
२) पुस्ती जोडणे
३) वास्तू बांधणे
४) चौकशी करणे

र) 'वास्तपुस्त करणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

(५) य) 'नक्षा उतरणे" या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

१) अभिमान वाटणे.

२) अभिमान गळून पडणे.

३) नकाशा काढणे.

४) नकाशा पाहणे.

र) 'नक्षा उतरणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

(६) य)' कार्यव्यग्र असणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

१) कामात गर्क असणे.

२) काम न करणे.

३) कामात अडथळा असणे.

४) कामातून जाणे,

र) 'कार्यव्यग्र असणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

(७) य)' खल करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

१) खलबत्ता आणणे.

२) वाईट करणे.

३) चांगले करणे.

४) निरर्थक चर्चा करणे.

र) 'खल करणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

(८) य) 'तैनात असणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

१) मनात असणे.

२) तनात असणे.

३) सज्ज असणे.

४) तनखा मिळणे.

र) 'तैनात असणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

९) य) 'शंख करणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

१) दुणावणे. ३) चकवणे.

२) ओरडणे. ४) धमकावणे.

र) 'शंख करणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

(१०) य) 'पारखे होणे' या वाक्प्रचाराचा अर्थ खालील पर्यायांतून ओळखून लिहा.

१) दुरावणे.

२) पारखणे.
३) हरकणे.
४) दरडावणे.

र) 'पारखे होणे' या वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग करा.

## सराव कृती- उत्तरे

१) य) आभाळाकडे डोळे लावणे- पावसाची वाट पाहणे.
 र) वाक्यात उपयोग- मराठवाड्यातील शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसतात.
२) य) अगतिक होणे - निरुपाय होणे.
 र) वाक्यात उपयोग - बालहट्टापुढे पालक अगतिक होतात.
(३) य) मन समेवर येणे - मन शांत व एकरूप होणे.
 र) वाक्यात उपयोग - पहाटेच्या रम्य वातावरणात मन समेवर येते.
(४) य) वास्तपुस्त करणे - चौकशी करणे.
 र) वाक्यात उपयोग - यू.म.पठाण फुलझाडांची प्रेमाने वास्तपुस्त करतात.
(५) य) नक्षा उतरणे - अभिमान गळून पडणे.
 र) वाक्यात उपयोग - विश्वचषक स्पर्धेत भारताने पाकिस्तानी संघाचा पराभव केल्यावर पाकिस्तानी संघाचा नक्षा उतरला.
(६) य) कार्यव्यग्र असणे - कामात गर्क असणे.
 र) वाक्यात उपयोग- मी नेहमी कार्यव्यग्र असतो.
७) य) खल करणे - निरर्थक चर्चा करणे.
 र) वाक्यात उपयोग - लेखकाच्या दातदुखीवर शेजाऱ्यांनी खल केला.
(८)य) तैनात असणे - सज्ज असणे.
 र) वाक्यात उपयोग- भारतीय जवान सीमेवर नेहमी तैनात असतात.
(९) य) शंख करणे - ओरडणे.
 र) वाक्यात उपयोग - दातदुखीने हैराण झालेल्या लेखकाने शंख केला.
(१०)य) पारखे होणे - दुरावणे.
 र) वाक्यात उपयोग - निराधार मुले मातापित्यांच्या प्रेमाला पारखी होतात.

**अधिक सरावासाठी वाक्प्रचार-**

| | |
|---|---|
| १) जमीन अस्मानाचा फरक असणे | - खूपच फरक असणे. |
| २) मनातील मळभ दूर होणे | - गैरसमज दूर होणे. |
| ३) साखरझोपेत असणे | - पहाटेच्या मधुर झोपेत असणे. |
| ४) दाती तृण धरणे | - शरण येणे, पराजय कबूल करणे. |
| ५) दात घशात घालणे | - फजिती करणे. |

६) चारीमुंड्या चीत होणे - पराभूत होणे.
७) मेख मारणे - अडथळा निर्माण करणे.
८) दात धरणे - सूड घेण्याची इच्छा मनात बाळगणे.
९) दात दाखवणे - उपहास करणे, चेष्टा करणे.
१०) हुलकावण्या देणे - चकवणे.
११) उत्पात होणे - अनर्थ होणे.
१२) मायेची पाखर घालणे - प्रेम करणे.
१३) मर्दुमकी गाजवणे - खूप मोठा पराक्रम करणे.
१४) गळा कापणे - विश्वासघात करणे.
१५) पाक पशार होणे - पळून जाणे.
१६) स्वारस्य नसणे - स्वाभाविक, नैसर्गिक इच्छा नसणे.
१७) असूया वाटणे - द्वेष वाटणे.
१८) वैषम्य वाटणे - दुःख वाटणे, खेद वाटणे.

*************************************************

# लेखन - निबंध

**(गुण - १०)**

पाठ्यपुस्तकात दिलेल्या विषयांपैकी किमान एक-दोन विषयांवर परीक्षेत निबंध आलेले आहेत. पाच प्रकारांपैकी जो निबंधाचा प्रकार सोपा वाटतो तो लिहिण्यासाठी निवडावा.

- किमान पाच-सहा परिच्छेदांत विषय मांडावा.
- पहिला परिच्छेद प्रास्ताविकाचा असावा.
- तीन-चार परिच्छेदांत विषयाचा विस्तार करावा.
- शेवटचा परिच्छेद समारोपाचा असावा.

१) **वर्णनात्मक निबंध** - यात स्थल, निसर्ग, प्रवास, घटना इत्यादींचे वर्णन अपेक्षित असते. “पहाटेचे निसर्गसौंदर्य” या विषयावर निबंध लिहिताना 'रेशीमबंध' या पाठाचा उपयोग होतो.

(२) **व्यक्तिचित्रणात्मक निबंध** - यात आपण पाहिलेल्या व्यक्ती- आपले शिक्षक, आई, आजी, आजोबा इ. त्या व्यक्तीचे बाह्यरूप कसे आहे, याचे आधी वर्णन करावे व उत्तरार्धात त्या व्यक्तीचे गुण दर्शवणारे दोन-चार प्रसंग यातून ती व्यक्ती वाचणाऱ्यासमोर उभी राहते.

**३) आत्मवृत्तात्मक निबंध** - सजीव अथवा निर्जीव व्यक्ती वा वस्तू आपल्याशी बोलते आहे, सुखदुःख सांगते आहे, असे वर्णन यात अपेक्षित असते. कष्टकरी, शेतकरी स्त्रीचे वर्णन 'रोज मातीत' कवितेत आले आहे. त्याचा उपयोग या निबंधासाठी होऊ शकतो.

**४) कल्पनाप्रधान निबंध** - यात कल्पनाविलासाला महत्त्व दिलेले असते.सूर्य उगवला नाही तर, पेट्रोल संपले तर, यांसारखे विषय यात येतात. असे जर झाले तर काय, काय होऊ शकेल याचे कल्पनारम्य वर्णन यात अपेक्षित असते.

**५) वैचारिक निबंध** - एखाद्या विचाराला, समस्येला प्राधान्य देऊन त्यासंबंधीची साधकबाधक चर्चा यात अपेक्षित असते. स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी 'आरशातली स्त्री' ही कविता, स्त्रीभ्रूणहत्येसंदर्भात 'रंगरेषा व्यंगरेषा' हा पाठ, त्यातील आशय या विषयावरील निबंधासाठी उपयुक्त ठरू शकतो.

आतापर्यंत झालेल्या सहा पेपरमधील विषय पाहिले असता साधारण कोणते विषय परीक्षेत येऊ शकतील, याचा अंदाज करता येईल.

## वर्णनात्मक निबंध-

मी अनुभवलेली पहाट (सप्टें. २०२१)

एक अविस्मरणीय सहल (जुलै २०२२)

मी अनुभवलेला निसर्ग (जुलै २०२३)
मी पाहिलेला अविस्मरणीय सामना (एप्रिल २०२३)
मी अनुभवलेला पाऊस (फेब्रु.२०२३)
निसर्ग माझा सखा (फेब्रु.२०२४)

**व्यक्तिचित्रणात्मक निबंध -**

माझा आवडता कलावंत (सप्टें.२०२१,जुलै २०२२)
माझा आवडता खेळ (जुलै २०२३)
माझे आवडते शिक्षक (एप्रिल २०२२)
माझा आवडता खेळाडू (फेब्रु.२०२३)
माझा आवडता लेखक / कवी (फेब्रु.२०२४)

**आत्मवृत्तात्मक निबंध**

मी शेतकरी बोलतोय (सप्टे.२०२१)
मी रस्ता बोलतोय (जुलै २०२२)
घंटागाडीवरील कर्मचाऱ्याचे मनोगत (जुलै २०२३)
मी शाळेची घंटा बोलतेय (एप्रिल २०२२)
मी फळा बोलतोय (फेब्रु२०२३)
मी समुद्र बोलतोय (फेब्रु.२०२४)

**कल्पनाप्रधान निबंध**

झाडे बोलू लागली तर.... (सप्टे.२०२१)
इंटरनेट (आंतरजाल) खंडित झाले तर---(जुलै २०२१)
मी शिक्षक झालो तर.. .. (जुलै २०२३)
सूर्य उगवला नाही तर.... (एप्रिल २०२२)
पेट्रोल संपले तर .... (फेब्रु.२०२३)
क्रीडांगण बोलू लागले तर.... (फेब्रु.२०२४)

**वैचारिक निबंध**

भ्रमणध्वनी यंत्र (मोबाईल फोन) शाप की वरदान (सप्टे.२०२१)
विज्ञान शाप की वरदान (जुलै२०२२)
युग तंत्रयुगाचे (जुलै२०२३)
आजच्या स्त्रीचे समाजातील स्थान (एप्रिल २०२२)
वाचते होऊया (फेब्रु२०२३)
वृत्तपत्रांचे महत्त्व (फेब्रु.२०२४)

# पाठ्यपुस्तकातील निबंधाचे विषय

**वर्णनात्मक निबंध**

१) पहाटेचे सौंदर्य

२) आमची अविस्मरणीय सहल

३) श्रावणातील निसर्गसौंदर्य

४) वसंत ऋतू

५) मी पाहिलेला सूर्यास्त

६) मी अनुभवलेला पाऊस

७) मी पाहिलेला क्रिकेटचा सामना

**व्यक्तिचित्रणात्मक निबंध**

१) माझे आवडते शिक्षक

२) आमच्या शाळेतील शिपाईमामा

३) माझी आई/आजी

४) माझे वडील / आजोबा

५) माझा आवडता कलावंत

६) माझा आवडता खेळाडू

७) माझा आवडता खेळ

**आत्मवृत्तात्मक निबंध**

१) मी सह्याद्री बोलतोय

२) मी सैनिक बोलतोय

३) वृत्तपत्राचे मनोगत

४) शहीद जवानाच्या पत्नीचे मनोगत

५) मी रस्ता बोलतोय

६) नदीची आत्मकथा

७) मी पुतळा बोलतोय

**कल्पनाप्रधान निबंध**

१) सूर्य मावळला नाही तर...

२) पेट्रोल संपले तर....

३) मी पक्षी झालो तर....

४) मीअभिनेता/अभिनेत्री झालो/ झाले तर...

५) माणूस अमर झाला तर....

**वैचारिक निबंध**

१) तंत्रज्ञानाची किमया

२) वाचते होऊया

३) मोबाईल शाप की वरदान

४ )पर्यावरणापुढील आव्हाने

५) देशाच्या प्रगतीमधील महिलांचे योगदान

६) स्त्रीभ्रूणहत्या एक अपराध

****************************************************

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.